नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५५ * अंक २०१ * * नागपूर * गुरुवार, दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

**खरीखरी...**

## तरच होईल, मराठी मुंबई!

बई महाराष्ट्राची राजधानी आहे. देशाची आर्थिक राजधानी आहे आणि ाची व्यावसायिक राजधानी आहे. तसेच सिने कलाकारांची कला ास्थानी आहे. हे सर्व असले तरी मुंबई मराठी माणसांच्या मनाची ाधानी आहे. पन्नास वर्षांपूर्वीच्या काळात जेव्हा पर्यटनाचा एवढा राजावाजा नव्हता, त्या काळामध्ये एखादा तालुक्यातील युवक मुंबईला राऊन आला असे म्हटले तर त्याची कॉलर टाईट होत होती. अशी ही गाजाजनांच्या मनामनातील राजधानी असलेली मराठी मुंबापुरी कितपत ाठी आहे, हा आमच्या समोरचा प्रश्न आहे. 1966 साली प्रबोधनकार करे यांच्या आशीवार्दाने बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना स्थापन केली. ाठी माणसांच्या हक्काचा लढा बाळासाहेबांनी उभारला तो लढा अजूनही ूच आहे. खऱ्याखूऱ्या मुंबईमधील कितीतरी मराठी माणसांची कुटुंबे नगरात गेली आहेत. आता तर उपनगरे हे उपनगरे राहिलेली नसून त्या नगरांच्या बाहेरही कितीतरी नवनगरे वसलेली आहेत. साधारणपणे 25 पूर्वी नवी मुंबई अस्तित्वात आली, त्यानंतर आता तिसऱ्या आणि चौथ्या ईची पायाभरणी होत आहे. हे सांगायचे कारण असे की मुंबई पूर्वी कणवासीयांची आश्रयदाती होती. कोकण वासीयांच्या दोन-चार ामधून कितीतरी तरुण मुंबईला येऊन मुंबईकर होत असत. गिरणगाव ाठी माणसांचे वसलेले आहे मात्र, आता आहे असे म्हणण्यापेक्षा होते ने म्हणावे लागते. गिरणगावच्या गिरण्या गेल्या आणि आता त्या भागामध्ये ाकासाच्या अनेक मजली इमारतीमध्ये मराठी माणसाचा टक्का-टक्का विवसेंदिवस कमी होत आहे. मराठी माणूस जसा बुद्धीमध्ये उच्च स्थानावर दिसे. तसाच तो श्रमातही मागे नाही, अशा प्रकारे बुद्धीसह कष्ट करणारा ाठी माणूस आता मुंबईचा मालक आहे असे मनातून कीतीही वाटले तरी ाण म्हणू शकत नाही?. त्यातच शिवसेनेचे सर्वोच्च नेते मुंबईकर ाहेलेले नाहीत अर्थात, यामध्ये काही वाईट नाही. पण मुंबईतील मराठी ासांच्या सुखदुःखाची स्पंदने मुंबईत राहिल्याशिवाय कळत नाहीत. ा मुंबईचे अनभिषिक्त आणि एकमेव सम्राट म्हणून बाळासाहेब ठाकरे ांच्या स्मरणातच मुंबईच्या अभिमानाचा दिवा प्रकाशमान होऊ शकतो. ाळासाहेबांचे नाव घेतल्याशिवाय शिवसेना आणि मुंबईतील मराठी माणूस सुखाने श्वासही घेऊ शकणार नाही. पण एकेकाळी साहित्य, कला, राजकारण, समाजकारण, नाट्य व्यवसाय, चित्रपट व्यवसाय यामध्ये मराठी जनांचा बोलबाला होता.

▶▶ पान ८ वर

### मुंबई महानगरपालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंशी युती नाही

# काँग्रेसचा मोठा निर्णय!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षात मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

युतीबाबतचे तर्क-वितर्क सुरू असतानाच काँग्रेसचे ज्येठ नेते आणि माजी मुंबई काँग्रेस अध्यक्ष भाई जगताप यांनी स्पष्टपणे जाहीर केले आहे की, काँग्रेस पक्ष ठाकरे बंधूंसोबत, म्हणजेच उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे, या दोघांच्या पक्षांसोबत युती करणार नाही. मी मुंबई काँग्रेसचा अध्यक्ष असताना हीच भूमिका स्पष्ट केली होती आणि आजही त्यात



बदल नाही, असे ठामपणे सांगत जगताप यांनी पक्षातील कार्यकर्त्यांचा आवाज मांडला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या रणांगणात काँग्रेस स्वतंत्रपणे उतरू शकते, अशी शक्यता अधिक बळावली आहे.

भाई जगताप यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ही स्थानिक कार्यकर्त्यांची असते, नेत्यांची नाही. या निवडणुका कार्यकर्त्यांना लढू द्या, त्यांना निर्णय घेऊ द्या. आम्ही मुंबईतील स्थानिक आहोत, त्यामुळे आम्ही स्वबळावर लढू हीच आमची भूमिका आहे. रमेश चेन्निथला यांच्यासमोर हीच भूमिका स्पष्ट मांडल्याचे त्यां सांगितले.

यामुळे महायुतीमध्ये आतापासून बेबनाव निर्माण झाल्याची चर्चा रंगली आहे.

## आरएसएस ही राष्ट्रभक्त संघटना

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २२ :**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक कडवट देशभक्त आणि राष्ट्रभक्त संघटना आहे. तिच्यावर बंदीची मागणी करणे दुर्दैवी असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

**एकनाथ शिंदेंची स्तुतीसूमने**



आमदार रोहित पवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बंदीची मागणी केली आहे. यावर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे यांनी सदरील विधान केले. तसेच लाडक्या बहिणींना लवकरच भाऊबीज मिळणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. एकनाथ शिंदे यांनी नुकताच ठाण्यामध्ये माध्यमांशी संवाद साधला. आरएसएसवर बंदी घालण्याची मागणी केल्याबद्दल एकनाथ शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

शिंदे म्हणाले, भाई जगताप यांच्या वक्तव्यावर बोलताना ते म्हणाले, लोकशाहीमध्ये प्रत्येकाला अधिकार असतो. लोकशाहीमध्ये प्रत्येक पक्ष आपापला निर्णय आणि अधिकार घेत असतो. त्यांचा तो निर्णय असेल. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत महायुतीचाच भगवा डौलाने फडकेल.

# मेहुल चोक्सीसाठी बराक सज्ज

### आर्थर रोड कारागृहात ठेवणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २२ :**
१३ हजार ८५० कोटी रुपयांच्या पीएनबी घोटाळ्यातील फरार आरोपी उद्योगपती मेहुल चोक्सीला भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.



भारताने मुंबईतील आर्थर रोड तुरुंगाचे अधिकृत फोटो बेल्जियमच्या अधिकाऱ्यांना सुपूर्द केले आहेत. याद्वारे, चोक्सीला त्याच्या प्रत्यार्पणानंतर आर्थर रोड तुरुंगात ठेवल्यावर कोणत्या सुविधा मिळतील हे सांगण्यात आले.

सुनावणीत बेल्जियमच्या न्यायालयाने चोक्सीविरुद्ध दाखल केलेले गुन्हे भारत आणि बेल्जियम या दोन्ही देशांच्या कायद्यांनुसार प्रत्यार्पण करण्यायोग्य असल्याचा निर्णय दिला. त्यानंतर, मेहुल चोक्सीचे प्रत्यार्पण केले जाऊ शकते असे म्हटले जात आहे.

बेल्जियममधील अँटवर्प येथील न्यायालयाने १७ ऑक्टोबर रोजी फरार हिरे व्यापारी मेहुल चोक्सीच्या प्रत्यार्पणाला मान्यता दिली. भारतीय एजन्सींच्या विनंतीवरून बेल्जियम पोलिसांनी चोक्सीची केलेली अटक कायदेशीर असल्याचे न्यायालयाने म्हटले.

कागदपत्रांनुसार, चोक्सीला मुंबईच्या उच्च-सुरक्षा असलेल्या आर्थर रोड तुरुंगाच्या बराकक्रमांक १२ मध्ये ठेवण्यात येईल, त्याच तुरुंग संकुलात २६/११ चा दहशतवादी अजमल कसाब यालाही ठेवण्यात आले होते. बॅरेक्समध्ये संलग्न शौचालये आणि बाथरूमसह दोन खोल्या आहेत. चोक्सीला वैद्यकीय तपासणी आणि हजेरीसाठी तुरुंगाबाहेर जाण्याची परवानगी असेल.

## डबल इंजिनचे सरकार धनदांडग्यांसाठी तत्पर

■ **महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि. २२ :**
महाराष्ट्रात ओल्या दुष्काळाची तीव्रता वाढत असताना राज्य सरकारने अद्याप अधिकृतरीत्या ओला दुष्काळ जाहीर न केल्यामुळे विरोधकांकडून सरकारवर टीकेची झोड उठली आहे.

**नाना पटोले यांची सरकारवर टीका**



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारवर आणि केंद्रातील भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. डबल इंजिनचं सरकार हे शेतकऱ्यांचं, बेरोजगारांचं आणि गरिबांचं फेल सरकार आहे, पण धनदांडग्यांसाठी मात्र हे सरकार नेहमीच तत्पर असतं, असा आरोप पटोले यांनी केला. त्यांनी राज्य सरकारवर महाराष्ट्राची अवदसा निर्माण केली, असा आरोप केला.

नाना पटोले म्हणाले की, आज राज्यात पिकं वाळून चालली आहेत, शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर आहेत, पण सरकार नियमांच्या नावाखाली त्यांना मदत देण्यास टाळाटाळ करत आहे. विरोधी पक्षात असताना याच देवेंद्र फडणवीस यांनी ओला दुष्काळ घोषित करण्याची मागणी केली होती. मात्र, आज सत्तेत येऊन तेच फडणवीस नियम सांगत बसले आहेत. राजकारणात न जाता, संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत करणे ही सरकारची जबाबदारी आहे, पण हे सरकार ती पाळत नाही.

पटोले यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या मदतीच्या घोषणांनाही फोल ठरवले. केंद्र आणि राज्यात डबल इंजिनचं सरकार असूनही मदत का मिळत नाही? शेतकरी, मजूर, बेरोजगार, आणि सामान्य लोकांसाठी हे सरकार नेहमी फेल ठरतं, पण धनदांडग्यांसाठी मात्र हे सरकार धावतं. मग हे सरकार नक्की कुणाचं? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

काँग्रेस नेत्यांनी या पार्श्वभूमीवर सरकारच्या कारभारातील भ्रष्टाचार, निवडणूक प्रक्रिया आणि पैशाच्या राजकारणावरही निशाणा साधला. महाराष्ट्रात त्रिकूट सरकार चाललं आहे आणि यात लूटपाट सुरू आहे. कुणाच्या हातात किती भेटते, कोण किती लुटतं, हेच या सरकारचं काम झालं आहे. गेल्या साडेचार वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या नाहीत, असेही ते म्हणाले.

### राजच्या दीपोत्सवाचे श्रेय

## सरकारने लाटले

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २२ :**
मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईच्या शिवाजी पार्कमध्ये सुरू केलेला दीपोत्सव कार्यक्रम अनेकांच्या पसंतीस उतरला आहे. मनसेकडून येथे करण्यात येणारी फटाक्यांची आतषबाजी पाहण्यासाठी दूरवरून लोक येतात. पण आता महायुतीच्या पर्यटन खात्याने राज ठाकरे किंवा मनसेचा उल्लेख टाळून दीपोत्सवाची जाहिरातबाजी करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यावर मनसेने तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणी मनसेला अगदी छोटेसे श्रेय दिले असते, तर सरकारच्या मनाचा उमदेपणा दिसला असता, असे मनसेने या प्रकरणी म्हटले आहे.

राज्य सरकारच्या पर्यटन खात्याच्या ट्विटर हँडलवर एक पोस्ट शेअर करण्यात आली आहे. त्यात नमूद करण्यात आले आहे की, तुम्ही अजून छत्रपती शिवाजी महाराज पार्कमधील फटाक्यांची आतषबाजी पाहिली नसेल, तर तुम्ही दिवाळीत मुंबईतील उत्कृष्ट जागेला मुकत आहात. मनसेने एका पोस्टद्वारे दीपोत्सवाचे श्रेय लाटणाऱ्या या पोस्टवरून सरकारची चांगलीच कानउघाडणी केली आहे.

### अब्दुल कलाम यांना संधी देणारे

## डॉ. एकनाथ चिटणीस यांचे निधन

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २२ :**
नभारतीय अंतराळ संशोधनाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय आज काळाच्या पडद्याआड गेला.



भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच क्रफ्ह चे ज्येष्ठ वैज्ञानिक आणि डॉ. विक्रम साराभाई यांचे निकटचे सहकारी डॉ. एकनाथ वसंत चिटणीस यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. वयाच्या 101 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

देशातील सॅटेलाइट टेलिव्हिजनचे जनक, श्रीहरीकोटा प्रक्षेपण केंद्राचे संकल्पक आणि डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अवकाश संशोधनात संधी देणारे मार्गदर्शक, असा बहुआयामी प्रवास आज थांबला. 26 जुलैला त्यांनी शतकमहोत्सवी वर्ष पूर्ण केले होते. त्यांच्या निधनाने भारतीय अवकाश संशोधनाचा एक सुवर्णकाळ संपल्याची भावना देशभरातून व्यक्त होत आहे.

1925 साली कोल्हापूर येथे जन्मलेले एकनाथ वसंत चिटणीस हे लहान वयातच आईवडिलांच्या छायेशिवाय वाढले. मात्र, आजी आणि कुटुंबीयांच्या संस्कारांनी तसेच आजोबा मल्हार खंडेराव चिटणीस यांच्या वंडर्स ऑफ स्पेस या मराठी पुस्तकाने त्यांच्या मनात अंतराळाविषयी असलेले आकर्षण अधिकच बळकट केले.

पुणे विद्यापीठातून त्यांनी भौतिकशास्त्रात प्रथम श्रेणीत पदवी मिळवली. त्यानंतर ऑल इंडिया रेडिओमध्ये नोकरीची संधी मिळाली होती, परंतु स्थैयार्चा मार्ग न स्वीकारता त्यांनी विज्ञानाचा आणि संशोधनाचा कठीण मार्ग निवडला. 1050 मध्ये पुण्यात झालेल्या इंडियन सायन्स काँग्रेसमध्ये डॉ. विक्रम साराभाईंचे भाषण ऐकून त्यांनी आयुष्य विज्ञान संशोधनाला अर्पण करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी मध्ये काम केले.

डॉ. चिटणीस यांनी कॉस्मिक किरणांवर संशोधन सुरू केले आणि पुढे अमेरिकेतील संस्थेत अत्याधुनिक तंत्रज्ञान शिकले. 1961 साली साराभाईंच्या विनंतीवरून ते भारतात परतले आणि देशातील पहिलं सॅटेलाइट टेलिमेट्री स्टेशन उभारलं. त्यांनी थुंबा रॉकेट लॉचिंग स्टेशनची जागा निश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## मुसळधार पावसाचा तामिळनाडूला तडाखा

### पाच जिल्ह्यांतील शाळा बंद

■ **वृत्तसंस्था, चेन्नई, दि. २२ :**
ईशान्य मान्सूनमुळे गेल्या दोन दिवसांपासून दक्षिणेकडील राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडला आहे. बुधवारी तामिळनाडूमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मंगळवारपासून राज्यातील तिरुवल्लूर, चेन्नई, कांचीपुरम, चेंगलपट्टू आणि डेल्टा जिल्ह्यांमध्ये पाऊस सुरू आहे.

चेन्नईतील सर्व शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. पुढील चार दिवसांसाठी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कुड्डालोर, विल्लुपुरम, रानीपेट आणि थुथुकुडी जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालये देखील बंद घोषित करण्यात आली आहेत. तामिळनाडू सरकारने प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत.

पावसाच्या दरम्यान, चेन्नईच्या मरीना बीचवर जोरदार लाटा आणि वारे धडकत आहेत. हे वादळ पुढील काही दिवस सुरूच राहण्याची शक्यता आहे. प्रशासनाने मच्छीमार आणि किनारी रहिवाशांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तामिळनाडूव्यतिरिक्त, केरळ, आंध्र प्रदेश आणि पुदुचेरीमध्येही पाऊस सुरू आहे. पुदुचेरी आणि कराईकलमध्ये शाळा आणि महाविद्यालये बंद आहेत.




# आईने यकृताचा भाग देऊन मुलीला दिले नवजीवन

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २२ :**
सात वर्षीय चिमुकली गेल्या अनेक महिन्यांपासून यकृताच्या गंभीर आजाराशी झुंज देत होती. डॉक्टरांनी अखेर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हा एकमेव पर्याय दिला.

उपचारासाठी २० लाख रुपए खर्च. भाजीपाला विक्रीचा छोटा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबापुढे या उपचाराचा खर्च परवडणारा नव्हता. या कठीण काळात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रूग्णालय मदत कक्षसह सामाजिक संस्था, संघटनांकडून आर्थिक आधार मिळाला. देवांशीच्या आईने तिला यकृताचा भाग देऊन मुलीला नवजीवन दिले आहे.

वाशीम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील वरूड (बु) येथे राहणारे रवींद्र गावंडे हे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मागील अनेक दिवसांपासून त्यांची मुलगी देवांशी पोटदुखी, ताप, मळमळ होणे आदींमुळे सतत आजारी पडत होती. पालकांनी सुरूवातीला मंगरूळपीर आणि अकोला येथे तिच्यावर उपचार केले. मात्र,



तिच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने अखेर तिला नागपूर येथे हलविण्यात आले.

वैद्यकीय तपासणीनंतर, तज्ज्ञ डॉक्टरांनी तिचे यकृत गंभीर स्वरूपात बाधित झाल्याचे निदान केले. तसेच यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया गरजेचे असल्याचे सांगितले. शस्त्रक्रियेसाठी २० लाख रुपये खचार्चा अंदाज त्यांनी वर्तविला होता. दरम्यान, देवांशीच्या वडिलांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती मिळवली. त्यासोबतच समाज माध्यमावर मदतीसाठी आवाहन केले.

कक्षाच्या पुढाकाराने देवांशीवर पुढील उपचार मुंबईतील रुग्णालयात सुरू झाले. या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष, टाटा ट्रस्टच्या माध्यमातून उपचाराची मोठी रक्कम उभी राहिली. उर्वरित रक्कम इतर काही सामाजिक संस्था आणि गावकऱ्यांच्या वर्गणीतून गोळा करण्यात आली. देवांशीची आई मीनाक्षी गावंडे यांनी यकृत दिले. तिच्यावर यकृत प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली.

देवांशीची प्रकृती आता स्थिर असून तिच्या प्रकृतीत दिवसेंदिवस सुधारणा होत आहे. आता तिला सुट्टी मिळाली आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष आणि टाटा ट्रस्टसह इतर संस्था, संघटनांची मदत मिळाली, त्यामुळेच आमच्या मुलीचे प्राण वाचले, असे देवांशीचे वडील रवींद्र गावंडे यांनी सांगितले.

प्रत्येक गरजू, गरीब रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत, यासाठी कक्षाच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहोत. देवांशी त्याचे एक उदाहरण आहे. वेळेवर मदत करू शकलो, याचा आनंद आणि समाधान असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले.

# मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना ३४६ कोटींचा दिलासा

## दिवाळी मात्र अंधारात : खात्यात रक्कम जमा होण्यास विलंब



■ वृत्तसंस्था
छत्रपती संभाजीनगर, दि. २२:
मराठवाडा विभागातील अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. सरकारने एकूण 346 कोटी 31 लाख 70 हजार रुपयांचा मदत निधी मंजूर केला आहे. मात्र, या निधीचे वितरण दिवाळीनंतरच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. या निर्णयामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी प्रत्यक्ष मदत मिळण्यास उशीर असल्याने शेतकऱ्यांची चिंता कायम आहे.
जून ते सप्टेंबर या काळात मराठवाड्यात दलग पावसाने थैमान घातले होते. या काळात अनेक जिल्ह्यांत नदी-नाल्यांना पूर आले, घरं आणि शेतीपिकं वाहून गेली. 3 लाख 58 हजार 612 शेतकऱ्यांचे 3 लाख 88 हजार हेक्टरवरील पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले.
काही भागांमध्ये शेतजमीनही वाहून गेल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले. त्यामुळे राज्य सरकारने गेल्या पंधरवड्यातील हा चौथा मदतनिधीचा अध्यादेश जारी केला आहे. याअंतर्गत मराठवाड्यातील सात जिल्ह्यांना मदत वितरित केली जाणार आहे.
शासनाच्या या निर्णयामुळे स्थानिक प्रशासनाकडून नुकसानीचे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा केले जातील. मात्र, प्रशासकीय प्रक्रिया आणि निधी हस्तांतरणाच्या टप्प्यांमुळे ही रक्कम दिवाळीनंतरच उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
या रकमेमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळेल, असा राज्य सरकारचा दावा आहे.
राज्य शासनाच्या निर्णयानुसार 2 ते 3 हेक्टरपर्यंत पीक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे. तथापि, अनेक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, नुकसानीचा अंदाज जास्त असून मंजूर झालेली रक्कम अपुरी आहे. तसेच दिवाळीच्या आधी ही मदत मिळाल्यास खरीप हंगामातील नुकसानीतून बाहेर पडण्यास काहीसा आधार मिळाला असता, अशी खंतही शेतकरी व्यक्त करत आहेत.
राज्य प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे की, सर्व जिल्ह्यांनी आपापल्या महसूल यंत्रणेकडून शेतकऱ्यांचे तपशील आणि नुकसान अहवाल सादर केले आहेत. आता निधीचे तांत्रिक वाटप व मंजुरी प्रक्रिया सुरू आहे. निधी वितरित करण्यासाठी केंद्र सरकारकडून मंजुरी आणि निधी हस्तांतरणाचे अंतिम टप्पे सुरू आहेत.
अतिवृष्टीमुळे फक्त खरीप पिकांचं नुकसान झालं नाही, तर अनेक ठिकाणी रब्बी हंगामाची तयारीही अडचणीत आली आहे. शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली असून, बियाणं, खतं आणि मजुरी यासाठी अतिरिक्त कर्ज घ्यावं लागत आहे.
सरकारकडून मिळणाऱ्या मदतीची प्रतिक्षा आता अधिक वाढली असून, शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. 346 कोटी रुपयांचा निधी हा मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासा ठरणार असला तरी त्याची अंमलबजावणी आणि वेळेवर वितरण हाच खरा प्रश्न आहे.

**जिल्हानिहाय मदतनिधीचे वितरण**
राज्य सरकारने जाहीर केलेल्या निधीचे वाटप खालीलप्रमाणे आहे.
संभाजीनगर : 81 कोटी 62 लाख
बीड : 67 कोटी 24 लाख
लातूर : 35 कोटी 72 लाख
परभणी : 49 कोटी 42 लाख
जालना : 64 कोटी 75 लाख
हिंगोली : 11 कोटी 30 लाख
नांदेड : 36 कोटी 22 लाख
**एकूण मदतनिधी : 346 कोटी 31 लाख 70 हजार**

## भाजप मित्रांवरच वार करतो
## संजय राऊतांची सरकारवर टीका



**मुंबई :** भाजप सर्वात पहिले आपल्या मित्रांवर वार करतो. व्यक्ती केंद्रीत राजकारण सुरू झाले आहे तसे सर्व सुरू झाले आहे. सोलापुरातील सुभाष देशमुख हे फडणवीस यांच्या गटातील नसतील म्हणून त्यांच्यासमोर आव्हान निर्माण केले जात असेल. राज्याच्या अनेक जिल्ह्यात असेच सुरू आहे, पण हा भाजपचा अंतर्गत प्रश्न आहे, असे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.
संजय राऊत म्हणाले की, अजित पवार यांचे माजी आमदार फोडले जात असतील तर त्यांच्याशी बोलले पाहिजे. यावर आम्ही का बोलावे. भाजपच्या सुभाष देसाई यांनी सोलापुरातील नेत्यांच्या पक्ष प्रवेशाला विरोध केला आहे. त्यांच्याशी चर्चा केली पाहिजे. फडणवीस यांची या प्रवेशामागे काय योजना आहे. त्यांना बेडकासारखा आपला पक्ष नेमका किती फुगवायचा आहे, असा सवाल राऊतांनी केला आहे.
लोकप्रतिनिधी हा लोकप्रतिनिधी असतो निवडून आल्यावर तो कोणत्या पक्षाचा नसतो आणि सरकारही कोणत्या पक्षाचे नसते. गेल्या काही काळापासून देवेंद्र फडणवीस आणि मिंदेंच्या हाती सत्ता आल्यापासून त्यांना पाठिंबा देणाऱ्यांना निधी आणि विरोधी पक्षातील आमदारांचे मतदारसंघ कोरडे ठेवले जात आहे. हे कृत्य घटनाबाह्य आहे. बेकादेशीर आणि लोकशाही विरोधातील कारस्थान आहे. निधीचे असमान वाटपाचे प्रकरण न्यायालयात सुद्धा गेले होते. अनेक ठिकाणी विरोधी पक्षातील आमदार हे प्रथम निवडून आले आहेत. अनेक जण पहिल्यांदा निवडून आले आहे. पण यांच्याकडे सत्तेची मग्रुरी आहे.

## विरोध करणारे हे कोण?
## इम्तियाज जलील यांची टीका



**छत्रपती संभाजीनगर :** ऐतिहासिक शनिवारवाडा परिसरात काही मुस्लीम महिलांनी नमाज पठण केल्याच्या घटनेवरून राज्यात राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकरणावरून एआयएमआयएम पक्षाचे नेते माजी खासदार इम्तियाज जलील यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तीव्र टीका केली आहे. मुस्लीम महिलांनी नमाज वेळ झाल्याने प्रार्थना केली, यात काय गुन्हा झाला? त्यांनी शनिवारवाड्यावर आपला दावा केला नाही. मात्र, मुद्दा दुसरीकडे वळवण्यासाठी आणि मोहोळ यांच्या जमीन घोटाळ्याचे लक्ष हटवण्यासाठी हे प्रकरण उकरण्यात आले आहे, असा गंभीर आरोप जलील यांनी केला.
जलील म्हणाले की, शनिवारवाड्यात आमच्या बहिणींनी नमाज पडली म्हणून एवढं मोठं वादंग निर्माण केलं जात आहे. नमाज ही श्रद्धेची गोष्ट आहे, राजकारणाची नाही. नमाज वेळ झाली म्हणून त्यांनी प्रार्थना केली. त्यांनी कोणत्याही दगडाला रंग मारून तो आमचा आहे असं म्हटलं नाही. शिवाजी महाराजांनी कधी मुस्लीम समाजाचा विरोध केला नाही. मग हे कोण चिंधीचोर आहेत जे आता हिंदुत्वाच्या नावाखाली समाजात भेदभावाचं विष पेरत आहेत? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यांनी पुढे आरोप केला की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पॉलिसीच आहे की, जेव्हा स्वतःवर संकट येतं तेव्हा मुद्दा दुसरीकडे वळवायचा. भाजपच्या दबावाखाली पोलिसांनी निरपराध महिलांवर गुन्हा दाखल केला आहे.
चिंकू-पिंकू हिंदुत्ववादी झालेत, असे म्हणत जलील यांनी भाजपच्या नेत्यांना टोलाही लगावला. नमाज पडली म्हणजे वाडा ताब्यात घेतला असा हास्यास्पद दावा करणारे लोक हे समाजात विष पसरवत आहेत. मस्तानीने सुद्धा कधी तिथे नमाज पडली असेल, तेव्हा कुणी वाद घातला नव्हता. पण आज हेतुपुरस्सर धार्मिक द्वेष निर्माण करण्याचं काम सुरू आहे. मुस्लीम समाजाला चिथावणी देऊन राजकीय लाभ मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. आम्ही या राजकारणाला बळी पडणार नाही, असे जलील म्हणाले.
बिहार विधानसभा निवडणुकीचा संदर्भ देत इम्तियाज जलील यांनी मोठा दावा केला. बिहार निवडणुकीत एमआयएम सर्वांना आश्चर्याचा धक्का देईल, असं ते म्हणाले. गेल्या निवडणुकीत आम्ही सहा जागांची मागणी केली होती. भाजपला हरवायचे असेल तर सर्वांनी एकत्र यावे, असे आम्ही म्हटले होते. पण तेजस्वी यादव म्हणाले की एमआयएमने लढू नये. आम्ही काय गोट्या खेळण्यासाठी आलो आहोत का? या वेळी आम्ही बिहारमध्ये उतरणार आहोत आणि एमआयएमची ताकद दाखवून देऊ, असा दावा त्यांनी केला. त्यांनी कॉंग्रेस आणि आरजेडीवरही टीका करत म्हटलं की, भाजप, कॉंग्रेस आणि आरजेडी हे सगळे आमच्यासाठी सारखेच आहेत. जनता पाहील की खरे विरोधक कोण आहेत, असेही त्यांनी म्हटले आहे.

## अभिनेता असरानी यांचे ८४ व्या वर्षी निधन



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२:**
'शोले' या ब्लॉकबस्टर चित्रपटात ब्रिटिशकालीन जेलरची भूमिका साकारणारे गोवर्धन असरानी यांचे सोमवारी दुपारी १ वाजता वयाच्या ८४व्या वर्षी निधन झाले. चार दिवसांपूर्वी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, जिथे त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या फुफ्फुसांतील द्रवपदार्थ साचला होता. त्यांचे व्यवस्थापक बाबूभाई थिबा यांनी मृत्यूची पुष्टी केली.
बाबूभाई थिबा म्हणाले की, त्यांच्या मृत्यूपूर्वी असरानी यांनी त्यांच्या पत्नीला इच्छा व्यक्त केली होती की त्यांच्या मृत्यूची माहिती कोणालाही कळवू नये. त्यांना कोणताही गोंधळ नको होता. अंत्यसंस्कारानंतर सर्वांना कळवावे अशी विनंती त्यांनी केली होती. म्हणूनच त्यांच्या मृत्यूनंतर लगेचच सांताक्रूझमधील शांतीनगर स्मशानभूमीत त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. कुटुंबातील फक्त १५-२० सदस्य उपस्थित होते.
आज की ताजा खबर आणि नमक हराम या चित्रपटांच्या चित्रीकरणादरम्यान ते त्यांच्या प्रेमात पडले. असरानी यांनी अभिनेत्री मंजू बन्सलसोबत लग्न केले. असरानी यांनी त्यांच्या अभिनय कारकिर्दीत जवळपास 350 चित्रपटांमध्ये काम केले आहे. यामध्ये शोले, अभिमान, चुपके चुपके, छोटी सी बात आणि भूल भुलैया यांचा समावेश आहे. शोले चित्रपटातील असरानी यांचा हम अंग्रेजों के जमाने के जेलर हैं हा संवाद प्रचंड गाजला.
१ जानेवारी १९४१ रोजी जयपूर येथे जन्मलेल्या असरानी यांच्या वडिलांचे कार्पेटचे दुकान होते. त्यांच्या वडिलांना त्यांच्या मुलांनी हा व्यवसाय सांभाळावा अशी इच्छा होती, परंतु असरानी यांना चित्रपटांमध्ये रस होता. असरानी यांनी जयपूरमधील राजस्थान कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलण्यासाठी त्यांनी ऑल इंडिया रेडिओमध्ये व्हॉइस आर्टिस्ट म्हणून काम केले. १९६९ च्या 'सत्यकाम' चित्रपटात कास्ट केले, ज्यामुळे त्यांना ओळख मिळाली. त्यानंतर १९७१ च्या 'गुड्डी' या चित्रपटाने त्यांना यश मिळाले. तेव्हापासून त्यांना सातत्याने चित्रपटात काम मिळू लागले. असरानी यांनी राजेश खन्ना यांच्या सुमारे २५ चित्रपटांमध्ये काम केले. अमिताभ बच्चन यांच्या अनेक चित्रपटांमध्ये त्यांनी भूमिका केल्या, जसे की अभिमान, चुपके चुपके, छोटी सी बात, शोले, येथील जेलर असरानींचा ट्रेडमार्क बनली होता.+

## चार दिवस हवामान ढगाळ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२:**
राज्यात ऑक्टोबर महिन्यातील प्रखर उष्णतेने नागरिक हैराण झाले असतानाच आता पुन्हा एकदा हवामानातील मोठा बदल दिसून येत आहे. ऑक्टोबर हिटच्या झळांमुळे गेल्या काही दिवसांपासून नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. डिहायड्रेशन, डोकेदुखी, थकवा अशा आरोग्यसमस्या वाढल्या होत्या. आता उष्णतेला विराम मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात पुन्हा वादळी पावसाचे आगमन झाले आहे.
दिवाळीच्या दिवशीच म्हणजेच 21 ऑक्टोबरच्या सायंकाळपासून मुंबईसह राज्यातील अनेक भागात विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस बरसला. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील चार दिवस महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.
हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या बंगालच्या उपसागरासह अरबी समुद्रावर दोन वेगवेगळे कमी दाबाचे पट्टे सक्रिय आहेत. या बदललेल्या वातावरणामुळे महाराष्ट्रात पुढील चार दिवस हवामान ढगाळ राहणार आहे. विशेषतः कोकण, गोवा, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्र या भागात मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## रणजीत कासले निघाला मोबाईल चोर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२:**
झुकेगा नाही साला अशी संवादशैली वापरून सोशल मीडियावर चर्चेत आलेला बडतर्फ पोलिस अधिकारी रणजीत कासले पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.



या वेळी मात्र स्वतःवरच गुन्हा दाखल झाला आहे. गुजरात राज्यातील सुरत पोलिसांनी रणजीत कासलेवर मोबाईल चोरी आणि जबरी वसुलीचा आरोप केला आहे. पोलिस तपासात उघड झाले आहे की, रणजीत कासले काही दिवसांपूर्वी सुरतला गेला होता आणि तपासाच्या नावाखाली दोन मोबाईल फोन आणि दोन लाख रुपयांहून अधिक रक्कम लुटली. या घटनेचा सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर कासलेला पोलिसांनी अटक केली असून, त्याचा गुन्हा कबूल करत माफी मागतानाचा व्हिडिओही व्हायरल झाला आहे.
सुरत शहरात घडलेल्या या प्रकरणानंतर रणजीत कासले पुन्हा चर्चेत आला आहे. स्थानिक पोलिसांना मिळालेल्या माहितीप्रमाणे, कासले दोन व्यक्तींना तपासाच्या नावाखाली पकडून त्यांच्याकडील मोबाईल आणि रोकड हिसकावून घेतो. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली. तक्रार आल्यानंतर सुरत पोलिसांनी तपास सुरू केला आणि कासलेला लातूरमधून ताब्यात घेतले. अटक झाल्यानंतर तो बॉसला अटक झाली असं म्हणत पुष्पा चित्रपटातील स्टाईलमध्ये पोलिस गाडीत बसताना दिसला होता. मात्र, काही तासांतच परिस्थिती बदलली आणि त्याच कासलेने हात जोडून माफी मागणारा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. यामुळे झुकेगा नाही साला, म्हणणारा बॉस आता खरोखर झुकल्याचे चित्र स्पष्ट झाले.
या घटनेनंतर गुजरात पोलिसांनी बीड जिल्ह्यातील या बडतर्फ अधिका?याला पकडण्यासाठी विशेष पथक तयार केले. तीन दिवसांच्या शोधमोहीमेनंतर 20 ऑक्टोबरच्या मध्यरात्री लातूरमधील एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून रणजीत कासलेला अटक करण्यात आली.
या कारवाईत लातूर आणि गुजरात पोलिसांचा संयुक्त समन्वय होता. एमआयडीसी पोलिसांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून कासलेला सुरत येथील पाल पोलिस ठाण्याकडे सुपूर्द केले. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, सुरत आणि आसपासच्या परिसरात झालेल्या जबरी घरफोडी प्रकरणात अटक झालेल्या आरोपींकडूनच कासलेचे नाव समोर आले होते.

## बाधित क्षेत्राची मर्यादा ३ हेक्टरपर्यंत वाढवली : अतिवृष्टीग्रस्तांना दिलासा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२:**
यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून या बाधित शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत व्हावी म्हणून राज्य शासनाने तातडीने मदत देण्याचा निर्णय घेतला.
यापूर्वी दोन हेक्टरपर्यंत मदत देण्यासाठी मान्यता दिली असून आता या शेतकऱ्यांना 3 हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठीही विशेष बाब म्हणून 648 कोटी 15 लाख 41 हजार रुपयांच्या निधीच्या वितरणाला मान्यता देण्यात आली असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला आहे.
आजपर्यंत मदत व पुनर्वसन विभागाकडून यंदाच्या खरीप हंगामातील नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना सुमारे 8139 कोटी रुपये इतक्या रकमेचे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत, अशी माहितीही मंत्री जाधव पाटील यांनी यावेळी दिली.
अतिरिक्त एक हेक्टरसाठी वाढीव मदत
मंत्री पाटील म्हणाले की, राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे राज्यातील सहा लाख 56 हजार 310.83 हेक्टर क्षेत्रातील बाधित पिकांच्या नुकसानीपोटी सहा लाख 12 हजार 177 शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. यापूर्वी या शेतकऱ्यांना दोन हेक्टर पर्यंत मदत मंजूर करण्यात आली होती, तर आता अतिरिक्त एक हेक्टरसाठी ही वाढीव मदत देण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे बाधित शेतकऱ्यांना मोठा आधार दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी व्यक्त केला.
**छत्रपती संभाजीनगर विभाग** - बीड, लातूर, परभणी, छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, नांदेड या जिल्ह्याकरिता 346 कोटी 31 लाख 70 हजार
**नागपूर विभाग** - नागपूर, चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्याकरिता 7 कोटी 51 लाख 75 हजार रुपये.
**नाशिक विभाग** - नाशिक, जळगाव व अहिल्या नगर जिल्ह्याकरिता 59 कोटी 36 लाख 13 हजार रुपये.
**अमरावती विभाग** - अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्याकरिता 131 कोटी 56 लाख 47 हजार रुपये.
पुणे विभागासाठी 103 कोटी 3720 हजार रुपये व कोकणकरिताही निधी देण्यात आला आहे.

## मूळ भाजपवासियांच्या मनात असंतोषाचा वणवा

■ **महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि.२२ :**
सत्ताधारी भाजपमध्ये जुने विरुद्ध नवे संघर्ष टोकाला पोहोचला आहे. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या असूरी सत्ताकांक्षेच्या विरोधातला मूळ भाजपवासियांच्या असंतोष हळूहळू वणव्याचे रूप घेत आहे, असा दावा सुषमा अंधारे यांनी केला आहे.
भाजपने सोलापूर जिल्ह्यातील 4 माजी आमदारांना आपल्या गळाला लावला आहे. यात कॉंग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांचाही समावेश आहे. पण त्यांच्या पक्षप्रवेशावरून दक्षिण सोलापूर तालुक्यातील भाजपचे विद्यमान आमदार तथा माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्या समर्थकांनी कडाडून विरोध केला आहे. या विरोधात त्यांनी मंगळवारी सोलापुरात आंदोलनही केले.
शिस्तप्रिय समजल्या जाणा?या भाजपतच हे आंदोलन झाल्यामुळे त्याची राज्यभर चर्चा झाली होती. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी उपरोक्त दावा केला आहे. वारूळ मुंग्या बांधतात पण एकदा का वारूळ पूर्ण झालं की; त्यात राहायला मात्र विषारी नाग येतात...! अशा शब्दात त्यांनी टीकास्त्र डागले.

## पुण्यात दिवाळीच्या दिवशी गोंधळ

### ४० हून अधिक आगीच्या घटना

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २२:**
दिवाळीच्या मंगलमय सणात पुण्यातील वातावरण एकीकडे पाडवा पहाटेच्या पारंपरिक जल्लोषाने उजळले, तर दुसरीकडे शहरातील विविध भागांत लागलेल्या सलग 40 हून अधिक आगींनी प्रशासनाला अक्षरशः तारेवरची कसरत करायला लावली.
दरम्यान, सारसबाग येथील सुप्रसिद्ध दिवाळी पाडवा पहाट कार्यक्रमात दोन गटांमध्ये वाद आणि हाणामारी झाल्याने कार्यक्रमाला गालबोट लागले. हिंदुत्त्ववादी संघटनांकडून मिळालेल्या धमक्यांच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम आधीच वादात सापडला होता. पोलिसांच्या सतर्कतेमुळे पुढील अनर्थ टळला असला तरी दिवाळीच्या दिवसाची सुरुवातच गोंधळात झाली.
सारसबागेत पहाटे तीन वाजल्यापासूनच पुणेकर तरुणाईचा मोठा जमाव पाडवा पहाट कार्यक्रमासाठी जमा झाला होता. पारंपरिक वेषात, हातात झेंडे व दिमाखदार साजशृंगारासह युवकांनी सांस्कृतिक सादरीकरणाचा आनंद घेतला. तथापि, पहाटे साडेपाचच्या सुमारास किरकोळ धक्का लागल्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद झाला आणि त्याचे पर्यवसान हाणामारीत झाले. दोन्ही गटातील तरुणांनी एकमेकांवर धाव घेताच परिसरात तणाव निर्माण झाला. तैनात पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. काही तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून चौकशी सुरू आहे.
गेल्या 28 वर्षांपासून चालत असलेल्या या पाडवा पहाट कार्यक्रमाला यंदा हिंदुत्ववादी संघटनांकडून विरोध झाला होता. या संघटनांनी कार्यक्रम उधळून लावण्याच्या धमक्या दिल्या होत्या. त्यामुळे आयोजकांनी काही दिवसांपूर्वी कार्यक्रम रद्द करण्याची घोषणा केली होती. मात्र, पुणे पोलिसांनी आवश्यक सुरक्षा पुरवण्याचे आश्वासन दिल्यानंतर आयोजकांनी कार्यक्रम पुन्हा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सारसबाग आणि परिसरात पहाटेपासूनच कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.
लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शहरात सलग 40हून अधिक ठिकाणी आग लागल्याच्या घटना नोंदवण्यात आल्या. सकाळी 5.12 पासून ते दुपारी 12 वाजेपर्यंत अग्निशमन विभागाला सतत कॉल येत राहिले. हडपसर, वारजे, कोथरूड, कसबा पेठ, धानोरी, सिंहगड रोड, बाणेर, औंध, येरवडा, विश्रांतवाडी, मार्केट यार्ड, कोंढवा खुर्द अशा सर्व भागांमध्ये एकापाठोपाठ एक आग लागल्याच्या घटना समोर आल्या.
काही ठिकाणी इमारतींच्या गॅलऱ्यांमध्ये, पार्किंगमध्ये, झाडांना, गवताला किंवा कचऱ्याला आग लागल्याच्या नोंदी आहेत, तर काही ठिकाणी दुकानं आणि घरांनाही आग लागल्याचं दिसून आलं. पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सकाळी 11 वाजेपर्यंत एकूण 42 ठिकाणी आग लागल्याचे कॉल प्राप्त झाले होते.
बहुतेक ठिकाणी आगीचे कारण आकाशकंदील, फटाके किंवा इलेक्ट्रिक शॉर्टसर्किट असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. सुदैवाने या सर्व घटनांमध्ये जीवितहानी झालेली नाही, मात्र काही ठिकाणी किरकोळ जखमी झाल्याच्या घटना आहेत.
अग्निशमन दलाच्या सर्व वाहनांची अक्षरशः धावपळ सुरू होती. सकाळी 5 वाजल्यापासून 12 वाजेपर्यंत अग्निशमन दलाच्या सुमारे 25 गाड्यांनी 40 हून अधिक ठिकाणी आगी विझवल्या. मध्यवर्ती अग्निशमन केंद्र, नवले, वारजे, बाणेर, येरवडा, कोथरूड, धानोरी आणि गंगाधाम केंद्रातील अधिकारी आणि जवान दिवसभर रस्त्यावर होते. काही ठिकाणी आग नियंत्रणात आणण्यासाठी जवळपास दीड-दोन तास लागले. दिवाळीच्या दिवशीसुद्धा अग्निशमन कर्मचारी नागरिकांच्या सुरक्षेसाठी झटत होते.

## कपड्यांच्या बाजारात २५ टक्के वाढ : दिवाळीचा हंगाम लाभदायी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२:**
दिवाळी हंगामात महाराष्ट्रातील कपड्यांच्या बाजारात सुमारे २५% वाढ नोंदवली गेली आहे. कॉटन फॅब्रिकची मागणी विशेषतः वाढली असून, प्लेन, चेक्स आणि लायनिंग पॅटर्नला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे.
या वाढीनंतरही लहान व्यापाऱ्यांच्या अडचणी कायम आहेत. भारत मर्चंट चेंबरचे उपाध्यक्ष विनोद गुप्ता यांनी सांगितले की, मोठे व्यापारी हजारो डिझाईन्ससह ग्राहकांना आकर्षित करत आहेत, तर लहान व्यापारी मर्यादित डिझाइन्समुळे स्पर्धेत मागे पडत आहेत.
१९६० सालापासून सक्रिय असलेली ही संघटना सध्या ११०० व्यापाऱ्यांचे प्रतिनिधित्व करते. क्लोदिंग मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (सीएमएआय) चे चीफ मेंटर राहुल मेहता यांच्या मते, यंदाच्या सणासुदीच्या हंगामात कपड्यांच्या बाजाराची कामगिरी अपेक्षेपेक्षा कमकुवत राहिली. इंडियन एथनिक आणि फेस्टिव्ह वेअर सेगमेंट मध्ये विक्रीत घट झाली असून त्यामागचे मुख्य कारण म्हणजे वाढलेले दर आणि जीएसटीमध्ये झालेली वाढ आहे.
मेहता सांगतात की, २५०० रुपयांपेक्षा कमी किंमतीच्या कॅज्युअल वेअर मध्ये ५-७% वाढ दिसली, तर त्यापेक्षा जास्त किंमतीच्या उत्पादनांमध्ये १०-१५% घट झाली. याचा परिणाम विशेषतः ४ हजार ते ७ हजारांच्या रेंजमध्ये काम करणाऱ्या ब्रँड्सवर झाला, जसे की किलर, बीबा, डब्ल्यू आणि स्पायकर.
त्यांनी स्पष्ट केले की, जीएसटी आणि खर्चात झालेल्या वाढीमुळे या ब्रँड्ससाठी ६-७% वाढही



आव्हानात्मक ठरत आहे. पूर्व आणि ईशान्य भारतात मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे विक्रीवर अधिक दबाव आला, तर पश्चिम आणि मध्य भारतात परिस्थिती तुलनेने स्थिर राहिली. मेहता यांच्या मते, लोअर प्राइस सेगमेंट सध्या स्थिर आहे, परंतु हाय-एंड सेगमेंटला पुनरुज्जीवित करण्यासाठी किंमत धोरण आणि कर संरचनेत सुधारणा करणे आवश्यक आहे.

**जीएसटी बदलांचे परिणाम**
पॉलिस्टर मिक्स धाग्यांवरील जीएसटी १२% वरून ५% केल्याने खर्च घटला आणि विक्रीत वाढ झाली. मात्र, २५०० रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या कपड्यांवर जीएसटी १२% वरून १८% केल्याने महागड्या कपड्यांची मागणी घटली. अशी मागणी आहे की संपूर्ण वस्त्रोद्योगाला ५% स्लॅबमध्ये आणावे.

**ऑनलाइन डिस्काउंट्सचा दबाव**
फेडरेशन ऑफ रिटेल ट्रेडर्स वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष विरन शाह यांनी सांगितले की, ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स आणि मोठ्या ब्रँड्सकडून दिल्या जाणाऱ्या मोठ्या सवलतींमुळे पारंपरिक बाजारावर दबाव वाढला आहे. विक्री आता अनेक चॅनेल्समध्ये विभागली गेली आहे. ज्वेलरी, सोने-चांदीची मागणी वाढली असून, शेअर बाजारातील सुधारणा खरेदीच्या मूडला चालना देत आहे. मात्र, पारंपरिक रिटेलर्सनी बदलत्या ट्रेंड्सशी जुळवून घ्यावे लागेल.
२५०० रुपयांपेक्षा कमी किंमतीच्या कॅज्युअल वेअर मध्ये ५-७% वाढ दिसली, तर त्यापेक्षा जास्त किंमतीच्या उत्पादनांमध्ये १०-१५% घट झाली. याचा परिणाम विशेषतः ४ हजार ते ७ हजारांच्या रेंजमध्ये काम करणाऱ्या ब्रँड्सवर झाला. पूर्व आणि ईशान्य भारतात विक्रीवर पाऊस व भुस्खलामुळे अधिक दबाव आला, तर पश्चिम आणि मध्य भारतात परिस्थिती तुलनेने स्थिर राहिली.

# नवनीत राणांचे बच्चू कडूंना खुले आव्हान

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. २२ :**

माजी खासदार नवनीत राणा यांनी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी आमदार बच्चू कडू यांना आता खुले आव्हान दिले आहे. अनेक लोक आजीचे माजी झालेत. कारण, त्यांनी कधीच आपल्या खिशात हात टाकला नाही. त्यांच्याकडे फक्त 'इनकमिंग'. 'आऊटगोइंग' नाही. मी त्यांना दहावेळा म्हणाले की, तुमची संपत्ती मला द्या, माझी संपत्ती तुम्ही घ्या. 'नौटंकी'मुळेच त्यांना एका शेतकऱ्याच्या मुलाने पराभूत केले, अशी टीका नवनीत राणा यांनी केली.



नवनीत राणा यांनी काल आपल्या निवासस्थानी अंध, अपंग आणि कुष्ठरोगी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोनवरून राणा दाम्पत्याच्या या उपक्रमाचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याच वेळी प्रसार माध्यमांशी बोलताना राणा यांनी राजकीय विरोधकांवर जोरदार टीका केली. राणा म्हणाल्या, सध्या बरेच लोक 'नौटंकी' करत आहेत. बाहेर फिरून आमदारांना मारून टाका असे सांगत आहेत. पण तुम्ही चारवेळा आमदार होतात. दोनवेळा मंत्री राहिलात. तेव्हा शेतकऱ्यांचा कळवळा का आला नाही, अशा शब्दांत त्यांनी कडू यांच्यावर टीका केली.

अचलपूरच्या माजी आमदारांकडे कोट्यवधींची संपत्ती असल्याचा थेट आरोप नवनीत राणा यांनी केला. आमदारांना कथितपणे मारून टाकण्याची भाषा केल्याबद्दलही राणा यांनी बच्चू कडू यांच्यावर टीकास्त्र सोडले. बच्चू कडू यांनी बुलढाणा जिल्ह्यात एका सभेत बोलताना शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यापेक्षा आमदारांना कापून टाका, असे वादग्रस्त वक्तव्य कडू यांनी केले होते. त्यावर प्रतिक्रिया उमटत आहेत. नवनीत राणा या बच्चू कडू यांच्यावर सातत्याने टीका करतात. लोकसभा निवडणुकीच्या वेळी बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांच्या विरोधात जोरदार मोहीम उघडली होती. नवनीत राणा या पराभूत झाल्या. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत बच्चू कडूंना पराभव पत्करावा लागला. त्यामुळे नवनीत राणा यांच्या टीकेची धार वाढली. राज आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीबद्दल बोलताना नवनीत राणा म्हणाल्या, कुटुंब एकत्र येणे ही आपली संस्कृती आहे. आपण ती जपली पाहिजे. आज संपूर्ण महाराष्ट्र दोन भाऊ एकत्र आल्याचे पाहत आहे. पण ते कुटुंबासाठी नाही, तर फक्त सत्ता व खुर्चीसाठी एकत्र आले आहेत. फक्त पैसा आणि तोड्या करण्यासाठी हे दोन्ही भाऊ एकत्र आले आहेत. ठाकरे परिवार हे 'मजबुरी'चे दुसरे नाव झाले आहे.

## जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनासह १.९६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**हिंगोली :** वसमत शहरातील मोंढा भागात जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनासह १.९६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून यामध्ये नऊ म्हैसवर्गीय प्राण्यांचा समावेश आहे. या प्रकरणी वसमत शहर पोलिस ठाण्यात मंगळवारी ता. २१ सायंकाळी गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत शहरातील एक टाटाएस वाहनातून जनावरांची वाहतूक केली जात असल्याची माहिती शहर पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिस निरीक्षक सुधीर वाघ, उपनिरीक्षक शिवाजी बोंडले, जमादार नितीन रामदिनवार, काशीनाथ भोपे, मात्रे, शेख समी यांच्या पथकाने मंगळवारी सकाळी पासूनच वाहनांची तपासणी सुरु केली होती. वसमत तेथील मोंढा भागातील कमानीजवळ एक वाहन उभे होते. पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन वाहन चालका शेख मुजीब याची चौकशी केली असता त्याने सुरवातीला उडवा उडवीची उत्तरे दिली.

# श्रद्धा, भक्तीचा संगम असलेल्या घंटीबाबा यात्रोत्सवाला सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी
**दिग्रस, दि. २२ :**

शहरातील श्रद्धा, भक्ती आणि उत्साह यांचा संगम असलेली महान तपस्वी संत श्री घंटीबाबा यांची वार्षिक यात्रा मोठ्या उत्साहात सुरू झाली. दरवर्षी घंटीबाबा मंदिर ते लाठीवाला पेट्रोल पंप या पारंपरिक मार्गावर यात्रा भरवली जात होती. यंदा नागरिकांच्या सोयीसाठी आणि कायदा-सुव्यवस्था लक्षात घेऊन यात्रेचे ठिकाण बदल करण्यात आले आहेत. यंदा प्रथमच ही यात्रा वडवाला जीन परिसरात आयोजित करण्यात आली आहे. गुरुवारी दि. १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता थाटात उद्घाटन पार पडले. दिग्रस शहरातील राजकीय, सामाजिक पदाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते यात्रेला शुभारंभ झाला.



पूजा ॲम्युजमेंटचे व्यवस्थापन, आकर्षक लाईटिंग, सुंदर सजावट आणि भक्तिपूर्ण संगीतामुळे संपूर्ण परिसर उत्साहात न्हाऊन निघाला.

यात्रेच्या निमित्ताने विविध मनोरंजन साधने, पाळणे, झुले, मिनी ट्रेन, बाल मनोरंजन साधने, वस्तूंची दुकाने, स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल्स तसेच वस्त्र आणि खेळण्यांची प्रदर्शने उभारण्यात आली आहेत. दिग्रसकरांसाठी ही यात्रा यंदा एक नवा, अविस्मरणीय अनुभव ठरत आहे. प्रथमच वडवाला जीन परिसरात सुसज्ज, सुरक्षित पद्धतीने यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सोयीसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था, पोलिस बंदोबस्त, स्वच्छता आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील नागरिक यात्रेचा आनंद घेत आहेत. श्रद्धा, संस्कृती आणि मनोरंजनाचा संगम झालेली ही यात्रा दिग्रसच्या सामाजिक आणि धार्मिक एकतेचे प्रतिक ठरत आहे.

# मूकबधीर बालकाच्या आयुष्यात 'ध्वनी'ची पहाट

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. २२ :**

येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) मध्ये जन्मजात कर्णबधीर (मूकबधीर) असलेल्या एका साडेचार वर्षांच्या बालकावर यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया करण्यात आली. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून आणि जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून अमरावती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये पहिल्यांदाच ही ऐतिहासिक शस्त्रक्रिया करण्यात आली.या शस्त्रक्रियेनंतरची महत्त्वाची प्रक्रिया म्हणजे 'स्विच ऑन' (साउंड प्रोसेसर ॲक्टिव्हेशन) नुकतीच पार पडली, आणि या क्षणी बालकाने



पहिल्यांदाच आवाज ऐकल्याने उपस्थित सर्वच जणांसाठी तो एक अत्यंत भावनिक आणि आनंददायी क्षण ठरला. आवाज ऐकताच बालकाने दिलेला सकारात्मक आणि हृदयस्पर्शी प्रतिसाद उपस्थितांना गहिवरून टाकणारा होता.या महत्त्वपूर्ण प्रसंगी आमदार संजय खोडके आणि सुलभा खोडके, सुप्रसिद्ध कॉक्लियर इम्प्लांट सर्जन डॉ. जीवन वेदी (विभागप्रमुख, नाक-कान-घसा विभाग, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर), तसेच ऑडिओलॉजिस्ट लक्ष्मण मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रक्रियेनंतर पुढील दोन वर्षांपर्यंत बालकाने नियमितपणे ऑडिओलॉजिस्टच्या संपर्कात राहून ऑडिओ-स्पीच थेरपी घेतल्यास त्याला बोलणे शिकणे सुलभ होईल.

रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली, विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे, डॉ. जीवन वेदी, ऑडिओलॉजिस्ट लक्ष्मण मोरे, औषध निर्माण अधिकारी योगेश वाडेकर यांनी या शस्त्रक्रियेत विशेष योगदान दिले.

गरीब आणि गरजू रुग्णांसाठी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमार्फत आधुनिक आणि महागड्या उपचार सुविधा विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जात आहेत. या यशस्वी आणि दुर्मीळ शस्त्रक्रियेमुळे एका बालकाच्या आयुष्यात अमूल्य बदल घडून आला आहे, याबद्दल आमदार संजय खोडके यांनी डॉक्टर, परिचारिका, रुग्णालय प्रशासन आणि सर्व कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले.

# महाबोधी विहार मुक्ती आंदोलनात अकोल्याचे कार्यकर्ते

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. २२ :** मुंबई येथील आझाद मैदानावर आयोजित आंदोलनात भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या आंदोलनात अकोला जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. महाबोधी विहाराचा ताबा तत्काळ न मिळाल्यास राज्यभर तीव्र आंदोलनाचा इशाराही या प्रसंगी देण्यात आला. बिहारमधील बोधगया येथे महाबोधी महाविहार हे जगातील बौद्ध धर्मीयांसाठी अत्यंत पवित्र स्थळ आहे. येथेच भगवान गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती. मात्र दुर्दैवाने या ठिकाणी व्यवस्थापनावर बौद्ध धर्मीयांचे पूर्ण नियंत्रण नाही. बिहार सरकारने सन १९४९ मध्ये महाबोधी मंदिर व्यवस्थापन कायदा लागू केला. त्या माध्यमातून महाविहाराच्या देखरेखीचे आणि व्यवस्थापनाचे काम करण्यात येते. मात्र विज्ञाननिष्ठ तथागत बुद्धाचा धम्म सांगितला जात नाही. त्यामुळे



१९४९ चा कायदा त्वरित रद्द करावा व महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन व नियंत्रण बौद्ध धर्मियांकडे सुपूर्द करावे, या मागणीसाठी यापूर्वी आंदोलन करण्यात आले. दरम्यान मुंबईत आझाद मैदानावर 'महाबोधी विहार मुक्ती आंदोलनात अकोला जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला यात यात भीमशक्ती सामाजिक संघटनेचे प्रा. विजय आठवले, ॲड. भूषण गायकवाड, अनिल गवई, मधुसूदन भटकर, अनिल तायडे, प्रा. डॉ. बाळकृष्ण खंडारे, प्रा. सुनील कांबळे, विद्याधर मोहोड, संदेश गवई, प्रा. शैलेश इंगळे, सुशील कांबळे, शैलेंद्र लंकेश्वर, पद्माकर वासनिक किशोर सिरसाट, बाळकृष्ण सिरसाट यांच्यासह जिल्ह्यातील बौद्ध बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सन १९४९ चा महाबोधी टेंपल ॲक्ट तत्काळ रद्द करावा.

# राज ठाकरे हे कुशल संघटक : मात्र भूमिकेत सातत्य नाही

## भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांचा खोचक टोला

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. २० :**

राज ठाकरे हे कुशल संघटक आहेत. मात्र, त्यांच्या भूमिकेत सातत्य नाही, कधी ते मोदींची स्तुती करतात तर कधी लाव रे व्हिडिओ म्हणत मोदींवर टीका करतात असे मत भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, त्यांचा राजकीय भरती-ओहोटीचा जो सिद्धांत आहे त्याप्रमाणे ते नवे आरोप करत असल्याची खोचक टीका सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, जेव्हा बाळासाहेब ठाकरे यांचा मताधिकार काढण्यात आला, तेव्हा त्यांनी निवडणूक आयोगाला काँग्रेसचा बटीक आहे असे म्हटले होते, मतदार यादी हा काही फक्त निवडणूक आयोगाचा अधिकार नाही, तुम्ही देखील ती यादी सदोष आहे निर्दोष आहे हे तपासू शकता असे मुनगंटीवार म्हणाले.



पुढे बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, २०१४ मध्ये केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आले, तेव्हा तुम्ही असे म्हणाला होता की केंद्रात मनमोहन सिंग यांनी आणि राज्यात पृथ्वीराज चव्हाण यांनी बोगस मतदार नोंदणी होऊ दिली.

निवडणूक आयोग एकटा मतदार नोंदणी करु शकत नाही, अगदी तलाठ्यापासून ते जिल्हाधिकाऱ्यापर्यंत हजारो लोक या प्रक्रियेत सामील होतात. त्यामुळे निवडणूक आयोगातील एखाद्या अधिकाऱ्याला वाटले देखील की आपण कुठल्या विशिष्ट पक्षाला मदत करावी, तर या प्रक्रियेत असलेले हजारो लोक हा विचार तिथेच ठेचून टाकतील, त्यामुळे हजारो लोक मिळून हे षड्यंत्र करत आहेत असे म्हणणे गोबेल्सला देखील शक्य झाले नसते. जर तुमच्याकडे पुरावे असतील तर ते कोर्टात सादर करा असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले. पत्रकार परिषद घेऊन त्याने फक्त खमंग बातम्या होतील दुसरे काही होणार नाही. तुमच्याकडे जर योग्य पुरावे असतील तर सुप्रीम कोर्ट योग्य ते निर्देश देईल पण सगळी यंत्रणाच भ्रष्ट आहे असे म्हणणे काही योग्य नाही.

आंदोलन करणे प्रत्येक पक्षाचा अधिकार आहे. पण निवडणूकच होऊ देणार नाही असे म्हणणे म्हणजे काय? असा सवाल मुनगंटीवार यांनी केला. सुप्रीम कोर्टाने ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे निवडणूक आयोग देखील यामध्ये काही करु शकत नाही, तुमच्याकडे जर ठोस पुरावे असतील तर कोर्टात जा आणि ३१ जानेवारी पर्यंत निवडणूक पूर्ण करण्याचे जे आदेश आहे ते रद्द करा, सरकार काही सुप्रीम कोर्टाच्या आदेशाबाहेर जाऊ शकत नाही, असे सुधीर मुनगंटीवार यांनी राज ठाकरे यांना म्हटले आहे.

# सीमावर्ती पिंप्री गावात डायरियाचा प्रादुर्भाव



**बुलडाणा, दि. २२ :** बुलढाणा जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील संग्रामपूर तालुक्यातील दुर्गम भागातील पिंप्री आडगाव या गावात अतिसाराची मोठ्या प्रमाणात झाल्याचे वृत्त आहे. दूषित पाणी पुरवठ्या मुळे डायरीयाची लागण झाली आहे. ऐन दिवाळी सणाच्या धामधूमीत अतिसाराने हातपाय पसरले असून आबालवृद्ध गावकऱ्यांना लागण झाल्याने पिंप्री आडगाव या दुर्गम भागातील गावकरी हवालदिल झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार या गावांमध्ये नळ योजना कार्यान्वित नाही. शेकडो ग्रामस्थांना एका विहिरीवरून पाणी भरावे लागते. विहिरीला जे झरे फुटलेले आहेत ते दूषित पाण्याचे असल्यामुळे या ग्रामस्थांना अतिसाराची लागण झाली. गावात अनेकात उलट्या, संडास, मळमळ अश्या लक्षणाची अनेक रुग्ण आहे. मागील काही दिवसापासून डायरीया गावात ठाण मांडून असल्याचे गावकर्यांनी सांगितले. तसेच विहिरीवर जाळी बसविली असून त्यावर माकड बसतात आणि शौच व मूत्रविधी करतात. तेच पाणी आम्हाला प्यावे लागते असं ग्रामस्थ सांगतात. अतिसाराची लागण झाल्यानंतर आरोग्य यंत्रणा गावात आली नसल्याचा आरोप गावकर्यांनी केला. आरोग्य यंत्रणा या ठिकाणी पोहोचलीच नसून त्यांनाच यांना खाजगी रुग्णालयात जावे लागते. किंवा किमान सात किलोमीटर दूर कच्चा रोड पार करत वानखेड ( तालुका संग्रामपूर ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वतःच्या खर्चाने जावे लागते. दिवाळीच्या उत्सवात देखील गावावरील अतिसाराच संकट कायम आहे.गावातील संतप्त महिलांनी प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधी समवेत बोलतांना बोलतांना वरील माहिती दिली. महिला म्हणाल्या की, ग्राम पंचायतचे याकडे सर्रास दुर्लक्ष होत आहे. निवडणुका असल्या तर सरपंच आणि इतर पदाधिकारी, पुढारी गावात येतात. मात्र गावात अतिसाराच थैमान असतांना मात्र ग्रामपंचायत चे कुणीच लक्ष देट नाहीये. यामुळे गावकरी भयभीत झाल्याचे चित्र आहे. दरम्यान जिल्हा आरोग्य विभागाच्या वरिष्ठ सूत्रांनी गावातील साथ नियंत्रणात असल्याचा दावा केला आहे. काही दिवसापूर्वी दहा बारा रुग्ण आढळले होते. उपचार नंतर ते बरे झाले आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर चंद्रशेखर मारोडे व वानखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैधकीय अधिकारी डॉक्टर कड यांनी गावात भेट दिली. विहिरीतील जल नमुन्याचा अहवाल 'ओटी निगेटिव्ह' आला आहे. त्याची माहिती ग्राम पंचायतला देण्यात आले असून त्यांनी तातडीने उपाय योजना करणे आवश्यक आहे.


## कार्यालय खापा नगर परिषद, जिल्हा-नागपूर.

क्र. नपखा/मा.व.अ.वि/२१३८/२०२५ दि. २०/१०/२०२५

**निविदा सूचना**

मुख्याधिकारी, खापा नगर परिषद यांचे वतीने माझी वसुंधरा अभियानांतर्गत नगरपरिषदेच्या हद्दीत ३५ किलोवॅट क्षमतेच्या ऑन ग्रिड सौर ऊर्जा प्रणालीची उपलब्धता, स्थापना, कार्यान्वित करणे आणि समाधानकारक चाचणी देण्याचे काम करावयाचे आहे. तरी इच्छुक मान्यता प्राप्त/अनुभवी कंत्राटदार कडून उपरोक्त कामाची निविदा https://gem.gov.in/ या शासकीय संकेस्थळवर मागविण्यात येत आहे. निविदा सादर करण्याची कालावधी दि. २०/१०/२०२५ ते दि. ३०/१०/२०२५ रोजी सायं ०५.०० पर्यंत आहे. निविदेशी संबंधित पुढील सर्व सूचना शासकीय संकेस्थळवर पहावयास मिळेल.

मुख्याधिकारी
खापा नगर परिषद



## ग्राम पंचायत जामठा

**जाहीर सूचना**

गावातील समस्त नागरिकांना दिवाळीच्या स्वस्थ शुद्ध व आनंदमय आणि आरोग्यमय शुभेच्छा. शासनाच्या माझी वसुंधरा अभियान २०२५-२६ अंतर्गत आपल्या ग्रामपंचायतीने सहभाग घेतलेला आहे. आपल्या प्रिय गावाला स्वच्छ, सुंदर, हरित आणि निरोगी करून प्रथम क्रमाकावर आणण्याकरिता आपल्याला आपल्याचं सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. त्यासाठी आपण आपले घर व आपला परिसर १ स्वच्छ व सुंदर ठेवावा २. प्लस्टिकच्या वस्तु, पिशव्या याचा वापर टाळावा, ३. आपल्या परिसरात जास्तीत जास्त झाडे लावावीत आणि जगवावीत. ४. दिवाळी पर्यावरणपूरक म्हणजेच ईकोफ्रेंडली साजरी करावी तसेच ५. पर्यावरणपूरक रित्या वर्षातील सर्वच सण साजरे करावेत. ६.वातावरणातील बदलांवर लक्ष्य ठेऊन आपल्या बचावाची तयारी ठेवावी. ७. इलेक्ट्रिक वाहनाचा वापर करावा. ८. नियमितपणे ग्रामपंचायतीच्या करांचा भरणा करावा. ९. मोठ्याने कर्कष्य आवाजात डिजे किंवा इतर वाद्य वाजवून ध्वणीप्रदूषण करू नये. १०. कृषि किवा कोठलाही कचरा उघड्यावर जाळू नये.

डासांच्या पासून पसरणारे डेंग्यु, चिकन गुणिया, मांकिपोक्स तसेच इतर आजार टाळण्या करिता आपल्या जवळील आरोग्य केंद्रात संपर्क साधावा.

| सचिव | सरपंच | उपसरपंच |
|---|---|---|
| चंद्रशेखर मुंगले | श्री.योगेशजी मारोतराव टेकाम | श्रीमती. कौशल्याबाई चिरकुटजी रोकडे |

आणि समस्त सदस्यगण तथा कर्मचारी वर्ग.

१) श्री. धनराजजी शालीकराम ढगे २) सौ. नम्रताताई गीतेश्वर अडमते ३) श्रीमती. इंदुबाई नारायणजी भोपरे
४) श्री. विलासजी केशवजी भोपरे ५) सौ. मंजुषाताई सचिनजी ठाकरे ६) सौ. प्रितीताई देवानंद वानखेडे



## ग्राम पंचायत वडगाव (गुजर)

**जाहीर सूचना**



गावातील समस्त नागरिकांना दिवाळीच्या स्वस्थ शुद्ध व आनंदमय आणि आरोग्यमय शुभेच्छा. शासनाच्या माझी वसुंधरा अभियान २०२५-२६ अंतर्गत आपल्या ग्रामपंचायतीने सहभाग घेतलेला आहे. आपल्या प्रिय गावाला स्वच्छ, सुंदर, हरित आणि निरोगी करून प्रथम क्रमाकावर आणण्याकरिता आपल्याला आपल्याचं सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. त्यासाठी आपण आपले घर व आपला परिसर १ स्वच्छ व सुंदर ठेवावा २. प्लस्टिकच्या वस्तु, पिशव्या याचा वापर टाळावा, ३. आपल्या परिसरात जास्तीत जास्त झाडे लावावीत आणि जगवावीत. ४. दिवाळी पर्यावरणपूरक म्हणजेच ईकोफ्रेंडली साजरी करावी तसेच ५. पर्यावरणपूरक रित्या वर्षातील सर्वच सण साजरे करावेत. ६.वातावरणातील बदलांवर लक्ष्य ठेऊन आपल्या बचावाची तयारी ठेवावी. ७. इलेक्ट्रिक वाहनाचा वापर करावा. ८. नियमितपणे ग्रामपंचायतीच्या करांचा भरणा करावा. ९. मोठ्याने कर्कष्य आवाजात डिजे किंवा इतर वाद्य वाजवून ध्वणीप्रदूषण करू नये. १०. कृषि किवा कोठलाही कचरा उघड्यावर जाळू नये.

डासांच्या पासून पसरणारे डेंग्यु, चिकन गुणिया, मांकिपोक्स तसेच इतर आजार टाळण्या करिता आपल्या जवळील आरोग्य केंद्रात संपर्क साधावा.



| सरपंच | उप सरपच |
|---|---|
| सौ. रुपाली विजयजी लकडे | श्री. देवरावजी कवडुजी निमकर |

आणि समस्त सदस्यगण तथा कर्मचारी वर्ग.

१) चि. गणेशजी सुधाकरजी हागे २) सौ. शारदा कृष्णाजी खाडे ३)श्री. निखीलजी क. डोईफोडे
४) सौ. रुपाली मुकेशजी लोडे ५) सौ. पोर्णिमा विठ्ठलजी भोंग ६) सौ. शुभांगी संदिपजी सुरसकर



## ग्राम पंचायत डेगमा (खुर्द)

**जाहीर सूचना**



गावातील समस्त नागरिकांना दिवाळीच्या स्वस्थ शुद्ध व आनंदमय आणि आरोग्यमय शुभेच्छा. शासनाच्या माझी वसुंधरा अभियान २०२५-२६ अंतर्गत आपल्या ग्रामपंचायतीने सहभाग घेतलेला आहे. आपल्या प्रिय गावाला स्वच्छ, सुंदर, हरित आणि निरोगी करून प्रथम क्रमाकावर आणण्याकरिता आपल्याला आपल्याचं सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. त्यासाठी आपण आपले घर व आपला परिसर १ स्वच्छ व सुंदर ठेवावा २. प्लस्टिकच्या वस्तु, पिशव्या याचा वापर टाळावा, ३. आपल्या परिसरात जास्तीत जास्त झाडे लावावीत आणि जगवावीत. ४. दिवाळी पर्यावरणपूरक म्हणजेच ईकोफ्रेंडली साजरी करावी तसेच ५. पर्यावरणपूरक रित्या वर्षातील सर्वच सण साजरे करावेत. ६.वातावरणातील बदलांवर लक्ष्य ठेऊन आपल्या बचावाची तयारी ठेवावी. ७. इलेक्ट्रिक वाहनाचा वापर करावा. ८. नियमितपणे ग्रामपंचायतीच्या करांचा भरणा करावा. ९. मोठ्याने कर्कष्य आवाजात डिजे किंवा इतर वाद्य वाजवून ध्वणीप्रदूषण करू नये. १०. कृषि किवा कोठलाही कचरा उघड्यावर जाळू नये.

डासांच्या पासून पसरणारे डेंग्यु, चिकन गुणिया, मांकिपोक्स तसेच इतर आजार टाळण्या करिता आपल्या जवळील आरोग्य केंद्रात संपर्क साधावा.



| सरपंच | उप सरपच | ग्राम सचिव |
|---|---|---|
| सौ. विद्या महेन्द्र गोरामन | श्री. प्रविण पंढरी खाडे | संदीप सुधाकर बोंदाडे |

आणि समस्त सदस्यगण तथा कर्मचारी वर्ग.

१) श्री. पंढरी पिराजी करपाते २) श्री. आशिष भिमराव उईके ३) श्री. शेखार दशरथ पवार
४) सौ. अश्विनी प्रदीप इरपाते ५) सौ. दिपाली समिर नेहारे ६) सौ.बेबी देविदास मडावी
७) सौ. मंदा दिपक भागाणगरे ८) सौ. सितारा सुरेन्द्र गोरामन



## गट ग्राम पंचायत मंगरूळ

**जाहीर सूचना**



गावातील समस्त नागरिकांना दिवाळीच्या स्वस्थ शुद्ध व आनंदमय आणि आरोग्यमय शुभेच्छा. शासनाच्या माझी वसुंधरा अभियान २०२५-२६ अंतर्गत आपल्या ग्रामपंचायतीने सहभाग घेतलेला आहे. आपल्या प्रिय गावाला स्वच्छ, सुंदर, हरित आणि निरोगी करून प्रथम क्रमाकावर आणण्याकरिता आपल्याला आपल्याचं सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. त्यासाठी आपण आपले घर व आपला परिसर १ स्वच्छ व सुंदर ठेवावा २. प्लस्टिकच्या वस्तु, पिशव्या याचा वापर टाळावा, ३. आपल्या परिसरात जास्तीत जास्त झाडे लावावीत आणि जगवावीत. ४. दिवाळी पर्यावरणपूरक म्हणजेच ईकोफ्रेंडली साजरी करावी तसेच ५. पर्यावरणपूरक रित्या वर्षातील सर्वच सण साजरे करावेत. ६.वातावरणातील बदलांवर लक्ष्य ठेऊन आपल्या बचावाची तयारी ठेवावी. ७. इलेक्ट्रिक वाहनाचा वापर करावा. ८. नियमितपणे ग्रामपंचायतीच्या करांचा भरणा करावा. ९. मोठ्याने कर्कष्य आवाजात डिजे किंवा इतर वाद्य वाजवून ध्वणीप्रदूषण करू नये. १०. कृषि किवा कोठलाही कचरा उघड्यावर जाळू नये.

डासांच्या पासून पसरणारे डेंग्यु, चिकन गुणिया, मांकिपोक्स तसेच इतर आजार टाळण्या करिता आपल्या जवळील आरोग्य केंद्रात संपर्क साधावा.



| सरपंच | उप सरपच | ग्रामपंचायत अधिकारी |
|---|---|---|
| श्री. ज्ञानेश्वर महादेव पवार | गोपिका पुरुषोत्तम इरपाते | श्री. पी. बी. ढाले |

आणि समस्त सदस्यगण तथा कर्मचारी वर्ग.

१) चंद्रकला गणेश भोयर २) योगेश्वर हरिश्चंद्र मरसकोल्हे ३) प्रमोद देवराव थोटे
४) सारिका दिलीप मेश्राम ५) नमिता राजेश ठाकरे ६) धीरजकुमार वानखेडे
ग्रामपंचायत परिचारक

# मुंबई मेट्रोमध्ये दिव्यांगांसोबत भेदभाव

शहरातील सार्वजनिक वाहतुकीत दिव्यांग प्रवाशांना मिळणारी सुविधा अजूनही अपुरी आणि असमान आहे. मेट्रोच्या लाईन 2 A व लाईन 7 मध्ये दिव्यांगांना प्रवासात सवलत मिळते, मात्र अत्यंत जवळच्या लाईन 3 मध्ये ही सवलत अजूनही लागू झालेली नाही. या भेदभावामुळे दिव्यांग प्रवाशांमध्ये रोष आणि असमाधानी वातावरण निर्माण झाले आहे.

मुंबईतील आरोग्य व दिव्यांग प्रतिनिधी दिपक कैतके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, एका मार्गावर सुविधा मिळवताना दुसऱ्यावर न मिळणे हे कधीच स्वीकारार्ह नाही. हा संपूर्ण शहरात दिव्यांगांच्या अधिकारांवरील घातक हल्ला आहे.

सध्याची परिस्थिती दर्शवते की, मेट्रो ऑपरेटरांचे वेगळे धोरण, स्मार्ट कार्ड प्रणालीतील तांत्रिक अडचणी आणि शासनातील समन्वयाचा अभाव हे दिव्यांग प्रवाशांचे हक्क पायमलित करणारे कारण ठरले आहे. या भेदभावामुळे प्रवाशांना दररोज आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

सामाजिक संघटना आणि हक्क रक्षण करणाऱ्या संस्था हे स्पष्ट करतात की, दिव्यांग व्यक्तींसाठी प्रवासात सवलत ही केवळ सुविधा नाही तर कायद्याने सुनिश्चित केलेला हक्क आहे. Persons with Disabilities (Equal Opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 आणि Rights of Persons with Disabilities Act, 2016 या कायद्यांनुसार राज्य व केंद्र सरकारला दिव्यांगांसाठी सार्वजनिक वाहतुकीत सवलत देणे बंधनकारक आहे.

दिव्यांग प्रवाशांचा अनुभव पाहता, मेट्रोच्या काही मार्गांवर सवलत मिळणे आणि काहीवर न मिळणे हा भेदभाव आणि दुय्यमतेचा स्पष्ट दाखला आहे. शहरातील मेट्रो प्रवाशांमध्ये संताप वाढला असून, समाजातील दुर्बल गटांची न्याय मिळावी यासाठी त्वरित कारवाई करण्याची मागणी वाढली आहे.

दिपक कैतके यांनी विधान केले की, जर त्वरित सुधारणा झाली नाही, तर आम्ही यासाठी अधिक आक्रमक



दीपक कैतके

पातळीवर सरकारला आणि मेट्रो ऑपरेटरला उत्तरदायी ठरवू. दिव्यांग प्रवाशांचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी जनतेला जागरूक करणे ही आपली जबाबदारी आहे.

मुंबईतील दिव्यांग प्रवाशांसाठी मेट्रो प्रवासात समान सवलत लागू करणे फक्त कायद्याचे पालन नाही, तर मानवी हक्क आणि सामाजिक न्यायाची गरज आहे.

सरकारी यंत्रणा, मेट्रो ऑपरेटर व नागरिक संघटना यांना एकत्र येऊन हा भेदभाव दूर करणे गरजेचे आहे, अन्यथा शहरातील सार्वजनिक वाहतुकीत दुय्यम प्रवासी तयार होतील.

मुंबईसारख्या प्रगत शहरात दिव्यांग प्रवाशांना आजही समान सवलतीपासून वंचित राहावे लागत आहे – हे दृश्य धक्कादायक आणि अस्वीकार्य आहे. मेट्रोच्या लाईन 2 अ आणि लाईन 7 वर दिव्यांगांना सवलत मिळत असताना, अत्यंत जवळच्या लाईन 3 वर तीच सवलत लागू न झाल्याने दिव्यांग प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

या भेदभावाविरोधात पत्रकार आणि आरोग्य व दिव्यांग हक्क कार्यकर्ते दीपक कैतके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तातडीने हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले आहे.

एका मार्गावर सवलत आणि दुसऱ्यावर नकार हे मुंबईसारख्या शहराला शोभत नाही. हा फक्त प्रशासनातील दोष नाही, तर दिव्यांगांच्या हक्कांवर घातक आघात आहे, असे कैतके यांनी स्पष्ट केले.

**भेदभावाचे मूळ : समन्वयाचा अभाव आणि तांत्रिक अडथळे**

मेट्रो ऑपरेटरांमधील वेगवेगळ्या धोरणांमुळे आणि स्मार्ट कार्ड प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे दिव्यांग प्रवाशांना दररोज आर्थिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. शासनातील समन्वयाचा अभाव यामुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनली आहे.

शहरातील विविध दिव्यांग संघटना आणि प्रवासी प्रतिनिधींनी एकमुखाने मागणी केली आहे की,हृसर्व मेट्रो लाईनवर समान सवलत लागू करावी आणि दिव्यांग प्रवाशांना सन्मानपूर्वक प्रवासाचा हक्क मिळावा. दीपक कैतके यांनी इशारा दिला आहे की, जर शासन आणि मेट्रो प्रशासनाने तत्काळ निर्णय घेतला नाही, तर दिव्यांग संघटनांसह मोठ्या प्रमाणात जनजागृती आणि आंदोलन उभारले जाईल.

**मानवी हक्कांचा प्रश्न**

मुंबईतील दिव्यांगांसाठी मेट्रो प्रवासातील सवलत हा केवळ सवलतीचा विषय नाही, तर मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यांचा प्रश्न आहे. शासन, मेट्रो प्रशासन आणि नागरी समाज यांनी एकत्र येऊन या भेदभावाला पूर्णविराम देणे आवश्यक आहे. असे न झाल्यास, मुंबईसारख्या महानगरात दिव्यांग प्रवासी दुय्यम नागरिक ठरण्याचा धोका निर्माण होईल.

## मतचोरी आणि सत्ताधिकाऱ्यांची शिरजोरी

# लोकशाहीच्या पायाखाली घडणारी भेग



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

देशाच्या लोकशाही व्यवस्थेवर आज गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. निवडणुकीच्या काळात वारंवार समोर येणाऱ्या मतचोरीच्या आरोपांनी आणि सत्ताधाऱ्यांच्या शिरजोरीच्या घटनांनी जनतेच्या विश्वासाचा पाया हादरवला आहे. लोकशाहीचा आत्मा असलेले मतदान आता अनेक ठिकाणी केवळ औपचारिकता ठरत चालले आहे, ही चिंतेची बाब आहे.

लोकशाही म्हणजे जनतेचा, जनतेसाठी आणि जनतेद्वारे चालणारा शासनप्रकार. परंतु आजच्या काळात हाच लोकशाहीचा पाया हलू लागला आहे. कारण वाढत चाललेली मतचोरी, सत्तेची लालसा आणि सत्ताधिकाऱ्यांची शिरजोरी.

निवडणूक हा लोकशाहीचा सण असावा, पण तो आता पैशांचा, सत्तेचा आणि प्रभावाचा खेळ बनत चालला आहे. आज बहुसंख्य राजकीय नेत्यांना सत्ता म्हणजे सेवा नव्हे, तर संपत्ती आणि स्वतःच्या अहंकाराची पूर्तता वाटू लागली आहे. त्यासाठी ते काहीही करायला मागेपुढे पाहत नाहीत. मग ती मतदारांची फसवणूक असो, मतदान यंत्रे हाताळण्याचे आरोप असोत किंवा जनतेच्या नावावर राजकारण करून स्वतःचे पोट भरणे असो. जनतेचा मतदानाचा अधिकार हा सर्वात पवित्र आहे. पण जेव्हा मतचोरीच्या अफवा आणि पुरावे समोर येतात, तेव्हा लोकांचा विश्वास डळमळतो. त्या क्षणी लोकशाहीला जणू कुणीतरी छेद दिला आहे, असे वाटते.

सत्तेची खुर्ची राखण्यासाठी काही नेत्यांना आता कायद्याची आणि नैतिकतेची बंधने गौण वाटू लागली आहेत. मतदारांची मने जिंकण्याऐवजी ती विकत घेण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. सोशल मीडियापासून मतमोजणी यंत्रांपर्यंत सर्वत्र शंका निर्माण होत आहेत. लोकशाहीचा पाया असलेला जनतेचा विश्वासच जेव्हा डळमळतो, तेव्हा लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात येते. या परिस्थितीत माध्यमांनी लोकशाहीचा प्रहरी म्हणून भूमिका पार पाडणे अत्यंत गरजेचे आहे. मतचोरीच्या प्रकरणांवर सत्य उघड करणारे निर्भय पत्रकार आणि सजग नागरिकच या काळाचा खरा आधार आहेत. समाजानेही भीती बाजूला ठेवून सत्याचा आवाज बुलंद करायला हवा.

मतदानाचा हक्क हा प्रत्येक नागरिकाला दिलेला पवित्र अधिकार आहे. पण जेव्हा त्या मताची चोरी होते, तेव्हा ती केवळ राजकीय फसवणूक नसते तर ती जनतेच्या आशेचा आणि विश्वासाचा अपमान असतो. जनतेच्या स्वप्नांवर गदा आणणारी ही प्रवृत्ती थांबवणे हे प्रत्येक सजग नागरिकाचे कर्तव्य आहे. मतांची चोरी म्हणजे जनतेच्या स्वप्नांची चोरी. एका मतदाराने मतदान करताना देशाबद्दल, भविष्याबद्दल आणि आपल्या मुलांबद्दल स्वप्न पाहिलेली असतात. पण जेव्हा ती मते विकली जातात, खोटी मोजली जातात किंवा लपवली जातात. तेव्हा ती केवळ मतांची नव्हे, तर जनतेच्या आशेची चोरी असते. हीच ती वेळ असते जेव्हा लोकशाही मृत्यूशय्येवर जाते आणि शासन एकाधिकारशाहीत रूपांतरित होते. सत्ताधिकाऱ्यांची शिरजोरी आम्हीच कायदा असा अहंकार.

सत्ता टिकवण्यासाठी आज अनेक जण कायद्यापेक्षा वर असल्याचा आविर्भाव करतात. प्रशासन, यंत्रणा, न्यायव्यवस्था सर्व काही आपल्या मुठीत असल्याचा भ्रम निर्माण होतो. सर्व काही आपल्या ताब्यात असल्याचा अहंकार त्यांच्या वर्तनातून झळकतो. पण विसरतात ते एकच सत्य की, जनतेच्या श्वासावर कोणाचेही नियंत्रण नाही. इतिहास साक्षी आहे, जिथे सत्ताधारी अहंकाराने माणुसकी विसरतात, तिथे क्रांती जन्म घेते आणि ती क्रांती बंदुकीची नसते. ती असते जनतेच्या मनातील जागृतीची क्रांती.

अहंकाराचे साम्राज्य नेहमी तात्पुरतेच ठरते. आज माध्यमांनीही लोकशाहीचे आरसे राहणे आवश्यक आहे. पण काही माध्यमे सत्तेच्या जाहिरातीचे पोस्टर बनली आहेत. सत्य बोलणा?्यांना आवाज द्या, आणि मतचोरीचा पदार्फाश करा, ही समाजाची आणि पत्रकारितेची जबाबदारी आहे.

लोकशाही फक्त मतदानाच्या दिवशी जिवंत नसते, ती दररोज जागी ठेवावी लागते. मतचोरी आणि सत्तेचा दुरुपयोग थांबवायचा असेल, तर प्रत्येक नागरिकाने आपल्या मताचा सन्मान करावा, विक्रीला नकार द्यावा आणि सत्तेच्या अन्यायाविरुद्ध ठाम उभे राहावे. आज गरज आहे धैर्याची, जागृतीची आणि प्रामाणिकपणाची.

कारण जोपर्यंत जनतेचे मत विकत घेतले जाते, तोपर्यंत खरी लोकशाही उभी राहू शकत नाही आणि जोपर्यंत सत्ताधाऱ्यांचा अहंकार मोडला जात नाही, तोपर्यंत न्यायाचा सूर्य उगवणार नाही. कारण, मत विकले की भविष्य हरते आणि आवाज उठवला की लोकशाही जिंकते.

# असरानीचा अजरामर जेलर

'शोले' या ब्लॉकबस्टर चित्रपटात ब्रिटिशकालीन जेलरची भूमिका साकारणारे गोवर्धन असरानी यांचे सोमवारी दुपारी ८४ व्या वर्षी निधन झाले.

असरानी यांनी त्यांच्या अभिनय कारकिर्दीत जवळपास 350 चित्रपटांमध्ये काम केले आहे. यामध्ये शोले, अभिमान, चुपके चुपके, छोटी सी बात आणि भूल भुलैया यांचा समावेश आहे. शोले चित्रपटातील असरानी यांचा हम अंग्रेजों के जमाने के जेलर हैं हा संवाद प्रचंड गाजला.

असरानी एका मुलाखतीत म्हणाले होते, "मला चित्रपटाबद्दल काहीच माहिती नव्हती. मला वाटलं होतं की निमार्ता-दिग्दर्शक मला एका भूमिकेसाठी बोलावत आहेत. मी जेव्हा त्यांना भेटायला गेलो तेव्हा मला रमेश सिप्पींसोबत सलीम-जावेद दिसले. जावेद साहेबांनी पटकथा सांगताना म्हटले, 'लक्ष द्या, आपण ब्रिटिश काळातील एका जेलरची भूमिका करत आहोत. हे पात्र मूर्ख आहे, पण तो जगातील सर्वात हुशार माणूस आहे असे दिसते.' मला वाटले की मी कधीही अशी भूमिका साकारली नव्हती. त्यांनी मला दुसऱ्या महायुद्धातील एक पुस्तक वाचायला दिले. त्यात हिटलरच्या १०-१२ पोझ होत्या."





त्यांनी स्पष्ट केले की हिटलर सार्वजनिक ठिकाणी येण्यापूर्वी त्याच्या खोलीत एका छायाचित्रकारासह, लष्करी गणवेश परिधान करून, रिहर्सल करायचा. मी त्या पोझमधून तीन-चार पोझ घेतले आणि पात्रालाही तोच अँगल दिला. चित्रपट खूप लांब होता, म्हणून माझा सीन कापण्यात आला. नागपूरमधील एका पत्रकाराने तो सीन पाहिला आणि तो चित्रपटाचा हृदय असल्याचे सांगितले. नंतर माझा सीन जोडण्यात आला. आजही लोक मला या भूमिकेसाठी ओळखतात.

"मला खात्री होती की जर जावेद साहेबांनी वाचून दाखवलेल्या गोष्टीत मी चूक केली तर दिग्दर्शक मला मारेल, पण लेखकही मारेल. शूटिंग सुरू होण्यापूर्वी मी माझे संवाद १० दिवस सराव केले. मला अशोक कुमार यांनी सांगितलेली एक गोष्ट आठवली: संवाद लक्षात ठेवा आणि बाकीचे दिग्दर्शकावर सोपवा. तो त्याच्या इच्छेनुसार काम पूर्ण करेल. त्यानुसार, शूटिंगला जाण्यापूर्वी मी पूर्ण तयारी केली होती. जेलरशिवाय इतर कोणीही ही भूमिका करू शकले असते असे मला वाटत नाही."

त्यांच्या शेवटच्या मुलाखतीत ते म्हणाले होते, " मी जानेवारीमध्ये कोटा जवळच्या एका गावात शूटिंग करत होतो. सर्व गावकरी जमले होते. त्यात एक चार वर्षांची मुलगी होती. निर्मात्याने मला सांगितले की ती मुलगी आणि तिची आई भेटू इच्छितात. मला वाटले की चार वर्षांची मुलगी एखाद्या अभिनेत्याला ओळखेल का, पण मला पाहताच ती म्हणाली, 'ते जेलर असरानी आहेत.' मला वाटते की हा एका पात्राचा विजय आहे."

असरानी यांच्या निधनाबद्दल रझा मुराद म्हणाले, "ही खूप दुःखद बातमी आहे. ते माझे शिक्षक होते. त्यांनी मला दोन वर्षे शिकवले. ते माझ्यासोबत नमक हराममध्येही होते. हे खूप मोठे नुकसान आहे. मी उद्या त्यांच्या घरी जाईन."

तो आमचे कल्पनाशक्तीचे वर्ग घेत असे, तो आमचे हास्यांचे वर्ग घेत असे, तो चार-पाच भावनिक स्मृतीचे वर्ग घेत असे. त्यांचे पूर्ण नाव गोवर्धन असरानी आहे. त्यांचा वाढदिवस १ जानेवारी रोजी होता. त्यांचा पहिला चित्रपट 'हरे कांच की चुडियां' होता.

असरानी यांच्या निधनाबद्दल शोलेचे दिग्दर्शक रमेश सिप्पी म्हणाले, "हे ऐकून मला खूप दुःख झाले आहे. ते एक सुंदर माणूस होते. त्यांनी सुरुवातीला सीता और गीता मध्ये एक छोटी भूमिका केली होती. नंतर, जेव्हा शोलेमध्ये जेलरची भूमिका तयार झाली, तेव्हा आम्ही त्यांना बोलावले आणि ते अद्भुत होते. त्यांनी ही भूमिका इतकी स्वीकारली की जणू ते स्वतःच पात्र आहेत. त्यांनी माझ्यासाठी हे खूप सोपे केले. इतके चांगले पात्र, इतके चांगले अभिनेता, दोघांचेही संयोजन परिपूर्ण होते. ते आता राहिले नाहीत हे ऐकून मला खूप दुःख झाले आहे."

१ जानेवारी १९४१ रोजी जयपूर येथे जन्मलेल्या असरानी यांच्या वडिलांचे कार्पेटचे दुकान होते. त्यांच्या वडिलांना त्यांच्या मुलांनी हा व्यवसाय सांभाळावा अशी इच्छा होती, परंतु असरानी यांना चित्रपटांमध्ये रस होता. असरानी यांनी जयपूर मधील राजस्थान कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलण्यासाठी त्यांनी ऑल इंडिया रेडिओमध्ये व्हॉइस आर्टिस्ट म्हणून काम केले.

१९६० मध्ये त्यांनी साहित्य कालभाई ठक्कर संस्थेत प्रवेश घेतला आणि अभिनय शिकला. १९६२ मध्ये त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ते कामाच्या शोधात मुंबईला गेले, परंतु त्यांना संधी मिळाली नाही. १९६३ मध्ये किशोर साहू आणि हृषिकेश मुखर्जी यांनी त्यांची प्रतिभा ओळखली, परंतु त्यांना व्यावसायिक अभिनय करण्याचा सल्ला दिला.

१९६४ मध्ये, असरानी यांनी पुण्याच्या फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला. दोन वर्षांनी त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, त्यांना १९६७ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'हरे कांच की चुडियां' या चित्रपटात भूमिका मिळाली. या काळात लोकप्रिय चित्रपट निमार्ते हृषिकेश मुखर्जी यांनी त्यांना १९६९ च्या 'सत्यकाम' चित्रपटात कास्ट केले, ज्यामुळे त्यांना ओळख मिळाली. त्यानंतर १९७१ च्या 'गुड्डी' या चित्रपटाने त्यांना यश मिळाले. तेव्हापासून त्यांना सातत्याने चित्रपटात काम मिळू लागले.

असरानी यांनी राजेश खन्ना यांच्यासोबत 'बावर्ची' या चित्रपटात काम केले होते. सेटवर त्यांची मैत्री आणखी घट्ट झाली. राजेश खन्ना असरानींच्या कामाने इतके प्रभावित झाले की त्यांनी निर्मात्यांना त्यांच्या प्रत्येक चित्रपटात विनोदी कलाकार म्हणून घेण्याचा आग्रह धरला. असरानी यांनी राजेश खन्ना यांच्या सुमारे २५ चित्रपटांमध्ये काम केले.

अमिताभ बच्चन यांच्या अनेक चित्रपटांमध्ये त्यांनी नायकासारख्या भूमिका केल्या, जसे की "अभिमान" (१९७३) मधील "चंदर" आणि "चुपके चुपके" (१९७५) मधील प्रशांत कुमार श्रीवास्तव. "छोटी सी बात" (१९७५) मधील नागेश शास्त्री यांची त्यांची भूमिका कमी वीर नव्हती. "शोले" (१९७५) मध्ये, असरानी यांनी एकाच संवादाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. "ब्रिटिश काळातील जेलर" ही त्यांची ओळ आता असरानींचा ट्रेडमार्क बनली आहे.

असरानी शेवटचे 2023 मध्ये नॉनस्टॉप धमाल आणि ड्रीम गर्ल 2 या चित्रपटांमध्ये दिसला होता. ते सलमान खानसोबत बॉडीगार्ड आणि क्यूंकी, दे दना दान, खट्टा मीठा, वेलकम, भूल भुलैया, आणि भागम भाग या चित्रपटांमध्ये अक्षय कुमारसोबत दिसले आहेत. अभिनेत्री एकता जैनसोबत आगामी 'खल्ली बल्ली' या चित्रपटातही ते दिसणार होते.

असरानी यांनी अनेक वर्ष चित्रपट रसिकांना खळखळून हसविले, अशा या हरहुन्नरी विनोदी अभिनेत्याला अभिवादन!!!

■ ■ ■

## दिवाळीतील किल्ला : इतिहासाचा आनंद

दिवाळी हा सण आनंद, उत्साह आणि परंपरेचा सण आहे. दिवाळीत दिव्यांची माळ, फराळ या यासोबतच मुलं मातीचे किल्ले बांधतात. हा फक्त खेळ नसून, आपल्या इतिहास आणि संस्कृतीशी जोडणारा अनुभव आहे. हा आपल्या इतिहासाची आठवण करून देणारी सुंदर परंपरा आहे. पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी अनेक किल्ले बांधले. त्या किल्ल्यांमुळे आपले स्वराज्य सुरक्षित राहिले. दिवाळी किल्ल्याचे महत्त्व मुख्यतः छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौयार्चे स्मरण करणे, महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा जपणे होय. आणि यातूनच मुले संघटन कौशल्य शिकतात.

ही परंपरा त्यांना इतिहासाशी जोडते आणि राष्ट्रभक्तीची भावना जागृत करते. त्यामुळे दिवाळी किल्ला हा केवळ आनंदाचे साधन नसून, मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची आणि आपल्या संस्कृतीची सुंदर गुंफण आहे .या परंपरेतून आपल्या संस्कृतीचे आणि इतिहासाचे जतन होते. त्यामुळे दिवाळी किल्ला हा केवळ खेळ नसून आपल्या वारस्याचे प्रतीक आहे. शाळेत, घरी आणि समाजात आपण मुलांना दिवाळीत किल्ले बनवण्यासाठी प्रोत्साहित करावे. किल्ला तयार करताना मुलांना इतिहासाबद्दल माहिती द्यावी, त्यांचे कौशल्य आणि सर्जनशीलता वाढवायला मदत करावी, आणि त्यांना सामूहिक काम किंवा खेळ करण्याचे महत्त्व समजवावे. यामुळे मुलांना फक्त खेळाचा आनंद मिळत नाही तर त्यांना आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि शौयार्ची जाणीवही होते. त्यामुळे दिवाळी किल्ला हा केवळ आनंदाचे साधन नसून मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे आणि आपल्या संस्कृतीचे सुंदर प्रतीक आहे.

■ **रेणुका हरदास, नागपूर.**

## भाऊबीज : प्रेम व्यक्त करण्याचा दिवस

भाऊबीज हा एकाच मातेच्या गभार्तून जन्म घेतलेल्या जीवांना एकमेकांविषयी वाटणारा जिव्हाळा म्हणजेच प्रेम व्यक्त करण्याचा दिवस आहे. या दिवशी बहीण श्री यमाईदेवीकडे जे मागणे भावासाठी मागते त्याप्रमाणे तिच्यामध्ये असलेल्या भावानूसार भावाला त्याचे फळ मिळत असते. त्यामुळे तिचे भावाशी असलेले देवाण-घेवाण हिशेब काही प्रमाणात कमी व्हायला साहाय्य होते.

या दिवशी स्त्रीमध्ये असलेले अप्रकट देवीतत्व जागृत होते. त्याचा देखील भावाला लाभ होत असतो. या दिवशी यम त्याची बहीण यमुना हिच्याकडे जेवायला जातो म्हणून या दिवसाला यमद्वितीया असे म्हणतात. यम आणि यमुना ही सूर्यदेवाची अपत्ये आहेत. यम ही धर्म आणि मृत्यू याची देवता आहे. एक दिवस सर्वांनाच मृत्यू येणार आहे याची जाणीव ठेवली तर आपल्याकडून अयोग्य कृती आणि पैशाचा चुकीचा वापर होणार नाही. या दिवशी अपमृत्यू टळावेत यासाठी यमाप्रित्यर्थ तेरा दिवे लावून यमदीपदान करावे आणि यमदेवतेला प्रार्थना करावी की, " हे यामा या दीपाप्रमाणे आम्ही सतर्क आणि जागृत आहोत. प्रकाशाचे प्रतीक असणारा हा दीप आम्ही तुला अर्पण करत आहोत त्याचा तू स्वीकार कर." धर्माचरणी आणि साधना करणाऱ्या जीवांनी केलेल्या अशा प्रार्थनेमुळे त्यांना यमदेवतेचा कृपाशीर्वाद लाभतो.

■ **भीमराव साळुंखे, सातारा.**

# प्रत्येक कुत्र्याला चिप लावून ट्रॅक करणारा देश

आगळंवेगळं

भारतात भटक्या कुत्र्यांबद्दल चर्चा सुरू आहे. पण जगात असा एक देश आहे जिथे भटक्या कुत्र्यांच्या काळजीसाठी विशेष व्यवस्था आहे. हा देश म्हणजे नेदरलँड्स.

येथे भटक्या कुत्र्यांसाठी एक विशेष पोलिस पथक आहे. हे पथक कुत्र्यांना पकडते. त्यांचे लसीकरण करते. नंतर त्यांना आश्रयगृहात पाठवते. भटक्या कुत्र्यांसाठी रुग्णालय सुरू ठेवण्याचेही नियम आहेत. त्यांना नेहमीच वैद्यकीय सेवा मिळते. कुत्र्यांसाठी एक विशेष कायदा आहे.

जर तुम्ही दुकानातून कुत्रा खरेदी केला तर तुम्हाला मोठा कर भरावा लागेल. त्यामुळे लोक आश्रय गृहांमधून कुत्रे दत्तक घेण्यास प्राधान्य देतात. येथे प्रत्येक कुत्र्यामध्ये एक मायक्रोचिप बसवली जाते. यामुळे त्यांची संपूर्ण माहिती डेटाबेसमध्ये साठवली जाते. जर कुत्रा हरवला तर तो सहज सापडू शकतो. तुलना करायची नाही, परंतु, भारतात पाळीव आणि मोकाट कुत्र्यांची काय अवस्था आहे आणि विदेशात कसे हाताळले जाते, ते पाहिल्यास त्यांच्या प्रगतीची कल्पना येते.

■ ■ ■



# फराळ पोटभर खा



काही सोप्या घरगुती उपायांचा अवलंब करून तुम्ही केवळ ॲसिडिटी आणि गॅसपासून आराम मिळवू शकत नाही तर पचनक्रिया देखील सुधारू शकता. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे हे उपाय पूर्णपणे नैसर्गिक आहेत आणि आपल्या स्वयंपाकघरात आढळतील. दिवाळीत आम्लता आणि गॅस दूर करण्यासाठी प्रभावी घरगुती उपाय जाणून घेऊया.

**लिंबू आणि गरम पाण्याचे चमत्कार**

सकाळी रिकाम्या पोटी एक ग्लास कोमट पाणी घ्या आणि त्यात अर्धा लिंबू पिळून घ्या. इच्छित असल्यास, आपण चिमूटभर मीठ किंवा थोडेसे मध घालू शकता. हे मिश्रण पोटातील आंबटपणा निष्प्रभ करण्यास मदत करते. लिंबामध्ये असलेले सायट्रिक ?सिड पोटातील गॅस काढून टाकते आणि पचन सुधारते. यामुळे पोट दिवसभर हलके आणि सक्रिय वाटते.

**बडीशेप आणि साखर कँडी उपाय :**

दिवाळीच्या रात्रीच्या जेवणानंतर बडीशेप आणि खडीसाखरेचे सेवन अवश्य करा. बडीशेपमध्ये असलेले फायबर आणि अँटी ॲसिड गुण पोट थंड करतात आणि गॅस काढून टाकण्यास मदत करतात . रात्रीच्या जेवणानंतर एक चमचा बडीशेप आणि थोडी खडीसाखर तोंडात ठेवा आणि हळूहळू चावून खावा. इच्छित असल्यास, आपण ते कोमट पाण्यासह देखील घेऊ शकता.

आले एक नैसर्गिक पाचक एजंट आहे. जर तुम्ही दिवाळीच्या पार्टीत जास्त तळलेले किंवा हेवी फूड खाल्ले असेल तर आले आणि मधाचा चहा तुमच्यासाठी सर्वोत्तम आहे. एक कप पाण्यात थोडे किसलेले आले घाला आणि 5 मिनिटे उकळवा, नंतर गाळून घ्या आणि त्यात एक चमचा मध घाला. या चहामुळे ॲसिडिटी, पोटदुखी आणि मळमळ यांपासून त्वरित आराम मिळतो.

जर तुम्हाला छातीत जळजळ किंवा गॅसची समस्या असेल तर तुळशीची 4-5 पाने चावून खा तुळस पोटातील गॅस कमी करते आणि पोटात तयार होणारे आम्ल संतुलित करते.

**थंड दूध किंवा ताक प्या :** ताक मध्ये असलेले प्रोबायोटिक्स पचन सुधारतात. इच्छा असेल तर ताक मध्ये थोडे भाजलेले जिरे पावडर आणि मीठ घालून प्या, यामुळे चव आणि परिणामही वाढेल.

एकाच वेळी जास्त अन्न खाऊ नका, त्याचे लहान तुकडे करा. जेवल्यानंतर लगेच झोपू नका, किमान 30 मिनिटे चाला. पुरेसे पाणी प्या जेणेकरून शरीरातून विषारी पदार्थ बाहेर काढले जाऊ शकतील.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### भाऊबिज..!

मी निर्भया बोलतेय भगीनींनो
भावाला मागा ओवाळणी
कोणत्याही परस्त्रीची
करणार नाही छेडखानी...

मनातील सैतानावर
ठेव नेहमी नियंत्रण
स्त्रीपुरुष समानतेने
देशाचे होईल नंदनवन..

भोगेच्छा बनविते
मानवास आंधळी
त्यापायीच होते
जीवनाची राखरांगोळी !

# शालिनीताई मेघे हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी गुंतागुंतीच्या डोळ्याच्या जखमेवर केले यशस्वी उपचार



**नागपूर, २२ ऑक्टोबर :** वानाडोंगरी, नागपूर येथील १०२० बेड्सचे शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर (एसएमएचआरसी), हे सर्वसमावेशक आणि सहानुभूतीपूर्ण आरोग्यसेवा देण्यासाठी प्रसिद्ध आहे. अनुभवी तज्ञ डॉक्टरांची टीम, समन्वयित टीमवर्क आणि प्रगत शस्त्रक्रिया कौशल्य यांच्या मदतीने हे हॉस्पिटल रुग्णांना आशा आणि दृष्टि परत देण्यात सतत उल्लेखनीय यश मिळवत आहे. अलीकडेच नेत्ररोग विभागाने केलेले यशस्वी उपचार हे हॉस्पिटलच्या कौशल्य, टीमवर्क आणि रुग्णकेंद्रित दृष्टीकोनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

प्रकरणाची गंभीरता ओळखून नेत्ररोग विभागाच्या टीमने सर्व आवश्यक शस्त्रक्रियेपूर्वीच्या तपासण्या करून रुग्णाला तात्काळ शस्त्रक्रियेसाठी तयार केले. रुग्णाला ताबडतोब ऑपरेशन थेटरमध्ये नेण्यात आले, जिथे डॉ. श्रुती संघवी (कॉर्निया, कॅटरॅक्ट व रिफ्रॅक्टिव्ह सर्जन) यांनी विभागप्रमुख डॉ. प्राची नगराळे आणि युनिट इन्चार्ज डॉ. चेतन सावजी यांच्या मार्गदर्शनाखाली कॉर्नियल टिअर रिपेअर आणि स्मॉल इन्सिजन कॅटरॅक्ट सर्जरी (लहान चीरा मोतीबिंदू) ही संयुक्त शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. अंदाजे दीड तास चाललेल्या या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेला डोळ्याची कार्यक्षमता आणि संरचना पुनर्संचयित करण्यासाठी अत्यंत अचूकता, समन्वय आणि कौशल्याची गरज होती. ही शस्त्रक्रिया सिस्टर वैशाली भिसे (ओटी इन्चार्ज), सुश्री दिव्या शेजुळे (ओटी मॅनेजर) आणि सिस्टर अमृता इंगळे (वार्ड इन्चार्ज) यांच्या नेतृत्वाखालील कार्यक्षम परिचारिका व पॅरामेडिकल टीमच्या प्रभावी सहकार्याने पार पडली. त्यांनी शस्त्रक्रियापूर्वी आणि शस्त्रक्रियेनंतरच्या काळात रुग्णाच्या काळजीची काटेकोरपणे जबाबदारी घेतली. तसेच डॉ. इशांगी निमगडे (आयपीडी मॅनेजर) आणि आशिष दारणे (फ्लोअर मॅनेजर) यांनी प्रशासकीय सहकार्य देऊन संपूर्ण प्रक्रियेत सुरळीत समन्वय साधला.

डॉ. वसंत गावंडे, वैद्यकीय अधीक्षक, शालिनीताई मेघे हॉस्पिटल यांनी सांगितले की, शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अत्यंत चांगली आहे. ती आता चेहरे ओळखू शकते आणि तिला तिची दृष्टी परत मिळाली आहे जी अशा गंभीर दुखापतींच्या बाबतीत एक उल्लेखनीय कामगिरी मानली जाते. हे यश केवळ नेत्ररोग विभागाच्या शस्त्रक्रियेतील कौशल्याचेच प्रदर्शन करत नाही, तर रुग्णालयाच्या सुसंगत आणि समन्वयित आरोग्यसेवा प्रणालीच्या कार्यक्षमतेचेही उदाहरण आहे, ज्यामुळे वेळेवर उपचार आणि नियमित फॉलो-अप सुनिश्चित होतो.

डॉ. अनुप मरार, संचालक, डीएमआयएचईआर(ऑफ कॅम्पस) यांनी टीमच्या यशाचे कौतुक करताना सांगितले, ही केस वेळेवर निदान, कौशल्यपूर्ण उपचार आणि सहानुभूतीपूर्व टीमवर्कच्या सामर्थ्याचे एक उत्तम उदाहरण आहे. दृष्टी परत मिळवून देणे हे वैद्यकीय क्षेत्रातील सर्वात समाधानकारक परिणामांपैकी एक आहे, आणि हे यश आमच्या मध्य भारतातील प्रत्येक रुग्णाला जागतिक दर्जाची आरोग्यसेवा देणे या आमच्या ध्येयाला आणखी मजबूत करते.

ही प्रेरणादायी पुनर्प्राप्ती केवळ आशा निर्माण करत नाही, तर शालिनीताई मेघे हॉस्पिटलच्या वैद्यकीय उत्कृष्टतेच्या, समर्पणाच्या आणि मानवी स्पर्शाद्वारे प्रत्येक रुग्णांना सुलभ, जागतिक दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाला अधिक मजबूत करते.

# 'उज्जीवन स्मॉल फायनान्स'ने जाहीर केला आर्थिक अहवाल

**बंगळुरू, २२ ऑक्टोबर :** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. ने सप्टेंबर  ला समाप्त झालेल्या तिमाहीसाठीचा आपला आर्थिक अहवाल जाहीर केला. ठेवी, कोटींवर पोहोचल्या असून सीएएसए ठेवी , कोटी इतक्या आहे. एमडी व सीईओ संजीव नौटियाल यांनी तिमाही निकालावर भाष्य करताना म्हटले, या तिमाहीत आम्ही संतुलित वाढ साध्य केली.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचे एमडी व सीईओ संजीव नौटियाल यांनी तिमाही निकालावर भाष्य करताना म्हटले: या तिमाहीत आम्ही संतुलित वाढ साध्य केली आहे. अतिरिक्त तरलता शोषून घेऊन आमचा सीडी रेशो ८८.२% वर पोहोचला. एकूण ठेवी रुपये ३९,२११ कोटींवर गेल्या असून, त्यात तिमाही आधारावर १.५% वाढ आणि वार्षिक आधारावर १५.१% वाढ झाली. सीएएसए ठेवी रुपये १०,७८३ कोटींवर, तिमाही आधारावर १४.९% वाढ आणि वार्षिक आधारावर २२.१% वाढ झाली. रिटेल टीडी व सीएएसए ठेवी मिळून एकूण ठेवींच्या सुमारे ७१% आहेत. सीएएसए वाढवण्याचे आमचे प्रयत्न आता ठोस आकार घेत आहेत. तिसऱ्या तिमाहीत म्युच्युअल फंड वितरण व फॉरेक्स उत्पादने ग्राहकांसाठी आणली जाणार आहेत, तसेच आगामी काळात एएसबीए सुरू केल्याने सीएएसए मोबिलायझेशनला आणखी चालना मिळेल. आम्ही विविध बकेट्समध्ये टीडी (टर्म डिपॉझिट) आणि एसए (सेव्हींग अकाऊन्ट) चे दर पुन्हा ठरवले असून त्यामुळे निधी खर्चात (कॉस्ट ऑफ फंड) तिमाही आधारावर २३ बेसिस पॉइंट्स आणि वार्षिक आधारावर १७ बेसिस पॉइंट्स घट झाली. येत्या तिमाहींमध्ये आणखी सीओएफ फायदे मिळतील अशी अपेक्षा आहे.

सीईओ संजीव नौटियाल यांनी पुढे सांगितले, मार्गदर्शनानुसार आमचे मायक्रोफायनान्स पोर्टफोलिओ हळूहळू स्थिर होत आहे. परतफेडीचे वर्तन सुधारत असून, त्याचे प्रतिबिंब बकेट-एक्स कलेक्शन एफिशियन्सीमध्ये दिसते, जी दुसऱ्या तिमाहीत सलग तीन महिने ९९.४५% ते ९९.५०% इतकी कायम राहिली. आमच्या एकूण मालमत्ता गुणवत्तेतही स्थिरता आहे आणि क्रेडिट कॉस्ट २.८% इतक्याच पातळीवर स्थिर राहिल्या. उर्वरित तिमाहींमध्ये सातत्याने सुधारणा होतील, याबाबत आम्ही ठाम आहोत.

दुसऱ्या तिमाहीतील शुद्ध नफा (पीएटी) रुपये १२२ कोटी, जो तिमाही आधारावर १८.२% वाढ आहे. आरओए आणि आरओई अनुक्रमे १.०% आणि ७.७% वर पोहोचले आहेत. शाखा विस्ताराची धोरणात्मक पावले आणि उत्पादनांमध्ये विविधता आणण्याचे आमचे प्रयत्न भविष्यातील वाढीच्या योजनेला पाठबळ देतील. आम्हाला विश्वास आहे की फायनाशिय इअर२६ मध्ये कर्जवाटप सुमारे २०% ने वाढवता येईल, तसेच क्रेडिट कॉस्ट ग्रॉस लोन बुकच्या २.३% ते २.४% या मर्यादित नियंत्रणात ठेवता येतील.

# जेव्हा धैर्य बनते क्रांती झी५ ने सादर केला बाई तुझ्यापायीचा ट्रेलर, प्रीमियर ३१ ऑक्टोबर रोजी



**मुंबई, २२ ऑक्टोबर :** एका गावात जिथे अंधश्रद्धा नशिब ठरवते आणि स्त्रियांना गप्प राहण्याची अपेक्षा असते, तिथे एक मुलगी विचारते का? झी५ ची आगामी मराठी ओरिजिनल मालिका बाई तुझ्यापायी या प्रश्नातून निर्माण झालेली बंडखोरी आणि शिक्षणाच्या माध्यमातून घडणारा बदल दाखवते. ही मालिका ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी झी५ वर प्रीमियर होणार आहे.

निपुण धर्माधिकारी दिग्दर्शित आणि Sixteen by Sixty-Four Productions निर्मित या मालिकेचे लेखन निखिल खैरे आणि मुक्ता बाम यांनी केले असून, सजीरी जोशी, क्षिती जोग, सिद्धेश धुरी आणि शिवराज वैचळ प्रमुख भूमिकांमध्ये दिसणार आहेत.

१९९० सालातील काल्पनिक वेसाइचा वडगाव या गावात घडणारी ही कथा आहे अहिल्या (सजीरी जोशी) ची एक जिद्दी आणि स्वप्नाळू मुलगी जी शिकायचे स्वप्न पाहते, पण जिथे मुलींना शिक्षण घेण्यास मनाई आहे. तिचे मूक बंड आंधश्रद्धा आणि पितृसत्ताक विचारसरणीविरुद्ध एक आशेचा किरण ठरते, जो संपूर्ण गावाला जागवते.

ट्रेलरमध्ये या भावनिक आणि वास्तववादी जगाची झलक दिसते. प्रभावी अभिनय, तपशीलवार मांडणी आणि हृदयाला भिडणारी कथा यांच्या संगमातून एक अशा मुलीचा प्रवास दाखवला आहे, जी आपल्या स्वप्नांसाठी न झुकता लढते. बाई तुझ्यापायी ही केवळ एका मुलीच्या शिक्षणासाठीच्या संघर्षाची कहाणी नाही. तर आवाज मोडून स्वतःचा आवाज शोधण्याची आणि स्वातंत्र्याचा नवा अर्थ परिभाषित करण्याची कहाणी आहे.

दिग्दर्शक निपुण धर्माधिकारी म्हणाले, बाई तुझ्यापायी ही एक महत्त्वाची कथा आहे कारण ती अजूनही घडणाऱ्या वास्तवाचे प्रतिबिंब आहे. अहिल्याच्या धैर्याच्या माध्यमातून आपण पाहतो की श्रद्धा आणि वास्तव यांच्यातील संघर्ष समाजाला कसा बदलतो. हा ट्रेलर आपण तयार केलेल्या जगाची केवळ झलक आहे. परंपरेत रुजलेले पण बदलाची आस असलेले. ही प्रभावी कथा सादर करण्यासाठी झी५ हे उत्तम व्यासपीठ आहे.

क्षिती जोग, जी मालिकेत अहिल्याची आई लक्ष्मीची भूमिका साकारते, म्हणाली, लक्ष्मी ही श्रद्धा आणि प्रेम यांच्या द्विधा मनःस्थितीत अडकलेली आई आहे. एक आई जी परंपरेत आणि आपल्या मुलीच्या भविष्याबद्दलच्या आशेत दोन्ही ताणली गेली आहे. बाई तुझ्यापायी या संघर्षाला खूप सुंदररित्या पकडते आणि मला वाटतं अनेक स्त्रिया लक्ष्मीमध्ये स्वतःला पाहतील. ही मालिका पाहणं आवश्यक आहे आणि मला आनंद आहे की ती झी५ वर संपूर्ण देशासाठी येत आहे.

सजीरी जोशी, जी अहिल्याची भूमिका साकारते, म्हणाली, अहिल्याची कथा ही केवळ बंडखोरीची नाही, तर आशेची आहे. ती प्रत्येक त्या मुलीचं प्रतीक आहे जिला कधी ना कधी तू नाही करू शकत असं सांगितलं गेलं. तिचा प्रवास साकारताना मला जाणवलं की शिक्षण खरंच नशिबं बदलू शकतं. मला अभिमान आहे की मी अशा मालिकेचा भाग आहे जी मनालाही आणि विवेकालाही स्पर्श करते आणि ती झी५ वर राष्ट्रीय प्रेक्षकांसमोर येते याचा विशेष आनंद आहे.

भावनांनी भारलेली दृश्यं, वास्तववादी पात्रं आणि प्रेरणादायी संदेश असलेली बाई तुझ्यापायी ही मालिका आठवण करून देते की बदलाची सुरुवात नेहमी त्या एका आवाजाने होते जो गप्प राहण्यास नकार देतो.

# नागपूरमधील वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये कीहोल सर्जरीने मध्यप्रदेशच्या ८ वर्षांच्या मुलीला मिळाली नवीन आशा



**नागपूर, २२ ऑक्टोबर :** मध्य प्रदेशातील एका ८ वर्षांच्या मुलीला डाव्या पोटाच्या बाजूला (कंबरेत) सतत वेदना होत होत्या. नुकतेच वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर येथे यशस्वी लेप्रोस्कोपिक (कीहोल) किडनी शस्त्रक्रिया केल्यानंतर तिला आराम मिळाला. तपासणीत मुलीला गंभीर ग्रेड पीयूजेओ (पायलोयूरेटरिक जंक्शन ऑब्स्ट्रक्शन) असल्याचे निदान झाले होते, ज्यामध्ये लघवीचा प्रवाह रोखला जातो, किडनी सुजते, त्याची रचना पातळ होते आणि शेवटी किडनीचे कार्य थांबू शकते.

सीटी स्कॅन आणि डीटीपीए रेणोग्रामद्वारे तपासणी केल्यावर असे दिसून आले की मुलाच्या डाव्या किडनीने पूर्णपणे काम करणे थांबवले होते, त्यामुळे शस्त्रक्रियेद्वारे तो काढून टाकणे हा एकमेव सुरक्षित पर्याय होता. मुलीचे वय कमी असल्याने आणि प्रभावित किडनीचा आकार मोठा असल्याने ही केस विशेषतः आव्हानात्मक होती.

नागपूरमधील वोक्हार्ट हॉस्पिटलचे कन्सल्टंट युरोलॉजिस्ट डॉ. श्रीकांत जय यांच्या देखरेखीखाली सर्जिकल टीमने लेप्रोस्कोपिक (कीहोल) नेफ्रेक्टॉमी करण्याचा निर्णय घेतला. ही एक मिनिमली इनवेसिव्ह शस्त्रक्रिया आहे, ज्यामध्ये लहान चीरे मारून आणि विशेष उपकरणे वापरून रोगग्रस्त किडनी काढले जाते. लहान मुलांमध्ये ही प्रक्रिया तांत्रिक दृष्ट्या कठीण असली तरी, यामुळे वेदना कमी होतात, जखम कमी दिसतात आणि रुग्ण लवकर बरा होतो.

शस्त्रक्रिया सूक्ष्म छिद्रांद्वारे यशस्वीरित्या पूर्ण झाली आणि मुलीच्या प्रकृतीत शस्त्रक्रियेनंतर लक्षणीय सुधारणा दिसून आली. ती दुसऱ्या दिवशी चालू शकली आणि तिसऱ्या दिवशी रुग्णालयातून हसत-खेळत व वेदनारहित घरी परतली.

डॉ. श्रीकांत जय, कन्सल्टंट युरोलॉजिस्ट, वोक्हार्ट हॉस्पिटल म्हणाले, लहान मुलांमध्ये लेप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया करण्यासाठी विशेष कौशल्य आणि उपकरणे आवश्यक असतात, यामुळे बरे होण्याची गती आणि आरामामध्ये लक्षणीय सुधारणा होते. नागपूरमध्ये अशा प्रगत तंत्रज्ञानाचा वापर होणे आणि त्याचा फायदा मध्यप्रदेशसारख्या दूरच्या भागातील रुग्णांनाही होणे आनंददायी आहे.

अलीकडील वर्षांत लेप्रोस्कोपिक आणि रोबोटिक पद्धतींसह मिनिमली इनवेसिव्ह मूत्ररोग शस्त्रक्रियांनी गुंतागुंतीच्या किडनी आणि मूत्रमार्गाच्या आजारांवर उपचार करण्याची पद्धत बदलली आहे. पूर्वी, मुलांना मोठ्या जखमा होणाऱ्या ओपन शस्त्रक्रियांचा सामना करावा लागायचा आणि बरे होण्यास अधिक वेळ लागायचा. आता कीहोल शस्त्रक्रियेद्वारे, अगदी काम न करणाऱ्या किडनी सारख्या गुंतागुंतीच्या प्रकरणांवर देखील सुरक्षित आणि प्रभावीपणे उपचार करता येतात.

नागपूरमधील वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये आधुनिक मिनिमली इनवेसिव्ह शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध असल्यामुळे, लहान मुलांवर प्रगत किडनी शस्त्रक्रिया सुरक्षितपणे करता येते, ज्यामुळे रुग्ण लवकर बरा होतो आणि चांगले परिणाम सुनिश्चित होतात.

# टाटा मेमोरियल सेंटर येथे उभारण्यासाठी ६२५ कोटी देण्याचे आयसीआयसीआय बँकेचे आश्वासन

**मुंबई, २२ ऑक्टोबर :** कर्करोगावरील उपचार, संशोधन आणि शिक्षणासाठी नवी मुंबईतील टीएमसीच्या प्रगत केंद्रात नवीन कॅन्सर केअर इमारतीचे बांधकाम सुरू करण्याची घोषणा आयसीआयसीआय बँक आणि टाटा मेमोरियल सेंटरने (टीएमसी) केली. बँकेच्या सीएसआर उपक्रमांतर्गत ६२५ कोटी रुपयांच्या योगदानाच्या साहाय्याने हे केंद्र भारतातील सर्वात मोठ्या रेडिएशन थेरपी केंद्रांपैकी एक असेल. तसेच अत्याधुनिक कर्करोग उपचार तंत्रज्ञानाने सुसज्ज असेल. महाराष्ट्रातील नवी मुंबई, पंजाबमधील मुल्लानपूर (नवीन चंदीगड) आणि आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे प्रत्येकी एक अशा तीन अत्याधुनिक कॅन्सर केअर इमारतींच्या उभारणीसाठी बँकेने टीएमसीला १,८०० कोटी देण्याचे आश्वासन दिले असून, हे केंद्र हा त्याचाच एक भाग आहे.

आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीचे भूमीपूजन तसेच पायाभरणीचा समारंभ आज करण्यात आला. आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष प्रदीप कुमार सिन्हा, संदीप बत्रा, कार्यकारी संचालक, आयसीआयसीआय बँक; अजय गुप्ता, कार्यकारी संचालक, आयसीआयसीआय बँक आणि



डॉ. सुदीप गुप्ता, संचालक, टीएमसी हे यावेळी उपस्थित होते.

तळमजला तसेच दोन बेसमेंट असलेली ही ११ मजली इमारत ३.४ लाख चौ. फुटांवर बांधली जाईल. यामध्ये १२ अत्याधुनिक लिनियर एक्सीलरेटर्स (LINACs) आणि कर्करोगाशी संबंधित इतर प्रगत उपकरणे असतील. LINACs कर्करोगाच्या पेशींना अचूक रेडिएशन देतात ज्यामुळे आसपासच्या निरोगी ऊतींचे नुकसान कमी होते.

आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी दरवर्षी ७,२०० रुग्णांना रेडिएशन थेरपीची सोय उपलब्ध करून देईल. या अंतर्गत रुग्णांची दोन लाखांहून अधिक रेडिएशन सत्रांची सोय केली जाईल. या व्यतिरिक्त, वर्षभरात २५,००० नवीन रुग्णांना ओपीडी सल्ला तसेच निदान करण्यास मदत करेल. हे केंद्र २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. आयसीआयसीआय बँकेची सीएसआर शाखा, आयसीआयसीआय फाउंडेशन फॉर इन्क्लुजिव्ह ग्रोथ, या केंद्राचे बांधकाम आणि एकूणच कामकाजावर देखरेख ठेवेल.

या प्रसंगी आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष प्रदीप कुमार सिन्हा म्हणाले, आयसीआयसीआय फाउंडेशन फॉर इन्क्लुझिव्ह ग्रोथ या आपल्या सीएसआर शाखेद्वारे आयसीआयसीआय बँक आरोग्यसेवा, पर्यावरण संवर्धन, शाश्वत उपजीविका आणि सामुदायिक विकास प्रकल्प या चार संकल्पनांवर काम करते आहे. देशातील महत्त्वाच्या आरोग्यसेवा पायाभूत सुविधांना बळकटी देण्याच्या आमच्या ध्येयाशी सुसंगत असलेल्या कर्करोग काळजी मोहिमेत टीएमसीसोबत भागीदारी करताना आम्ही आनंदी आहोत. हे केंद्र पूर्ण झाल्यानंतर आणि संपूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी रेडिएशन थेरपीसाठी भारतातील सर्वात मोठ्या केंद्रांपैकी एक असेल. यामुळे समाजात मोठ्या संख्येने गरज असलेल्या समुदायांना प्रगत रेडिएशन थेरपीची उपलब्धता लक्षणीयरीत्या वाढेल.

# लहानपणीच्या आठवणींपासून ते मनापासून केलेल्या विधींपर्यंत सोनी सबचे कलाकार सांगत आहेत यावर्षी ते भाऊबीज कशी साजरी करणार आहेत

**मुंबई, २२ ऑक्टोबर :** या भाऊबीजेला सोनी सबवरील कलाकार समृद्ध बावा, सुंबुल तौकीर खान, ऋषी सक्सेना आणि श्रेनु परीख साजरे करत आहेत भावा-बहिणीतले प्रेम, काळजी आणि सख्याचे कालातीत नाते. हा सण केवळ हे खास नाते मजबूत करत नाही, तर लहानपणीच्या सहवासाच्या सुखद आठवणी, थट्टा-मस्करी, एकमेकांची बाजू घेतल्याचे लोभस क्षण आणि भावा-बहिणीच्या नात्यातील छोट्या छोट्या सुंदर गोष्टींचा गोडवा साजरा करतो.


पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत अश्विनची भूमिका करणारा समृद्ध बावा म्हणतो, आमच्यासाठी भाऊबीजेचे विशेष महत्त्व आहे. माझी बहीण सांची माझ्याहून चार वर्षे मोठी आहे आणि ती दिल्लीत राहते. त्यामुळे दरवर्षी आम्हाला आमची वरचेवर भेट होत नाही. सामान्यतः ती सणासुदीला घरी येते किंवा मी दिल्लीला तिच्याकडे जातो. या वर्षी शूटिंगमुळे मी जाऊ शकणार नाही. त्यामुळे मी तिला एक सरप्राइज गिफ्ट द्यायचे ठरवले आहे.

इत्ती सी खुशी मालिकेत अन्विताची भूमिका करणारी सुंबुल तौकीर खान म्हणते, माझ्यासाठी, पहिल्यापासून भाऊबीज म्हणजे प्रेम आणि संरक्षणाच्या भावनेचा आनंदोत्सव. माझ्यासाठी, हा सण मी माझ्या बहिणींसोबत साजरा करते. पारंपरिक रित्या हा भाऊ-बहिणीचा सण असला तरी मी आणि माझी बहीण आपापल्या परीने हा सण साजरा करतो. लहानपणापासून आमची ही परंपरा सुरू आहे. ती माझ्याकडे मैं भी भाई से कम नहीं असे सांगून भेटवस्तूची लाडिक मागणी करायची. आम्ही अजूनही ती मजेदार परंपरा चालू ठेवली आहे. आम्ही मिठाईची देवाणघेवाण करतो, एकमेकींची थट्टा-मस्करी करतो आणि आमच्या जुन्या खोड्या आठवून खूप हसतो.

इत्ती सी खुशी मालिकेत संजयची भूमिका करणारा ऋषी सक्सेना म्हणतो, माझा जवळजवळ समस्त परिवार जयपूरला राहतो. मला स्पष्ट आठवते आहे की, आम्ही सर्व जण काटेकोरपणे नवरात्रीचे व्रत करायचो आणि मग भाऊबीजेची वाट बघायचो. तेव्हा सगळे एकत्र व्हायचो, धमाल करायचो आणि आनंदाने सण साजरा करायचो. खरं तर, आमच्यासाठी पहिल्यापासून भाऊबीज हा खूप मौज-मस्ती करण्याचा दिवस असे. घरची सर्व मंडळी उपस्थित असायची आणि हा दिवस, हास्य-विनोद, खेळ, पत्ते खेळून साजरा व्हायचा. आम्ही जेव्हा लहान होतो, तेव्हा आम्ही सर्व चुलत भावंडे क्रिकेट खेळायचो. कधी कधी तर बागेत संपूर्ण टेनिस बॉल मॅच चालायची. किंवा आम्ही कुठे एकत्र झालो आहोत, यावर अवलंबून गच्चीत एक टप्पा-एक हातने केलेला कॅच आउट मानणारा क्रिकेटचा खेळ चालायचा.

गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मालिकेत पार्वतीची भूमिका करणारी श्रेनु परीख म्हणते, माझ्यासाठी पहिल्यापासून भाऊबीज हा एक खास सण आहे, कारण तो माझा भाऊ शुभमसाठी आणि आमच्या नात्यासाठी समर्पित असलेला दिवस आहे. तो माझ्यापेक्षा लहान आहे. पण खरं सांगायचं तर बऱ्याचदा तो माझ्यापेक्षा अधिक परिपक्व असल्यासारखा वागतो. (हसते) लहानपणी या सणाच्या निमित्ताने आम्ही खूप मौज करायचो, एकमेकांची थट्टा-मस्करी करायचो, आणि फराळावर ताव मारायचो. मी त्याच्यावर दादागिरी करायचे! आणि तो देखील त्याचे उत्तर देण्याची संधी शोधायचा. आजही, आम्ही कितीही कामात गुंतलेलो असलो, तरी हा सण एकत्र साजरा करतो, प्रत्यक्ष भेटून किंवा व्हर्च्युअल भेटीतून. माझ्यासाठी, भाऊबीज हा केवळ एक विधी नाही, तर लहानपणीचे क्षण पुन्हा जगण्याचा आणि काहीही झाले, तरी आपण नेहमी एकमेकांच्या पाठीशी असणार आहोत हे आश्वासन एकमेकांना देण्याचे हे पर्व आहे.

# माझा पहिला लग्नाचा ट्रॅक शूट करणे हे खरंच स्वप्न साकार झाल्यासारखे होते : मोहक मटकर



**मुंबई, २२ ऑक्टोबर :** झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका सरु आपल्या भावनिक कथानक आणि वास्तविक वाटणाऱ्या पात्रांमुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे. अलीकडील लग्नाचा ट्रॅक या मालिकेत भव्यता, सुंदर साज आणि भावस्पर्शी अभिनयामुळे प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून गेला. सर्वजण उत्सुकतेने वेद आणि सरुच्या लग्नाची प्रतीक्षा करत आहेत. मुख्य भूमिका साकारणारी अभिनेत्री मोहक मटकर हिने तिच्या पहिल्याच ऑन-स्क्रीन लग्नाच्या शूटिंगचा अनुभव आणि उत्साह शेअर केला.

झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका सरु आपल्या भावनिक कथाकथनामुळे आणि प्रेक्षकांना जवळची वाटणारी पात्रे यामुळे सर्वांच्या मनात घर करून बसली आहे. मालिकेतील अलीकडच्या लग्नाच्या ट्रॅकने आपल्या भव्य साज, सुंदर दृश्यरचना आणि हृदयाला भिडणाऱ्या अभिनयाने प्रेक्षकांना मोहून टाकले आहे. सर्वजण उत्सुकतेने वेद आणि सरुच्या लग्नाची प्रतीक्षा करत आहेत. मुख्य भूमिका साकारणारी अभिनेत्री मोहक मटकर हिने आपल्या पहिल्याच ऑन-स्क्रीन लग्नाच्या शूटिंगबद्दलचा आनंद आणि त्यामागचे काही खास अनुभव शेअर केले.

लग्नाच्या लूक आणि कठीण शूटिंग शेड्यूलबद्दल बोलताना मोहक मटकर म्हणाली, लग्नाचे सीन शूट करणे एकीकडे खूप रोमांचक होते, तर दुसरीकडे खूप थकवणारेही! या ट्रॅकसाठीचा लूक खूप खास होता. पारंपरिक दागिन्यांपासून ते सुंदर डिझाईन केलेल्या कपड्यांपर्यंत, प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक ठरवली गेली होती, जेणेकरून लग्न भव्य दिसावे पण त्याचवेळी वास्तवतेशी जोडलेलेही राहावे. प्रत्येक विधीसाठी योग्य प्रकाश आणि वातावरण मिळावे म्हणून आम्हांला सलग रात्री शूटिंग करावे लागले, त्यामुळे शेड्यूल खूप व्यस्त होते. पण जेव्हा मी मॉनिटरवर अंतिम शॉट्स पाहिले, तेव्हा सगळा थकवा नाहीसा झाला. संपूर्ण टीमने खूप मेहनत घेतली, जेणेकरून हे लग्नाचे सीन पडद्यावर सुंदर आणि खरे वाटावेत.

प्रत्येक विधीसाठी मोहकचा सुंदर लूक, तिच्या अभिनयातील भावनिक खोली आणि संपूर्ण टीमची मेहनत यामुळे सरु मालिकेतील लग्नाचा ट्रॅक हा मालिकेतील सर्वात संस्मरणीय क्षणांपैकी एक ठरणार आहे. पण वेद आणि सरुच्या आयुष्यात अजूनही अनेक अडचणी आणि अडथळे आहेत, ज्यातून त्यांना पार पडायचे आहे.

## राशीभविष्य

**मेष :** पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे आणि तुमचा बॉस तुमच्या कामावर खूश असेल. व्यवसायात आर्थिक फायदा होईल, जॅकपॉट लागेल. वाहन खरेदीसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**वृषभ :** तुमची अडकलेली, महत्त्वाची कामे वेळेवर पूर्ण होतील. कला आणि अभिनय क्षेत्रात काम करणाजयांना आज उत्तम संधी मिळतील. राजकारणात तुम्हाला महत्त्वाची जबाबदारी मिळेल.

**मिथुन :** तुम्ही एखाद्या जुन्या मित्राशी संपर्क साधू शकता, ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. मुले अभ्यासापेक्षा खेळावर अधिक लक्ष केंद्रित करतील. घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल.

**कर्क :** आजचा दिवस तुमच्यासाठी उत्साहाने भरलेला असणार आहे. कुटुंबातील वडीलधाजयांचे आशीर्वाद घ्या, त्यांना आदर आणि सन्मान द्या. आज मालमत्तेच्या खटल्याबाबतीत काही सकारात्मक बदल होतील.

**सिंह :** सध्याच्या कामाच्या पद्धतीत कोणताही बदल करण्याचा प्रयत्न करू नका. जर तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल तर त्याबद्दल अधिक माहिती गोळा करणे महत्त्वाचे आहे.

**कन्या :** शिक्षकांचा दिवस चांगला जाईल. व्यवसायात नेहमीपेक्षा जास्त नफा होईल, ज्यामुळे तुम्ही आनंदी राहाल. महिलांसाठी हा दिवस चांगला असेल. विद्यार्थ्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळेल.

**तुळ :** या राशीच्या लेखकांना सन्मानित केले जाईल आणि त्यांच्या कामाचे कौतुक केले जाईल. सोशल मीडियावर सक्रिय राहणे फायदेशीर ठरेल. अविवाहितांना लग्नाचे चांगले प्रस्ताव मिळतील.

**वृश्चिक :** तुमच्या भावाकडून मिळालेली भेट तुम्हाला आनंद देईल. सरकारी नोकरीत असलेल्यांना चांगली बातमी मिळेल. रिअल इस्टेटशी संबंधित समस्या सोडवल्या जातील.


**धनु :** आजचा दिवस उत्तम जाईल. विद्यार्थी त्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील. आज एखाद्या खास कारणासाठी प्रवासाचे नियोजन केले जाऊ शकते. जवळचे नातेवाईक भेट देतील.

**मकर :** मित्रांसोबत वेळ घालवण्याची संधी मिळेल. वैवाहिक संबंध अधिक मधुर होतील. आज तुम्ही तुमची नियोजित कामे लवकर पूर्ण कराल. लोखंड व्यापाजयांना अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळेल.

**कुंभ :** तुम्हाला काळजीपूर्वक निर्णय घ्यावे लागतील. कोणाशीही बोलताना तुमच्या शब्दांवर नियंत्रण ठेवणे महत्वाचे आहे. आज तुम्हाला तुमच्या भावाकडून काही कामात सहकार्य मिळेल.

**मीन :** तुम्हाला न्यायालयीन प्रकरणांमधून लक्षणीय आराम मिळेल, ज्यामुळे तुमच्या कुटुंबात आनंद येईल. कामाच्या ठिकाणी नवीन प्रकल्प पूर्ण करण्यात कनिष्ठ तुमचे सहकार्य करतील.

## शब्दकोडे क्रमांक २२४५



**आडवे शब्द :-**
१) समुदाय
३) श्रीकृष्णाचे एक नाव
५) रानरेडा
७) आजपर्यंत
११) मुलीचा नवरा
१३) मऊ
१४) पंकज
१५) बाराचा संच (इं)
१६) श्वासोच्छ्वास
१७) रात्र
१८) एक उभयचर प्राणी
२१) झकास
२२) किंमत
२३) स्वतःला
२४) गाडीचे छत
२६) पावसाची माळ
२८) प्रत्येक दिवशी
३०) समोरासमोरची चकमक
३२) ताणलेल्या दोरीचा आवाज
३३) पापडाच्या पिठाची गोळी
३६) चंद्राची कड
३७) क्षुल्लक लोभात पडणे (वा.प्र.)
४०) तफावत
४२) निमग्न
४४) दात
४५) चारही बाजूस पाणी असलेली जमीन
४६) लोकर, लव (इं.)
४८) वांतीपूर्वीची स्थिती
४९) शेराचा चवथा भाग
५२) चंद्र
५५) बाजू, काठ
५६) दावानल
५८) जनावराचे पिलू
६०) वाळवंटातील जहाज
६१) कोलकाताचे विमानतळ
६४) यमराज्य
६५) पाठविलेला
६७) हेरलेली शिकार
६८) मनाला बोचणारे दु:ख
६९) दुलई
७३) घरातील मोठी माणसे
७५) रमापती
७६) कपाळभर लावलेले कुंकू
७७) होकारार्थी उत्तर

**उभे शब्द :-**
१) वक्र नसलेला
२) विरोध, प्रतिबंध
३) दहीहंडीचा प्रसाद
४) खाजखळ्याची वाट
५) गणेशाचे एक नाव
६) संधी, मोका
८) जन्म-मृत्यू
९) नवरदेव
१०) सुंदर युवती
१२) देव
१७) कौसल्यापुत्र
२०) दागिना (हिं.)
२२) नवरा, पती
२३) टप्पे घेत घेत केलेला प्रवास
२५) अर्धी ओंजळ
२६) किरकोळ सामान
२७) गहाण ठेवलेली वस्तू
२९) गाव दान करणे
३१) आजारपणाची स्थिती
३५) नम्र, वाकलेला
३८) तुफान, सोसाट्याचा वारा
३९) सैन्याचा तळ, होडी
४१) संन्यासाचा अंगरखा
४३) अंधार
४७) दोरी, कमरपट्टा
४९) झाडावर पिकू लागलेले फळ
५०) अखेर
५१) वाळवंट
५३) कड्क, जून
५४) वेतन, पगार घेणारा
५५) कट्टर
५७) पूर्वज
५८) कावकाव
५९) भगर, वरी
६२) प्रवासातील टप्पा
६३) *** तू काहे ना धीर धरे एक हिंदी चित्रपट गीत
६६) श्रीफळ
६७) सज्जन, प्रामाणिक
७०) कलाबूत
७२) भ्रम, जादू
७४) तपासणीसाठी अचानक केलेला हल्ला

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कमिशनचे आमिष देऊन ११ जणांची ४९ लाखाने फसवणूक

## सहा जणांविरुद्ध गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २२ :

खाद्यतेलाचा व्यवसाय करून त्यामध्ये गुंतवणूक केल्यास मोठ्या प्रमाणात कमिशन देण्यात येईल, असे आमिष देऊन एका महिलेसह तिचे दहा नातेवाईक अशा ११ जणांची ४९ लाख २० हजार २०० रुपयांनी फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी फसगत झालेल्या महिलेच्या तक्रारीवरून चांदूर बाजार पोलिसांनी सहा जणांविरुद्ध फसवणुक करणे व विश्वासघाताच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. साजिद इक्बाल शेख इमाम टेलर (४२), जावेद इक्बाल शेख इमाम, मोहम्मद वाजिद शेख इमाम (४३), मोहम्मद रियाज शेख रमजान (४२) मोहम्मद रिजवान शेख रमजान (४६) आणि एक महिला (सर्व रा. चांदूर बाजार) यांच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फसवणूक झालेल्या महिलेच्या तक्रारीनुसार, गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तींनी तक्रारदार महिलेला विश्वासात घेऊन खाद्यतेलाच्या व्यवहारात रक्कम गुंतवल्यास गुंतवणूकदारांना आम्ही कमिशन देवू, असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार महिलेने त्या सहा जणांकडे काही रक्कम दिली. तक्रारदार व आरोपींमध्ये हा व्यवहार एप्रिल २०२३ पासून सुरू झाला. सुरुवातीला तक्रारदार महिलेला गुंतवणुकीतून कमिशनही देण्यात आले. त्यानंतर तक्रारदार महिलेने तिच्या अन्य नातेवाईकांना सुद्धा या प्रकाराबाबत माहिती दिली. त्यामुळे महिलेच्या नातेवाइकांनी सुद्धा गुंतवणुकीसाठी त्या सहा जणांकडे रक्कम दिली. या ११ जणांनी सुमारे दोन वर्षांत टप्प्याटप्प्याने सुमारे ९४ लाख ३८ हजार २०० रुपये दिलेत. त्या रकमेपैकी ४५ लाख १८ हजार रुपये तक्रारदार महिला व त्यांच्या नातेवाइकांना कमिशन म्हणून सहा जणांनी परत दिलेत. मात्र उर्वरित ४९ लाख २०,२०० रुपये ही रक्कम बरेच महिने होऊनही आरोपी तक्रारदारांना देण्यास तयार नाहीत. इतकेच नाहीतर रक्कम परत मागण्यासाठी तगादा लावल्यास खोट्या प्रकरणात फसवण्याची धमकी दिली असल्याचे तक्रारदार महिलेने पोलिस तक्रारीत नमुद केले आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित महिलेने चांदूर बाजार पोलिस ठाणे गाठून आरोपींविरुद्ध तक्रार केली. तक्रारीवरून पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला . या प्रकरणाचा तपास चांदूर बाजारचे ठाणेदार अशोक जाधव, एपीआय उल्हास राठोड व त्यांचे पथक करत आहेत.

# क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेतील गुणवंतांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी,
साखरखेडा , दि. २२ :

क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा या दोन्ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी महत्त्वाच्या आहेत. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित होते असे मत व्यक्त करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन प्रा. नीलेश गावंडे यांनी केले. येथील स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयामध्ये सत्र २०२५–२६ मध्ये क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेतील गुणवंतांचा सत्कार सोहळा महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीलेश गावंडे उपस्थित होते. याप्रसंगी मंचावर इतिहास विभाग प्रमुख डॉ. रवींद्र झनके व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आशिष बरडे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. नीलेश गावंडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत शुभम गट्टे ८७ किलो वजन गटात ग्रीको रोमन या प्रकारात गोल्ड मेडल, ओम गोरे ८२ किलो वजन गटात ग्रीको रोमन या प्रकारात कांस्य पदक, गौरव वानखडे ५७ किलो वजन गटात फ्री स्टाईल या प्रकारात कांस्य पदक, कृष्णा चोपडे ६५ किलो वजन गटात फ्री स्टाईल या प्रकारात कांस्य पदक प्राप्त केले. आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत यश कोरडे लांब उडी (६.२९ मीटर) कांस्य प्राप्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवात स्पॉट फोटोग्राफी मध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत नरेंद्र यादव ७४ किलो वजन गटात फ्री स्टाईल या प्रकारात सुवर्ण पदक व दिव्यांनी शेळके हिने ५० किलो वजन गटात फ्री स्टाईल मध्ये सुवर्णपदक प्राप्त केले. शालेय विभागीय शूटिंग बॉल स्पर्धेत उपविजेता असलेल्या संघामधील प्रेम सपकाळ, करण देशमुख, श्रीकांत देशमुख, प्रणव गाडेकर, संतोष देशमुख, पंजाब देशमुख, हर्षल देशमुख, अजय शिंदे, रितेश लंबे यांचाही सत्कार करण्यात आला. आंतरमहाविद्यालयीन तलवार बाजी स्पर्धेत दर्शन बोर्डे सुवर्ण पदक, सुमित देशमुख रौप्य पदक, सर्वज्ञ दुकानदार कांस्य पदक, सुजित पवार कांस्य पदक प्राप्त केले. यांचाही सत्कार याप्रसंगी करण्यात आला. दिनांक २ ते १० नोव्हेंबर २०२५ दरम्यान गुरुदेव नानक विद्यापीठ अमृतसर येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये साठी तलवार बाजी मधील ४ ही खेळाडू पात्र यापैकी दर्शन बोर्डे आणि सुमित देशमुख सेबर प्रकारात सहभागी होतील तर सर्वज्ञ दुकानदार आणि सुजित पवार फॉइल प्रकारात सहभागी होणार आहेत.

# स्वच्छ भारत अभियान अंतर्गत मनपा शाळेत आरआरआर सेंटरचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २० :



स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अनुषंगाने अमरावती महापालिकेद्वारे अंबिका नगरातील मनपा शाळेत आरआरआर (रिड्यूस, रियूज, रिसायकल) सेंटरचे उद्घाटन मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. पर्यावरणपूरक वस्तूंच्या वापरांना चालना देण्यासोबतच घरातील वस्तू फेकून न देता त्या गरजूंसाठी आरआरआर सेंटरच्या माध्यमातून उपलब्ध करून देणे हा आहे. या उद्घाटनप्रसंगी मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर तसेच सर्व मनपा विभाग प्रमुख,अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान आयुक्त सौम्या शर्मा यांनी आपल्या घरातील वापरात नसलेली भांडी प्रतिकात्मक स्वरूपात आरआरआर सेंटरमध्ये जमा करून उपक्रमाची सुरुवात केली. हा अडगळीच्या वस्तू कमी करणे, वस्तूंचा पुनर्वापर आणि निरुपयोगी वस्तूंना नष्ट करून पुनर्निर्मिती करणे, या तीन महत्त्वाच्या तत्त्वांवर आधारित एक सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम आहे. यामध्ये नागरिकांनी आपल्या घरातील न वापरले जाणारे, पण अजूनही वापरण्यायोग्य वस्तू सेंटरमध्ये आणायच्या आहेत. या वस्तू गरजू नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जातील. आरआरआर सेंटरमध्ये जुने पण चांगल्या स्थितीतील कपडे, शालेय साहित्य (पुस्तके, दप्तर, पेन-पेन्सिल),वापरण्यायोग्य खेळणी, घरगुती साहित्य (भांडी, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक वस्तू–जर त्या चालू स्थितीत असतील), वापरलेले पण चांगल्या स्थितीतील पादत्राणे, जुन्या पण कार्यक्षम सायकली, संगणक,मोबाइल (जर ते चालू स्थितीत असतील किंवा दुरुस्त करता येतील) तसेच इतर कोणत्याही दैनंदिन उपयुक्त वस्तू, ब्लँकेट दिले जाऊ शकतात. आरआरआर सेंटरचा उपयोग पर्यावरण पूरकतेस चालना देण्यासह वस्तू टाकून न देता त्यांचा पुनर्वापर केल्याने कचरा कमी होतो. ज्यांना वस्तूंची गरज आहे, अशा गरजूंच्या मदतीसाठी हे सेंटर एक माध्यम आहे, गरजू व्यक्तींना त्या मोफत दिल्या जातील. यामुळे समाजात पुनर्वापराची सवय वाढेल, वस्तूंचा योग्य प्रकारे पुनर्वापर झाल्याने वस्तूंचे आयुष्य वाढेल. कचऱ्याचे प्रमाण कमी होईल, त्यामुळे शहर अधिक स्वच्छ व सुंदर होण्यासाठी हातभार लागेल.

### गोदामाचे शटर तोडून १.४९ लाखांची विदेशी दारू चोरली

**हिंगोली :** हिंगोली ते कळमनुरी मार्गावर बसपांगरा शिवारात गोदामाचे शटर तोडून चोरट्यांनी १.४९ लाख रुपये किंमतीची विदेशी दारु पळवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कळमनुरी पोलिस ठाण्यात सोमवारी ता. २० सायंकाळी गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजवरून चोरट्यांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत.

# जिल्हा किसान कॉंग्रेसची वज्रमूठ निर्धार सभा

■ महासागर प्रतिनिधी,
मलकापूर , दि. २२ :



शेतकऱ्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची तयारी दर्शवली. यामध्ये या भागातील हजारो शेतकऱ्यांनी यावेळी आयोजित आंदोलनामध्ये सामील व्हावे, असे आवाहन किसान कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराम पाष्टे यांनी केले. केंद्र व राज्य शासन शेतकऱ्याच्या कसे विरोधात आहे ते त्यांनी आपल्या भाषणातून सविस्तरपणे सांगितले. तालुक्यातील उमाळी येथे १६ ऑक्टोबर रोजी बुलडाणा जिल्हा किसान कॉंग्रेसच्या वतीने शेतकरी वज्रमूठ निर्धार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शेतकऱ्याच्या मालाला भाव, शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्याचे पीक विम्याचे पैसे, शेतकऱ्यांच्या पिकाचे वन्यप्राण्यापासून संरक्षण, इत्यादी विषयावर सविस्तर अशी चर्चा झाली. या सर्व मागण्या शासनाने त्वरित मान्य न केल्यास जन आंदोलन उभे करण्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी या सभेचे आयोजक जिल्हाध्यक्ष किसान कॉंग्रेस संभाजी शिर्के यांनी प्रास्तविकामध्ये यापूर्वी शेतकऱ्यांसाठी केलेल्या आंदोलनाची, भविष्यामध्ये शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची भूमिका व शेतकऱ्यांना न्याय मिळून देण्यासाठी जन आंदोलन उभे करणार असे जाहीर केले.

यावेळी प्रामुख्याने किसान कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष पराग पाष्टे , माजी आमदार राजेश एकडे , कॉंग्रेस प्रदेश उपाध्यक्ष लक्ष्मण घुमरे, प्रदेश सरचिटणीस डॉ. अरविंद कोलते, अल्पसंख्यांक प्रदेश उपाध्यक्ष रशीदखा जमादार, पक्षनेत्या स्वाती वाकेकर, किसान कॉंग्रेस प्रदेश उपाध्यक्ष चित्रांगण खंडारे, महिला कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष मंगला पाटील आदींनी मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर प्रदेश सरचिटणीस रामविजय बुरुंगले, भगवानराव धांडे, प्रमोद अवसरमोल, पदमराव पाटील, राजू पाटील, सोपान शेलकर, बंडू चौधरी, डॉ. सलीम, अनिल जयस्वाल, युसूफ खान, जाकीर मेनन, प्रीती भगत, आशा फरतोडे, सुगंधा पवार, अनिल भारंबे, राजू जवरे, ॲड. दिलीप बगाडे, गुलाम हुसेन, विनायकराव देशमुख, गिरीश देशमुख आदी उपस्थित होते.

# मोताळा तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या

## तालुका कॉंग्रेसची तहसीलदारांकडे मागणी



■ महासागर प्रतिनिधी,
मोताळा , दि. २० :

तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्यात यावी, अशी मागणी तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने आज १६ ऑक्टोबर रोजी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. मागील महिन्यात सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मात्र शासनाने जाहीर केलेल्या मदत यादीत तालुक्यातील केवळ १२ गावांचा समावेश करण्यात आला असून अनेक बाधित गावे यादीतून वगळण्यात आले आहे प्रत्यक्षात मोताळा तालुका पूर्णतः बाधित असून अनेक गावांतील शेती पिकांचे ७० टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे.

शासनाने जाहीर केलेली मदत जुन्या योजनांशी जोडून देण्याचा प्रयत्न होत आहे जे शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक आहे. मदतीचा लाभ थेट प्रत्येक शेतकऱ्यांना योजनांची जोड न देता त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. मागणीची दखल न घेतल्यास भविष्यात मोताळा तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे.

# ३१ उप मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस




■ महासागर प्रतिनिधी,
हिंगोली , दि. २० :

राज्यात राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत विविध उपक्रम राबवून त्याच्या नोंदी घेण्याच्या सूचना असतानाही २२३७ अंगणवाड्यांमधून उपक्रम न राबणविणाऱ्या हिंगोलीसह ३१ जिल्ह्यांतील महिला बाल कल्याण विभागाच्या उप मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांना तातडीने खुलासा करण्याचे आदेश बालविकास सेवा योजना आयुक्त कार्यालयाने दिले आहेत. राज्यात बालविकास सेवा योजना आयुक्तालयाच्या वतीने सुमारे १.१० लाख अंगणवाड्या चालविल्या जातात.

या अंगणवाड्यांमधुन येणाऱ्या बालकांना पुरक पोषण आहार देणे, पुर्व प्राथमिक अभ्यासक्रम शिकविणे, गरोदर व स्तनदा मातांना आहार पुरवठा करण्याचे काम अंगणवाड्यांमार्फत केले जाते. दरवर्षी ता. १७ सप्टेंबर ते ता. १६ ऑक्टोबर या कालावधीत राष्ट्रीय पोषण माह साजरा केला जातो. यामध्ये पोषण आहाराचे महत्व यासह इतर माहिती दिली जाते. या शिवाय खाद्यपदार्थांची माहितीही दिली जाते. या शिवाय गरोदर, स्तनदा मातांसाठी विविध धान्यांपासून पदार्थ तयार करून दाखविले जातात. अंगणवाडीनिहाय उपक्रमांची ऑनलाईन नोंदणी करणे अपेक्षीत आहे.

मात्र राज्यातील २२३७ अंगणवाड्यांमधून कुठलयाही प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले नाही या प्रकारामुळे केंद्र शासनाने तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.

यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील तीन अंगणवाड्यांचा समावेश आहे. या शिवाय ठाणे ३०१, छत्रपती संभाजीनगर २२४, बीड १७०, सोलापूर १३५, चंद्रपूर १२९, कोल्हापूर १२६, नंदूरबार १२४, पुणे १००, अकोला ९८, जालना ९८, नांदेड ८५, धाराशिव ८३, गडचिरोली ७९, नाशीक ७६, बुलढाणा ६८, पभणी ६१, यवतमाळ ५६, पालघर ३१, गोंदिया २९, मुंबई २८, अहिल्यानगर २६, सिंधुदुर्ग १६, मुंबई शहर १४, अमरावती १३, जळगाव १२, लातूर १२, सांगली ९, वाशीम ९, रत्नागिरी जिल्हयातील १ अंगणाडीचा समावेश आहे.

या जिल्हयातील उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **M ARSHAD RAFIK LULANI.** NOW MY NEW NAME IS **ARSHAD RAFFIK LULANI.** ADD : BABA NAGAR SARKHANI PO KINWAT DIST NANDED 431804.

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. J7133760. MY OLD NAME WAS **ARUN AGRAWAL.** NOW MY NEW NAME IS **ARUN KUMAR AGRAWAL.** ADD : SAMTA COLONY RAIPUR CHATTISGARH 492001

MY OLD NAME WAS **NIKHAT PARVEEN SHAIKH IBRAHIM.** NOW MY NEW NAME IS **NIKHAT KHAN MUSHTAK KHAN.** ADD : 225, B/H, AGRASEN BHAVAN GANDHIBAGH NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **SYEDA NABILA ALI SYED NASIR.** NOW MY NEW NAME IS **NABILA ABID KHAN.** ADD : FLAT NO.101 RUIKAR ROAD MAHAL NAGPUR 440032

I **MANISH DODWANI** HEREBY DECLARE THAT MY NAME IN MY SON'S ( **PRASHANT DODWANI)** EDUCATIONAL DOCUMENTS WAS WRONELY MENTIONED AS **MANISHKUMAR DODWANI** BUT AS PER MY ADHAR CARD AND PAN CARD MY NAME IS **MANISH DODWANI.** ADD: OLD RADHA SWAMI MANDIR, SUNDAR NAGAR, GONDIA 441601

MY OLD NAME WAS **SOFIYA PASHA KHIZAR PASHA.** NOW MY NEW NAME IS **SOFIYA PASHA.** ADD : WARISPURA, J.N. ROAD, KAMPTEE, NAGPUR-441002

MY OLD NAME WAS **SHIREEN NAAZ TABASSUM ABDUL RAUF PATEL / SHIRIN NAZ TABASSUM.** NOW MY NEW NAME IS **SHIREEN NAAZ PATEL.** ADD : HOUSE NO.160 PATEL BUILDING TUKARAM CHAL SADAR NAGPUR 440001

I **VIKITA AGRAWAL** HEREBY DECLARE THAT IN MY OLD PASSPORT BEARING PASSPORT NO **M2516505** MY NAME WAS MENTIONED AS **VITIKA RAMAKANT AGRAWAL** AND I WANT MY NAME IN MY NEW PASSPORT AS **VIKITA AGRAWAL** AS PER MY ADHAR CARD AND PAN CARD. **ADD:** GIRDHAR NIWAS, NEAR PRATAP CLUB, AMBEDKAR SQUARE, GONDIA-441601

MY OLD NAME WAS **MOHAMMAD KALIM MOHAMMAD BASHIR.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD KALIM MOHAMMAD BASHIR SHEIKH.** ADD : NIRALA LAYOUT, DIGHORI RING ROAD, BESA, NAGPUR - 440034

MY OLD NAME WAS **SHEIKH SHAYANA SHEIKH MAHEMOOD.** NOW MY NEW NAME IS **SHAYANA ALI MOHOMMAD ALI SAIYYAD.** ADD : NURI CHOWK, CIVIL LINES, MAHARANA PRATAP WARD, GONDIA- 441601

MY OLD NAME WAS **RIYAZUDDIN NASIRUDDIN.** NOW MY NEW NAME IS **RIYAZ NASRUDDIN SHEIKH.** ADD : RAJIV GANDHI NAGAR NAGPUR - 440017

MY OLD NAME WAS **PAWAN DAGA.** NOW MY NEW NAME IS **PAWAN KUMAR DAGA.** ADD : FLAT NO 203 TAJSHREE LAKSMAN APARTMENT QUETA COLONY LAKADGANJ NAGPUR

MY OLD NAME WAS **KANEEZ KOSHISH.** NOW MY NEW NAME IS **KANEEZ NOMAN ALI KOSHISH.** ADD : F NO 201 RAJ HIGHTS N/R NAYAPURA SHANTI NAGAR NAGPUR: 440002 (MS)

MY OLD NAME WAS **SHABBIR HUSAIN.** NOW MY NEW NAME IS **SHABBIR NAZAR HUSAIN.** ADD : H- NO 461 SAI BABA CHOWK SHANTI NAGAR NAGPUR: 440002 (MS)

MY OLD NAME WAS **ALEFIYA HUSAIN.** NOW MY NEW NAME IS **ALFIYA SHABBIR HUSAIN.** ADD : H-NO 461 SAI BABA CHOWK SHANTI NAGAR NAGPUR: 44002 (MS)


### पूर्णा नदीच्यापात्रात सापडला बेपत्ता तरुणाचा मृतदेह


**हिंगोली , दि. २० :** परभणी जिल्हयातील डिग्रस येथून मागील एक महिन्यापासून बेपत्ता असलेल्या तरुणाचा मृतदेह सेनगाव तालुक्यातील चिंचखेडा शिवारात पूर्णा नदीच्या पात्रात आढळून आला आहे. त्याच्या अंगावरील बनीयन वरून त्याची ओळख पटली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सेनगाव तालुक्यातील चिंचखेडा शिवारात पूर्णा नदीच्या पात्रात एक मृतदेह असल्याची माहिती सेनगाव पोलिसांना मिळाली होती. त्यावरून सेनगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक मस्के, जमादार सुभाष चव्हाण, टी. के. वंजारे, एकनाथ राठोड यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता सदर मृतदेह कुजलेल्या अवस्थेत दिसून आला.

# आदिवासी कृती समितीच्या वतीने विविध मागण्यांसाठी एल्गार मोर्चा



**बाभुळगाव :** शहरातील शिव छत्रपती चौकात आपल्या विविध मागण्यांसाठी आदिवासी कृती समितीच्या वतीने गुरुवारी दि. १६ ऑक्टोबर रोजी एल्गार मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी चौकातून पारंपरिक वाद्याच्या गजरात एल्गार मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. यावेळी विविध मागण्याचे निवेदन तहसीलदार मिरा पागोरे यांना देण्यात आले. अनुसूचित जमातीच्या यादीत बंजारा, धनगर इतर कोणत्याही जातीचा समावेश करु नये, आंध्र प्रदेशच्या धर्तीवर राज्यातही मन्नेरवारलू वगळून कोलावार अशी दुरुस्ती करावी, राज्याच्या अनुसूचित जमाती यादीतील क्र. ३६ वर ओरॉन, धांगड नोंद वगळण्यात यावी, आदिवासी उमेदवारांची विषेश पदभरती प्रक्रिया राबवण्यात यावी, यासह इतर मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. या वेळी चंदू परचाके, विलास चांदेकर, संगीता माळखुरे, शिला तोडसाम, मनिषा सोयाम, वच्छला गाजलेकर, मीरा माळखुरे, अर्पित उईके, मारोतराव गेडाम, अतुल मडपाते, गुणवंत वरखडे, किशोर मेश्राम, श्रीराम गेडाम, संजय मडावी, अमोल मेश्राम, सुनिल मडावी, नीळकंठ मडावी, संजय कोयताळे, हनुमान पेंदोर यासह असंख्य आदिवासी बांधव उपस्थित होते.

# आकाश कंदील स्पर्धेद्वारे पर्यावरण रक्षणाचा संदेश



**वाशीम :** राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स केवळ कठोर शिस्त आणि राष्ट्रभक्तीचेच नव्हे, तर सामाजिक जबाबदारीचेही भान ठेवतात. याच जाणिवेतून श्री बाकलीवाल विद्यालय आणि उच्च माध्यमिक विद्यालय, येथील एनसीसी युनिटने या दिवाळीत 'प्रदूषण मुक्त आकाश कंदील' स्पर्धेच्या माध्यमातून एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला. या स्पर्धेव्दारे विद्यार्थ्यांनी 'प्लास्टिकमुक्त व प्रदूषणमुक्त दीपावली' साजरी करण्याचा संदेश नागरिकांना दिला. पर्यावरण रक्षणाचा संकल्प: दिवाळीत प्लास्टिकचा अतोनात वापर, फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनीप्रदूषण आणि आरोग्याला होणारा धोका याबद्दल लोकांमध्ये जनजागृती व्हावी, या उदात्त उद्देशातून एनसीसी विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. एनसीसी अधिकारी अमोल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅडेट्सनी प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळून, केवळ रंगीत कागद आणि नैसर्गिक साहित्याचा वापर करून आकर्षक हस्तकलेचे आकाश कंदील तयार केले. आरोग्यदायी भविष्याचा संदेश: विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या आकाश कंदिलांवर ''प्रदूषणमुक्त प्लास्टिकमुक्त दीपावली, हर जगह खुशहाली'', 'फटाकेमुक्त दीपावली, आरोग्यसंपन्न दीपावली' असे विविध सामाजिक संदेश लिहून त्यांनी प्रदूषणमुक्त आणि प्लास्टिकमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले. या उपक्रमाने कला आणि कल्पकतेला प्रोत्साहन देण्यासोबतच, पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश समाजात रुजवला. या स्पर्धेमध्ये एकूण ६२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यापैकी प्रथम क्रमांक प्रदीप इंगोले, द्वितीय क्रमांक रजत कुटे, आणि तृतीय क्रमांक प्रेमनाथ ढेंगळे यांनी पटकावला.

# भाऊबीज (यमद्वितीया)



**या** दिवशी मृत्यूची देवता यम आपल्या बहिणीकडे जेवायला जात असल्याने नरकातील जिवांना या दिवशी नरकयातना भोगाव्या लागत नाही, असे म्हटले जाते. तसेच या दिवशी बहीण भावाला ओवाळून त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. पुराणकाळापासून चालत आलेल्या या सणाबाबतची शास्त्रीय माहिती या लेखाच्या माध्यमातून करून घेऊया.

**१. तिथी : कार्तिक शुद्ध द्वितीया**

**२. इतिहास : या दिवशी यम आपली बहीण यमुना हिच्या घरी जेवायला गेला ; म्हणून या दिवसाला 'यमद्वितीया' असे नाव मिळाले.**

**३. महत्त्व :**

अपमृत्यू येऊ नये म्हणून धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी आणि यमद्वितीया या दिवशी मृत्यूची देवता 'यमधर्म' हिचे पूजन करतात.

'या दिवशी यमराज आपली बहीण यमुना हिच्या घरी जेवायला जातो अनब त्या दिवशी नरकात पिचत पडलेल्या जिवांना त्या दिवसापुरते मोकळे करतो.'

हा दिवस मातेच्या गर्भातून जन्म घेतलेल्या जिवांना एकमेकांविषयी वाटणारा जिव्हाळा व्यक्त करण्याचा दिवस आहे.

या दिवशी जी बहीण आपल्या भावासाठी श्री यमाईदेवीकडे काही मागणे मागते, तिच्या भावानुसार ते भावाला मिळते. त्यामुळे तिचे भावाशी असलेले देवाण–घेवाणहिशोब काही प्रमाणात संपुष्टात येतात.

**४. सण साजरा करण्याची पद्धत**

**यमतर्पण, यमदीपदान आणि यमाची प्रार्थना करणे** –अपमृत्यू निवारणार्थ 'श्री यमधर्मप्रीत्यर्थं यमतर्पणं करिष्ये ।' असा संकल्प करून यमाच्या चौदा नावांनी तर्पण करावे. हा विधी पंचांगात दिलेला असतो. 'याच दिवशी यमाला दीपदान करायचे असते. यम ही मृत्यू आणि धर्म यांची देवता आहे. 'प्रत्येक माणसाला मरण आहे', ही जाणीव सतत असणे आवश्यक आहे ; कारण त्यामुळे माणसाच्या हातून वाईट कार्य वा धनाचा अपव्यय होणार नाही. तेव्हा यमाला दीपदान करून सांगायचे, 'हे यमा, या दीपाप्रमाणे आम्ही सतर्क आहोत, जागरूक आहोत. जागरूकतेचे, प्रकाशाचे प्रतीक असलेला दीप तुला अर्पण करीत आहोत, त्याचा स्वीकार कर. तुझे आगमन केव्हा होईल, हे आम्हाला माहीत नाही ; म्हणून आम्ही आमचा हिशोब वेळच्या वेळी ठेवतो, ज्यामुळे अर्धवट राहिलेल्याची चिंता करण्याची वेळ येत नाही ; कारण आम्हाला माहीत आहे की, तू अचानक कधीही येऊ शकतोस.'

**मरात्पर गुरु परशराम माधव पांडे महाराज**

**बहिणीने भावाला ओवाळणे** –या दिवशी भावाने बहिणीकडे जावे आणि बहिणीने भावाला ओवाळावे. एखाद्या स्त्रीला भाऊ नसेल, तर तिने कोणाही परपुरुषाला भाऊ मानून त्याला ओवाळावे. ते शक्य नसल्यास चंद्राला भाऊ मानून ओवाळावे. यया दिवशी कोणत्याही पुरुषाने स्वतःच्या घरी पत्नीच्या हातचे अन्न घ्यायचे नसते. त्याने बहिणीच्या घरी जावे अनब तिला वस्त्रालंकार वगैरे देऊन तिच्या घरी भोजन करावे. सख्खी बहीण नसेल, तर कोणत्याही बहिणीकडे किंवा अन्य कोणत्याही स्त्रीला भगिनी मानून तिच्याकडे जेवावे.'

**५. भाऊबीजेला भगिनींना स्वसंरक्षणार्थ समर्थ करूया !**

'कित्येक भगिनींवर आज बलात्कार होतो, कित्येकींचे संसार उद्ध्वस्त होतात. एकतर्फी प्रेमातून कित्येकींची उघड उघड हत्याही होते. समाजाच्या प्रेतवतब, म्हणजे क्षात्रधर्महीन मानसिकतेचे हे प्रतीक आहे. स्वतःमध्ये क्षात्रतेज जागवून शारीरिक अनब मानसिक दृष्ट्या सबळ होऊन आपण आपल्या भगिनींचे रक्षण केले पाहिजे. याचबरोबर भगिनींनाही स्वसंरक्षणार्थ सिद्ध होण्यासाठी प्रोत्साहित आणि प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. हीच त्यांच्यासाठी भाऊबीजेची खरी भेट ठरेल. दीपावलीच्या निमित्ताने समाज, राष्ट्र अनब धर्म यांसाठी काहीतरी करण्यासाठी यथाशक्ती पाऊल उचलले, तरच हा सण खऱ्या अर्थाने साजरा होईल.'

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**
**संकलन : श्री. विद्याधर जोशी**
**संपर्क : ९०१९०८४४५०**

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादक:श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३

# निरामय

## औषधांमुळे हृदयविकाराचा झटका?

**वजन कमी करण्याच्या औषधांमुळे हृदयविकाराचा झटका?**

तुमच्यासाठी सगळ्यात मोठी समस्या कोणती आहे, असे आजच्या काळात कोणाला विचारले तर बहुतेकांचे उत्तर लठ्ठपणा हेच असते. सध्या लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेकजण यामुळे त्रस्त आहेत. बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव आणि चुकीचा आहार यामुळे ही समस्या झपाट्याने वाढते आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी बरेचजण औषधांचा आधार घेतात; पण अनकांना वजन कमी करणाऱ्या औषधांमुळे हृदयविकाराचा झटका येण्याची भीतीही असते.

आरोग्य चर्चा
डॉ. दिलीप शिरसाट

**अभ्यास काय सांगतो?**

काही दिवसांपूर्वी अमेरिकेत यासंबंधीच्या ओझेम्पिक नामक औषधावर संशोधन करण्यात आले. सशोधनात ही औषधे फक्त वजनच कमी करत नाहीत तर हृदयाच्या आजारांमध्येही मदत करत असल्याचे आढळले. ङ्मास जूरल ब्रिघमफ ग्रुपच्या डॉक्टरांनी केलेल्या या अभ्यासाने जगभरात लक्ष वेधले. औषध घेतल्यानंतर रुग्णांची रुग्णालयात जाण्याची वारंवारिता खूप कमी आल्याचेही आढळले. या अभ्यासात जास्त लक्ष



दिली गेलेली सेमाग्लूटाइड आणि टिर्झेपेटाइड ही दोन औषधे होती. या अभ्यासात ९० हजार रुग्णांचा समावेश होता. त्यांना हार्ट फेल्युअर, लठ्ठपणा आणि टाईप-२ डायबेटीस अशा समस्या होत्या.

**औषधांमुळे खरेच हार्ट अटॅक येतो का?**

या संशोधनातून वजन कमी करणाऱ्या औषधांमुळे हार्ट अटॅकचा धोका वाढतो, ही धारणा चुकीची ठरली आहे. संशोधनात दिसले, की सेमाग्लूटाइड घेणाऱ्यांमध्ये मृत्यू किंवा हॉस्पिटलमध्ये दाखल होण्याचे प्रमाण ४२ टक्क्यांनी कमी झाले तर टिर्झेपेटाइड वापरणाऱ्यांमध्ये हा परिणाम आणखी जास्त म्हणजे ५८ टक्क्यांपर्यंत पोहोचला.

**काय लक्षात ठेवावे?**

वजन कमी करण्यासाठी औषधे घ्यायची असतील तर फक्त खऱ्या आणि ब्रँडेड औषधांचा वापर करा.

## स्पाँडिलायटिस आहे?

सर्वसाधारणपणे मानेच्या किंवा कंबरेच्या स्पाँडिलायटिसची लक्षणे अधिक प्रमाणात आढळून येतात. आपण आजूबाजूला वावरताना मानेला किंवा कंबरेला पट्टा बांधलेले अनेकजण आढळतात. ते शक्यतो स्पाँडिलायटिसचेच रूग्ण असतात. हा विकार कोणालाही होऊ शकतो. सध्याच्या धावपळीच्या युगात प्रत्येकालाच तारेवरची कसरत करावी लागत आहे. कमी वेळेत जास्तीत जास्त कामं पार पाडावी लागत असल्याने दमछाक होणं स्वाभाविक आहे. यातूनच विविध आजार उद्‌भवतात. त्यात इतर काही आजारांप्रमाणेच अलीकडे स्पाँडिलायटिसचा विकारही मोठ्या प्रमाणावर दिसून आलं आहे. सर्वसाधारणपणे मानेच्या किंवा कंबरेच्या स्पाँडिलायटिसची लक्षणं आढळून येतात. आपण आजूबाजूला वावरताना मानेला किंवा कंबरेला पट्टा बांधलेले अनेकजण आढळतात. ते शक्यतो स्पाँडिलायटिसचेच रूग्ण असतात. हा विकार स्त्री किंवा पुरूष कोणालाही होऊ शकतो. पूर्वी या विकाराने त्रस्त असणाऱ्यांची संख्या बरीच कमी होती. शिवाय हा विकार उतारवयातच होत असे. मात्र अलीकडे तरूण वयातही या आजाराची लक्षणं दिसून येत आहे. तारुण्यातच असा आजार जडल्यास संबंधित व्यक्तीची मानसिक अवस्था भलतीच बिकट होते. अर्थात अलिकडे या आजारावर प्रभावी उपचार करणं शक्य झालं आहे. मात्र आधी स्पाँडिलायसिस म्हणजे काय हे जाणून घेणं गरजेचं ठरेल.

आरोग्यवेध

आपल्या शरीरातील प्रत्येक मणक्यामधून नसेद्वारे रक्तपुरवठा केला जातो. काही कारणाने या नस दबल्या गेल्यास स्पाँडिलायटिसचा विकार उद्‌भवतो. मान दुखणं, वळवताना किंवा हलवताना त्रास होणं, हात दुखणं, हाताला मुंग्या येणं अशा प्रकारची लक्षणे जाणवू लागतात. यालाच सर्व्हायकल स्पाँडिलायसिस म्हणतात. दुसऱ्या प्रकारात कंबर दुखणं, दोन्ही किंवा एक पाय वरून खालपर्यंत दुखणं, पायांना मुंग्या येणं, जड वाटणं, बधिर झाल्यासारखं वाटणं, थोडीशी हालचालही त्रासदायक वाटणं अशा स्वरूपाची लक्षणं जाणवू लागतात. यालाच लम्बर स्पाँडिलायटिस असं म्हणतात.

पुरुषांमध्ये अँकिओझिंग स्पाँडिलायटिसचं प्रमाण अधिक आढळून येतं. यामुळे माकडहाड तसंच मणके अधिक प्रमाणात प्रभावित होतात. यामध्ये स्नायू आखडण्यापासून सुरुवात होते. त्यानंतर हळूहळू मान आणि कंबरेची हालचाल बंद होते. शिवाय कंबरेला बाक येण्याचीही शक्यता असते. संबंधित रुग्णाला चोवीस तास वेदना होत असतात. त्यामुळे मान हलवणंही अशक्य होऊन जातं. सदर लक्षणांवरुन या आजाराचं गंभीर स्वरुप तसंच रुग्णांना सहन कराव्या लागणाऱ्या वेदनांची कल्पना येते. रुग्णामध्ये आढळणाऱ्या लक्षणावरून



त्याला कोणत्या स्वरूपाचा स्पाँडिलायसिस झाला आहे हे निश्चित केलं जातं.

सतत एका दिशेला नजर स्थिर करून पहात राहणं, मान अचानक वळवणं यासारख्या कारणांमुळे मानदुखी निर्माण होते. सुरुवातीच्या काळात या व्याधीकडे दुर्लक्ष केल्यास गुंतागुंत वाढण्याची शक्यता असते. शिवाय सतत वाकून काम कराव्या लागणाऱ्या व्यक्तींमध्ये कंबरदुखीची लक्षणं जाणवतात. शिवाय कंबर आखडणं किंवा त्या भागाला रक्तपुरवठा सुरळीत न होणं अशी लक्षणंही दिसून येतात. यातील कोणत्याही लक्षणांवर तातडीने उपाय करणं गरजेचं ठरतं. विशेषत: वाहनचालकांना कंबरदुखीचा त्रास अधिक प्रमाणात होत असल्याचं दिसून आलं आहे. सतत एकाच अवस्थेत बसून वाहन चालवल्यामुळे कंबरेचे स्नायू आखडतात. त्यातून कंबरदुखी निर्माण होते. कारणं कोणतीही असली तरी मानदुखी किंवा कंबरदुखीवर वेळीच इलाज करणं महत्त्वाचं ठरतं.

स्पाँडिलायटिसच्या विकारामध्ये एक्स-रे तसंच एमआरआय चाचण्या उपयुक्त ठरतात. शिवाय या विकारावर प्रभावी ठरतील अशी औषधे होमिआपॅथीमध्ये उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे होमिओपॅथीच्या उपचारामुळे स्पाँडिलायटिससारखा विकार पूर्णपणे बरा होतोच शिवाय तो पुन्हा उद्‌भवण्याची शक्यताही नसते. शरीराच्या एखाद्या भागातील दबली गेलेली नस पूर्ववत करण्यासाठी ही औषधं उपयोगी ठरतात. त्यामुळे मानेचा किंवा कंबरेचा पट्टा सुटण्यास आपोआपच मदत होते. अर्थात या विकारावरील होमिओपॅथीची औषधे एक महिन्यापासून सहा महिन्यांपर्यंतच्या कालावधीसाठी घ्यावी लागतात. कोणताही विकार समूळ नष्ट करण्यासाठी काही कालावधी जाऊ द्यावा लागतो. तोपर्यंत सातत्याने आणि वेळेवर उपचार घेणं गरजेचे ठरतं. ही औषधं प्रभावी ठरण्याचं आणखी एक कारण म्हणजे मानसिक ताणतणावांवर होमिओपॅथीचा इलाज प्रभावी ठरतो. त्यामुळे स्पाँडिलायटिसचा विकार कमी होण्याबरोबरच मानसिक ताणतणावांपासूनही सुटका होते. शिवाय या उपचारामुळे शांत झोप लागणं शक्य होत असल्यामुळे रूग्णाच्या शारीरिक क्षमतेत वाढ होते.

थोडक्यात, स्पाँडिलायटिसबरोबरच शरीरातील इतर व्याधींवरही होमिओपॅथीचा उपचार प्रभावी ठरत आहे. यादृष्टीने रुग्णांनी विचार करून या उपचारपद्धतीचा आधार घ्यायला हवा. त्याद्वारे रूग्णांचं जीवन सुखकर होण्यास मदत होते.

## मानसिक आरोग्याचे शरीरावर दुष्परिणाम

मानसिक आरोग्य चांगले राखणे म्हणजे आपले विचार, भावना आणि वर्तनात संतुलित राखण्याची क्षमता वाढवणे. चांगले आरोग्य आपल्याला ताणतणावाचे व्यवस्थापित करण्यास, समस्यांना तोंड देण्यास, माहितीपूर्ण निर्णय घेण्यास आणि इतरांशी निकोप संबंध निर्माण करण्यास मदत करते. मात्र जागतिक आरोग्य संघटनेच्या मते सध्या जगभरातील अंदाजे सातपैकी एक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या मानसिक आरोग्य समस्येने ग्रस्त आहे.

मानसिक आरोग्य बिघडण्याची अनेक कारणे आहेत. त्यात सततचा ताण, कामाचा किंवा अभ्यासाचा दबाव, झोपेचा अभाव, अस्वास्थ्यकर जीवनशैली आणि नकारात्मक विचार यांचा समावेश आहे. सामाजिक संबंधातील तणाव, कुटुंब आणि मित्रांपासून अंतर तसेच वैयक्तिक आव्हाने या गोष्टीदेखील मानसिक आरोग्यावर परिणाम करतात. मानसिक आरोग्यावर वेळेत लक्ष देणे आणि किरकोळ समस्या गंभीर होण्यापासून रोखण्यासाठी गरज पडल्यास तज्ज्ञांची मदत घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

दुखणी-उपचार
डॉ. मोहन सहस्त्रबुद्धे

नैराश्य, चिंताविकार, ताण, मूड स्विंग आणि कमी आत्मसन्मान ही मनोविकाराची प्राथमिक लक्षणे आहेत. काही तरुणांना झोपेची समस्या आणि भूकेचे असंतुलनदेखील जाणवते. सततचा मानसिक ताण आणि चिंता व्यक्तीची लक्ष केंद्रित करण्याची क्षमता कमी करू शकते. त्यामुळे अभ्यास, काम आणि वैयक्तिक जीवनावर परिणाम होतो. सामाजिक स्थिती, एकाकीपणा आणि नातेसंबंधांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. ही अवस्था बराच काळ कायम राहिली तर मनात आत्महत्येचे विचार येण्याचा किंवा नकारात्मक वर्तनाचा धोका वाढू शकतो.

मानसिक आरोग्य बिघडल्याने इतर आजारांचा धोकाही वाढतो. खराब मानसिक आरोग्य केवळ मनापुरते मर्यादित नाही तर त्याचा शरीरावरही खोलवर परिणाम होतो. दीर्घकाळ ताण, नैराश्य, चिंता रक्तदाब आणि हृदय गतीतील असंतुलन निर्माण होणे या स्वरुपात परिणाम दिसू शकतो. यामुळे हृदयरोगांचा धोकाही वाढतो. झोपेचा अभाव आणि सतत मानसिक ताण असल्यास रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. स्वाभाविकच शरीर आजारांना बळी पडण्याची शक्यता वाढते. याव्यतिरिक्त सततचा ताणतणाव संप्रेरक कॉर्टिसोल



वाढवतो. तो जळजळ, पोट आणि पचन समस्यांना प्रोत्साहन देतो. मानसिक आरोग्य बिघडल्याने मायग्रेन, सततची डोकेदुखी, स्नायूंचा ताण आणि थकवा यासारख्या शारीरिक समस्यादेखील उद्भवू शकतात. शिवाय सततच्या मानसिक ताणामुळे वजन वाढणे किंवा कमी होणे, थकवा, उर्जेचा अभाव आणि सतत अशक्तपणा येऊ शकतो. म्हणूनच मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करण्याची चूक करु नये.

**ते कसे टाळायचे?**

निरोगी दिनचर्या पाळा. दररोज पुरेशी झोप घ्या.

## उच्च रक्तदाबाचा मोठा धोका

माणसाला त्रास देणाऱ्या सर्वात सामान्य आजारांपैकी एक म्हणजे उच्च रक्तदाब होय. त्याला 'सायलेंट किलर' असेही म्हणतात. सुरुवातीला त्यात फारशी लक्षणे दिसत नाहीत; परंतु कालांतराने ती अधिक धोकादायक बनतात. काळजीची बाब म्हणजे उच्च रक्तदाबामुळे डोळ्यांचे आरोग्य बाधित होऊ शकते. म्हणूनच याविषयी विस्ताराने जाणून घेणे गरजेचे ठरते.

केवळ उच्च रक्तदाबच नव्हे तर अनेक रोगांची लक्षणे डोळ्यांद्वारे दिसतात. रेटिनामध्ये होणारे बदल उच्च रक्तदाबाची व्याप्ती दाखवतात आणि इतर अवयवांच्या झालेल्या नुकसानाचे मूल्यांकन करण्यासाठीदेखील याचा उपयोग होऊ शकतो. रेटिनातील लहान रक्तवाहिन्यांवर रक्तदाबातील किरकोळ बदलाचा सहजपणे परिणाम होतो कारण त्या खूप संवेदनशील असतात. रक्तदाब वाढताच लहान रक्तवाहिन्या कडक आणि अरुंद दिसतात. हा परिणाम स्पष्टपणे दिसून येतो.

आरोग्यवेध
डॉ. हेमंत राठी



डोळ्यांना किती नुकसान होते?

उच्च रक्तदाब बराच काळ टिकून राहिला तर त्याचे परिणाम डोळ्यांवर स्पष्टपणे दिसून येतात. रेटिनाला नुकसान होऊ लागते. त्याला वैद्यकीय भाषेत 'हायपरटेन्सिव्ह रेटिनोपॅथी' म्हणतात. या काळात रेटिनाच्या धमन्या पूर्वीपेक्षा कडक आणि जाड होतात. हा परिणाम बराच काळ टिकला तर धमन्यांभोवती वायरिंग तयार होऊ लागते. नंतर या कडक झालेल्या धमन्या नसांमध्ये रक्तप्रवाहात अडथळा निर्माण करू शकतात. त्याला 'आर्टे रिओव्हेनस निकिंग' म्हणतात.

## आरोग्यदायी मसाले

प्रत्येक भारतीय मसाल्याची एक खासियत असते. जेवण स्वादिष्ट बनवण्यापर्यंत त्यांचा उपयोग मर्यादित नसतो. आहारात योग्य प्रमाणात समावेश केल्यास हे मसाले आरोग्यासाठी लाभदायक ठरतात. आपल्याला माहीत नसलेल्या अनेक मसाल्यांचे हे आगळे गुणधर्म.

दालचिनीचा वापर पदार्थाची चव दुपटीनं वाढवतो. दालचिनी हा सुगंधी मसाल्याचा प्रकार. रस्सेदार भाज्या, पुलाव तसंच गोड पदार्थांमध्येही दालचिनी घातली जाते. ही दालचिनी मधुमेहींसाठी वरदान ठरू शकते, असं एका संशोधनातून समोर आलंय. शरीर इन्शुलिनचा प्रतिकार करत असेल तर दालचिनीमुळे याला आळा बसू शकतो. म्हणजेच मधुमेह नियंत्रणात दालचिनी महत्त्वाची भूमिका बजावते. तसंच अपचन, सर्दी, जुलाब, रक्ताभिसरणात येणारे अडथळे यावरही दालचिनी उपयुक्त ठरते.

आरोग्यदायी

✻ लवंग हा असाच एक औषधी पदार्थ. दातांच्या समस्यांवर लवंगाचा वापर हमखास केला जातो. बॅक्टेरियामारक गुणधर्मांमुळे दातदुखीत दाढेखाली लवंग ठेवण्याचा सल्ला दिला जातो. जास्त जेवळ झाल्यानंतर अस्वस्थ वाटत असेल तर लवंगेमुळे आराम पडतो. उलट्या, जुलाब, अपचन, पचनसंस्थेतील बिघाड यावर लवंग हा रामबाण उपाय ठरू शकतो.

✻ जिऱ्यामुळे फोडणीची लज्जत अधिक वाढते. हे साधंसं जीरं अनेक रोगांवरचं औषध ठरू शकतं. पचनसंस्थेच्या तक्रारी, ॲनिमिया आणि सर्दी यावर जीरं लाभदायक ठरतं. मूळव्याधीची समस्या दूर करण्याचे आश्चर्यकारक गुणधर्म जीऱ्यात असतात. जीऱ्यामुळे शरीराला लोह आणि मॅंगनिज ही खनिजं मिळतात. यामुळे हाडांमध्ये कॅल्शियम शोषलं जातं. तसंच रक्तदाबही नियंत्रणात राहतो.



✻ बिर्याणी, पुलावची लज्जत वाढवणारी मसाल्याची मोठ्या आकाराची वेलचीही आरोग्यदायी आहे. पचनाच्या तक्रारी तसंच गॅसच्या समस्या असल्यास या वेलचीचं सेवन करावं. गळ्याच्या तक्रारी, छातीत कफ जमणे, दाढ दुखणं या समस्यांवरही मसाल्याची वेलची प्रभावी ठरते.

✻ केशरात अनेक आरोग्यदायी गुणधर्म असतात. नैराश्य, दृष्टीदोष, विस्मरण यावर केशर प्रभावी ठरतं. पचनाच्या तक्रारींवरही केशर उपकारक आहे. गॅस, बद्धकोष्ठता तक्रारी दूर करण्याची क्षमता काळ्या मिरीत असते.

## ...तर बाळावर प्रतिकूल परिणाम

गरोदरपणात महिलेने आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. या काळात दुर्लक्ष केल्याने न जन्मलेल्या बाळाच्या आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. बाळाला हृदयरोगाचा धोकादेखील वाढतो. वैद्यकीय भाषेतया स्थितीला जन्मजात हृदयरोग म्हणतात.

भारतात दरवर्षी दोन लाख मुले हृदयविकाराने ग्रस्त होतात. एकेकाळी हा आजार दुर्मीळ मानला जात होता; परंतु आज भारतासह जगभरातील प्रत्येक शंभर मुलांपैकी अंदाजे आठ मुले जन्मजात हृदयरोगाच्या कोणत्या ना कोणत्या स्वरूपाने जन्मजात हृदयरोगाने ग्रस्त आहेत. गेल्या तीन वर्षांत कर्नाटकातील अंदाजे ४१ हजार शाळकरी मुले जन्मजात हृदयरोगाने ग्रस्त आढळली आहेत. अर्थातच या आजाराची प्रकरणे संपूर्ण भारतात आहेत.

आरोग्यदायी
डॉ. मेघा पठारे

'इंडियन अकादमी ऑफ पेडियाट्रिक्स'च्या मते, भारतात दरवर्षी दोन लाखांहून अधिक मुले हृदयरोगासह जन्माला येतात. त्यातील पाचपैकी एका मुलामध्ये गंभीर लक्षणे आढळतात. उत्तर भारतीय राज्यांमध्ये याची सर्वाधिक प्रकरणे नोंदवली जातात. खरे पाहता गेल्या दहा वर्षांत देशातील विविध राज्यांमध्ये अनेक हृदयरोग केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. तथापि, बहुतेक खासगी आहेत. तिथे प्रत्येकजण उपचार घेऊ शकत नाहीत.

**मुले हृदयरोगाचे बळी का होतात?**

जन्मजात हृदयरोगात हृदयाच्या विविध आजारांचा समावेश होतो.



यामध्ये हृदयातील छिद्रे, झडपांमध्ये अडथळा आणि हृदयाच्या शिरा चुकीच्या दिशेने वळणे यासारख्या समस्यांची गुंतागुंत वाढते. गर्भधारणेदरम्यान काही समस्याही या आजाराला कारणीभूत ठरू शकतात. उदाहरणार्थ, एखाद्या महिलेला गर्भधारणेदरम्यान नियंत्रणाबाहेर मधुमेह असेल तर ही स्थिती विकसित होण्याचा धोका असतो. त्याचप्रमाणे गर्भधारणेदरम्यान अनियंत्रित थायरॉईड रोग किंवा जास्त प्रमाणात औषधांचा वापरदेखील हा धोका वाढवतो.

## फ्लूकडे दुर्लक्ष नको

फ्लू हा सर्वसाधारण विकार आहे. तो हंगामी विषाणूंमुळे होतो. यात सौम्य ते तीव्र स्वरूपाची लक्षणं दिसून येतात. काही रूग्ण आठवडाभरात बरे होतात तर काही रूग्णांमध्ये बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते. ६५ वर्षांपुढच्या रूग्णांमध्ये गुंतागुंतीची शक्यता बरीच जास्त असते. ज्येष्ठ नागरिकांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झालेली असते. कमकुवत प्रतिकारशक्तीमुळे शरीर विषाणूंना प्रतिकार करू शकत नाही. फ्लूचा संसर्ग वाढला तर त्याचं रूपांतर निमोनियात होऊ शकतं. निमोनिया झालेल्या रूग्णाला रूग्णालयात दाखल करावं लागतं. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी.

आरोग्य चर्चा

फ्लू आणि सर्वसामान्य सर्दी यात फरक असतो. आजारी पडल्यानंतर फ्लू आणि सर्दी यातला फरक जाणून घेणं गरजेचं आहे. फ्लू आणि सर्दी यांची लक्षणं सारखीच असली तरी सर्दीची लक्षणं बरीच सौम्य असतात तर फ्लूची बरीच लक्षणं साध्या सर्दीत दिसून येत नाहीत.

**फ्लू आणि सर्दीची लक्षणं**

नाक गळणं, छातीत कफ साठणं, घसा दुखणं, खोकला




ही सर्दी आणि फ्लूची सर्वसाधारण लक्षणं आहेत. फ्लू असेल तर अतिरिक्त लक्षणं दिसून येतात. त्यात ताप, अंगदुखी, थंडी, थकवा, अशक्तपणा, अस्वस्थता जाणवणं, तीव्र डोकेदुखी यांचा समावेश आहे.

६५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या लोकांना ही लक्षणं जाणवली तर पुढची गुंतागुंत टाळण्यासाठी त्यांनी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. फ्लूची लक्षणं दिसल्यानंतर ४८ तासांत आराम दिसला नाही तर डॉक्टर तुम्हाला विषाणूविरोधी औषधं घेण्याचा सल्ला देतात. वेळेत औषधं घेतली तर फ्लूची तीव्रता कमी होऊ शकते.

तरूण तसंच सशक्त असणाऱ्या लोकांमध्ये फ्लूमुळे फारशी गुंतागुंत निर्माण होत नाही. कारण त्यांची रोगप्रतिकारक शक्ती चांगली असते. पण ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये फ्लूमुळे बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते.

## तिशीनंतर गर्भधारणा गुंतागुंतीची

करिअर, जीवनशैली आणि वैयक्तिक प्राधान्यांमुळे अनेक महिला लग्न आणि गर्भधारणेचे नियोजन करण्यास उशीर करतात. तथापि, वयाची ३० वर्षे ओलांडल्यानंतर अनेकींना गर्भधारणेशी संबंधित बऱ्याच आव्हानांना सामोरे जावे लागते. वयानुसार स्त्रीच्या शरीरातील पुनरुत्पादक आरोग्यावर, हार्मोनलमध्ये बदल होतात.



म्हणूनच महिलांनी वेळेवर आणि अचूक माहिती मिळवणे तसेच गर्भधारणेचे नियोजन करण्यापूर्वी आरोग्याकडे विशेष लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

तिशीनंतर स्त्रीच्या मासिक पाळी चक्रामध्ये बदल होऊ लागतो. यामुळे ओव्हुलेशनची (अंडीची निर्मिती आणि प्रकाशन) वारंवारिता कमी होते. ओव्हुलेशन नियमित नसते तेव्हा गर्भधारणेमध्ये अडचणी येऊ शकतात. शिवाय या वयात एएमएच (अँटी-मुलेरियन हार्मोन) ची पातळी देखील कमी होऊ लागते. हा हार्मोन अंडाशयातील अंड्यांची संख्या आणि गुणवत्ता प्रतिबिंबित करतो. 'एएमएच' पातळी कमी झाल्यामुळे प्रजनन क्षमता कमी होते आणि गर्भधारणा लांबू शकते.

विचारा प्रश्न
डॉ. दीप्ती नेने

**हार्मोनल बदल आणि अनियमित मासिक पाळी**

वयाच्या तिशीनंतर महिलांमध्ये संप्रेरकांमधील असंतुलन ही एक सामान्य समस्या बनते. यामुळे मासिक पाळी लवकर किंवा उशिरा येऊ शकते. अनियमित मासिक पाळीमुळे गर्भधारणेचे नियोजन करणे कठीण होऊ शकते खेरीज संप्रेरकांमधील असंतुलन कधीकधी 'पीसीओएस' (पॉलिसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम) सारख्या समस्याही निर्माण करू शकते. त्यामुळे गर्भधारणा अधिक कठीण होऊ शकते.

**आव्हाने कोणती?**

वयानुसार अंड्यांची गुणवत्ता कमी होऊ लागते. संशोधन सूचित करते की ३० वर्षांनंतर गर्भपाताचा धोका वाढतो. या वयात मधुमेह, रक्तदाब आणि थायरॉईड यासारख्या समस्यादेखील गर्भधारणा गुंतागुंतीची करू शकतात. म्हणूनच गर्भधारणा नैसर्गिकरित्या होत नसेल तर कृत्रिम पुनरुत्पादन तंत्रांची आवश्यकता भासते.

**मुल जन्माला घालण्याचे योग्य वय?**

२५ ते ३० हे स्त्रीसाठी गर्भधारणेचे सर्वात योग्य मानले जाते. या काळात तिचे शरीर निरोगी असते. अंड्यांची गुणवत्ता चांगली असते आणि संप्रेरकेदेखील इष्टतम असते.

ग्रामपंचायत कार्यालय, सानगडी
जिल्ह्यातील सर्व जनतेला
दिवाळी, भाऊबीज व मंडई निमीत्य
हार्दिक शुभेच्छा !
सौ. सविता मुनीश्वर उप्रीकर - सरपंच, ग्रा.प. सानगडी
श्री. भुमेश्वर पु. ब्राम्हणकर - उपसरपंच, ग्रा.प. सानगडी
श्री. एस.के. गजबे - ग्रामपंचायत अधिकारी,ग्रा.पं. सानगडी
संकलन- मनोहर लोथे, सानगडी

जिल्ह्यातील सर्व दुध उत्पादक ग्राहकांना
दिवाळी व भाऊबीज निमीत्य
हार्दिक शुभेच्छा
जनसेवा
दुग्ध डेअरी व प्रोडक्ट्स
सानगडी
प्रो. सुखदेव मेंढे
संचालक तथा उपसरपंच ग्रा.पं. सिलेझरी
शुभेच्छुक- शुभम मेंढे, अंकुश मेंढे, पियुश ब्राम्हणकर,मारोती गोपे,
संकलन- मनोहर लोथे, सानगडी

जिल्ह्यातील सर्व जनतेला
दिवाळी, भाऊबीज व मंडई निमीत्य
हार्दिक शुभेच्छा
श्री. चुन्नीलालजी वासनिक
सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योगपती
विहिरगांव (बु.) त. साकोली
संकलन- मनोहर लोथे, सानगडी

दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा...
Akola PRESS News
संतोष चंद्रपभा रामचंद्र माने
Mob. : +91 9822322474, : +91 9156264242
E-mail : anusarmane@gmail.com
Balaji Services Bus Stand,
Murtizapur, Dist. Akola

दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
आपल्या सर्व मुर्तिजापूर शहरातील नागरिकांना
प्रेम, ऐक्य आणि आनंदाने उजळलेली
सुख-समृद्धीची दीपावली
होवो हीच प्रभुरामचंद्रांकडे प्रार्थना
भारत अनिलकुमार जेठवाणी
माजी उपनगराध्यक्ष, नगरपरिषद मुर्तिजापूर

# महामार्गावर उभ्या चौघांना अज्ञात वाहनाने चिरडले....

## तीन जणांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी

**अकोला, दि. २२ :** मोटार बिघडल्याने महामार्गावर उभे असलेल्या चार जणांना अज्ञात भरधाव वाहनाने चिरडल्याची धक्कादायक घटना अकोला जिल्ह्यात घडली आहे. या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे ऐन दिवाळीच्या दिवशी परिसरात शोककळा पसरली आहे.

जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर काटेपूर्णा ते पैलपाडा गावादरम्यान एका अज्ञात वाहनाने मोटारीच्या बाजूला उभ्या असलेल्या चार जणांना चिरडले. या अपघातात पती-पत्नीसह तीन जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला असून असून, एक जण गंभीर जखमी आहे.

बोरगाव मंजू येथील धीरज शिरसाट आणि अश्विनी शिरसाट हे दाम्पत्य खेर्डी येथील आपला व्यवसाय आटोपून एका प्रवासी मोटारीने बोरगाव मंजू गावाकडे घरी निघाले होते. मात्र, रस्त्यात त्यांची मोटार बिघडल्यामुळे एका मालवाहू वाहनाद्वारे वाहन नेण्यात येत होते.

यावेळी हे चौघेही मोटारीच्या खाली उतरलेले होते. अमरावतीकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने खाली उतरलेल्या या चारही जणांना जबरदस्त धडक दिली. या भीषण अपघातात दोन पुरुष आणि एका महिलेचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

मृतांमध्ये धीरज शिरसाट, अश्विनी शिरसाट आणि आरिफ खान (चालक) यांचा समावेश आहे. हे तिघेही बोरगाव मंजू येथील रहिवासी होते. एक जण गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने अकोला जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले.

अपघात करून पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा पोलीस शोध घेत आहेत. घटनास्थळावर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली. या भीषण अपघातामुळे वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. सुमारे दोन तासांपर्यंत वाहतूक एकाच बाजूने वळविण्यात आली होती. पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली. रात्रीच्या सुमारास बचाव पथकाने तत्काळ घटनास्थळ गाठून मदत कार्य राबवले.

हिट अ‍ॅन्ड रनच्या या थरारक घटनेमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. भीषण अपघातात तीन जणांना आपले प्राण गमवावे लागले. आता अपघात करणाऱ्या त्या अज्ञात वाहनांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे निर्माण झाले आहे.

# खरीखरी...
## तरच होईल..

पान १ वरून

आताही काही 'ओएसिस' आहेत. पण अभिजात दर्जा मिळालेल्या मराठीला मुंबईची हृदयवाहिनी भाषा म्हणून अस्तित्व टिकवायचं असेल आणि मराठीचा झेंडा उंच फडकवायचा असेल. तर प्रत्येक मराठी भाषाभिमानी व्यक्तीने केवळ मराठी माणसांबरोबरच नाही. तर इतरां बरोबरही मराठीत बोलण्याचे व्रत आचरावे लागेल. वाटल्यास समोरच्यांना त्यानंतर शक्य नसेल तर त्याच्या भाषेमध्ये खुलासा करावा. एखाद्याला समजतच नसेल तर मराठी भाषा शिक असे सांगणे काही गैर नाही. अशा प्रकारच्या प्रयत्नानंतरच आपली मुंबई मराठी होईल. चला तर मग सर्वांनी प्रयत्न करूया आणि या दीपपर्व दिनाच्या निमित्ताने मराठी माणसाने एवढाही विचार अंमलात आणला, तरी आपल्या ओशाळलेल्या मराठी भाषेचा वेलू गगनावर जाईल, यामध्ये काहीच शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

स्नेहाचा सुगंध दरवळला, आनंदाचा सण आला,
विनंती आमची परमेश्वराला सौख्य, समृध्दी लाभो तुम्हाला.
पंचायत समिती कार्यालय, चिखलदरा तर्फे
तालुक्यातील सर्व नागरिकांना
दिवाळी व भाऊबीज निमित्त
सर्वांना हार्दिक शुभेच्छा ...
शुभेच्छुक : गटविकास अधिकारी
व सर्व कर्मचारी वृंद, पंचायत समिती चिखलदरा

सत्यशोधक बहुउद्देशिय शिक्षण संस्था
कुरळपुर्णा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती
आमचे प्रेरणास्थान
श्री बच्चूभाऊ कडू
दिवाळी व भाऊबीज निमित्त
सर्वांना हार्दिक शुभेच्छा ...
आमचे प्रमुख उपक्रम
* अपंग कल्याण * भूमिपुत्र फाऊंडेशन * आशादिप अनाथालय
* संत सृष्टी व तिरंगा सृष्टी * * निवासी मूकबधिर विद्यालय *
* शहदी पांडुरंग यशवंत दिंडेकर निवासी मूकबधिर माध्यमिक विद्यालय *
* श्रीमती इंदिराबाई बाबारावजी कडू निवासी मूकबधिर कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय *
* श्रीमती इंदिराबाई बाबारावजी कडू बालक मंदिर * पयुष्णी गुरुकुलम प्राथमिक मराठी शाळा *
* आशिर्वाद वृध्दाश्रम * सैनिक प्रशिक्षण केंद्र *
* इंदिरा उद्योग समूह व गारमेंट प्रकल्प * गावामध्ये मोबाईल मेडिकल दवाखाना, फिरते दवाखाना *
सौ. नयनताई कडू (अध्यक्ष)
श्री संतोषराव किटुकले (उपाध्यक्ष)
श्री राहुल म्हाला (सचिव)
श्री चंद्रशेखरजी मोहोड (प्रशासकिय अधिकारी)

स्मार्ट प्रकल्पातंर्गत २०२३-२४ चा राज्यातून पाचवा आणि विभागातून दुसरा क्रमांक प्राप्त
कृषि उत्पन्न बाजार समिती तसेच महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न बाजार समिती कडून
वसंतदादा पाटील पुरस्कार प्राप्त
कृषी उत्पन्न बाजार समिती, चांदूर बाजार
सर्व तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर आणि नागरिकांना
दिवाळी व भाऊबीज निमित्त
सर्वांना हार्दिक शुभेच्छा ...
सतीशभाऊ मोहोड - सभापती
विनोदभाऊ राऊत - उपसभापती
संचालक मंडळ
राजेन्द्रभाऊ याउल, नंदकिशोर वासनकर, मंगेशभाऊ देशमुख, गजेंद्रभाऊ गायकी, रामदासभाऊ भोजने, संदिपभाऊ वरघे, माधवभाऊ घोंडे, अश्विनभाऊ घेटाळू
अनिलभाऊ खैरकार, मनोजभाऊ वाटाणे, प्रमोदभाऊ वाकोडे, अमोलभाऊ लंगोटे, मनोजभाऊ नांगलिया, लतीफ खान कादर खान, ललिताताई दि. पोहोकार, मिनाताई सं. देशमुख, मनिषभाऊ भावरे (सचिव)
शुभेच्छुक : अधिकारी, कर्मचारी वृंद, व्यापारी, अडते, हमाल

# महासागर वृत्तसागर

नागपूर

गुरूवार ■ दि. २३ एप्रिल २०२५


# आयुक्तांमुळे फेरीवाल्यांची दिवाळी अंधारात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :** नागपूर शहरातील सर्वसामान्य व गरिबांसाठी दिवाळी खरेदीचे हक्काचे ठिकाण असलेले फेरीवाले आणि हॉकर्स यांना नागपूर महापालिका व पोलिसांकडून जबरदस्तीने हाकलण्यात आल्याने, या वर्गाची दिवाळी अक्षरशः अंधारात गेली आहे. या कारवाईमुळे ना त्यांना उत्पन्न मिळाले, ना ग्राहकांना स्वस्त दरात खरेदी करता आली, असा आरोप कॉंग्रेसचे आमदार विकास ठाकरे यांनी आज एका पत्रकार परिषदेत केला.

दिवाळीचा सण जवळ आला की नागपूरच्या सीताबर्डी, जरीपटका परिसरात हजारो फेरीवाले व हॉकर्स आपली दुकानं उघडतात. हे लोक अल्पदरात कपडे, दिवाळीच्या वस्तू, लहान मुलांचे खेळणी, सजावटीची सामग्री विकतात. गरिबांसाठी हीच खरेदी परवडणारी असते. मात्र यंदा, नागपूर महापालिका आणि पोलीस विभागाने बिल्डर आणि मोठ्या व्यापाऱ्यांच्या सांगण्यावरून फेरीवाल्यांना उचलबांगडी केली. त्यामुळे सामान्य ग्राहक व विक्रेत्यांवर अन्याय झाला.

विकास ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, नागपूर महापालिकेने अद्यापही अधिकृत हॉकिंग झोन्स विकसित केलेले नाहीत. यामुळे फेरीवाल्यांना कुठेही व्यवसाय करण्यास जागा उपलब्ध नाही. विशेषतः पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातील सीताबर्डी आणि उत्तर नागपूर विधानसभा मतदार संघातील जरीपटका परिसरात फक्त फेरीवाल्यांवरच लक्ष केंद्रीत करून त्यांना हटवले जात आहे.

आमदार विकास ठाकरे यांचा गंभीर आरोप



एका बैठकीदरम्यान महापालिका आयुक्त म्हणाले की, ज्यांनी कोट्यवधी रुपये मोजून दुकानं घेतली आहेत त्यांचे नुकसान होईल, जर फेरीवाले रस्त्यावर व्यवसाय करत राहिले तर... ही मानसिकता स्पष्ट दाखवते की आयुक्त बिल्डर, मॉल मालक आणि मोठ्या व्यापाऱ्यांच्या संगनमताने काम करत आहेत, असा आरोप ठाकरे यांनी केला.

ठाकरे यांनी आणखी एक धक्कादायक आरोप करत सांगितले की, महापालिकेतील प्रशासक आणि त्यांचे सहकारी काही दलालांमार्फत बांधकाम परवानगी व फायर एनओसीसाठी खंडणी मागतात. याचे ऑडिओ पुरावे त्यांच्या जवळ असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

ठाकरे यांनी सांगितले की, शासनाच्या नियमांनुसार १० लाख रुपयांपर्यंतचे काम महापालिका ऑफलाईन टेंडरद्वारे करू शकते. मात्र महापालिकेने एक परिपत्रक काढून ऑफलाईन टेंडर बंद केले. त्यानंतर त्याच आयुक्तांनी स्वतःच परिपत्रकाचे उल्लंघन करत ८.५ ते १० लाख रुपयांचे पाच ऑफलाईन टेंडर जारी केले. हे टेंडर स्वातंत्र्य दिनासाठी होते, जे शेवटच्या क्षणी काढण्यात आल्याचे ते म्हणाले.

आमदारांच्या पत्रांना उत्तर देणे बंधनकारक असतानाही नागपूरचे आयुक्त नियम पाळत नाहीत. यासंदर्भात विकास ठाकरे यांनी हक्कभंग तक्रार विधानसभा अध्यक्षांकडे दिली आहे आणि त्या अनुषंगाने आयुक्तांना नोटीसही बजावण्यात आली आहे.

# दिवाळीला नागपुरात अग्नीतांडव!

## फटाक्यांमुळे सहा ठिकाणी आगी : रिलायन्स स्मार्ट स्टोर भस्मसात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२: :** नागपूर शहरामध्ये लक्ष्मीपुजनाच्या दिवशी फटाक्यांमुळे रात्रभरात वेगवेगळ्या ठिकाणी हा ठिकाणी आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत. यातील मोठी आग ही लक्ष्मीनगरमधील आठ रस्ता चौक येथील रिलायन्स स्मार्ट स्टोरलाला लागली. त्यात स्टोअर भस्मासात झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री ९ वाजताच्या सुमारास लागलेल्या या आगीत स्मार्ट स्टोरमधील संपूर्ण साहित्य जळून राख झाले. तीन तासाच्या अथक प्रयत्नांनंतर अग्निशाम दलाला आग विझवण्यात यश आले आहे. मात्र या आगीत लाखो रुपयाच्या मालमत्तेचे मोठं नुकसान झाले आहे. या व्यतिरक्त छोट्या छोट्या आगीच्या पाच घटना शहराच्या वेगवेगळ्या भागातून पुढे आल्या. ज्यात कच?याला आग लागणे, झाडाला आग लागणे अशा घटना घटनांची अग्निशमन दलाकडे नोंद झाली.

दिवाळीच्या सणात आठ रस्ता चौकाजवळील रिलायन्स स्मार्ट स्टोअरला मंगळवारी (२१ ऑक्टोबर) रात्री उशिरा अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, स्थानिक रहिवासी परिसरात फटाके फोडत असताना एक फटाका बंद स्टोअरच्या आत जाऊन पडल्यामुळे आग लागल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दिवाळी निमित्ताने हे स्टोअर संध्याकाळी लवकर बंद करण्यात आले होते.या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र लाखो रुपयांचे मालमत्ता आणि वस्तूंचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. आगीमुळे घनदाट धुराचे लोट स्टोअरमधून बाहेर येत होते आणि काही क्षणांतच संपूर्ण इमारतीने आगीचे रौद्ररूप धारण केले.

घटनेची माहिती मिळताच नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे अनेक बंब तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने अनेक तास प्रयत्न करून आग नियंत्रणात आणली. आग शेजारच्या इमारतीपर्यंत पसरू नये म्हणून विशेष दक्षता घेण्यात आली. सध्या या आगीचे नेमके कारण आणि एकूण नुकसान किती झाले याचा तपास पोलीस आणि अग्निशमन विभाग करत आहेत.



# सत्ताधारी आमदारांवर मेहेरनजर

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :** राज्याची आर्थिक स्थिती वाईट असल्याने अनेक योजनांचा निधी बंद करण्यात आला. तसेच आमदार निधी देखील नियमित देण्यात येत नाही. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्ताधारी आमदारांवर मेहेरनजर दाखवली आहे. ऐन सत्ताधारी आमदारांना कोट्यवधी रूपायांच्या निधीची खैरात वाटली आहे, असा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला.



राज्यात कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आलेला आहे. केंद्र सरकारने लावलेल्या निकषांमुळे तसेच शेतकऱ्यांचा कापूस विकत घेण्याची मंजूरी आलेली नाही, त्यामुळे कापसाला भाव मिळत नाही. हे सरकार सत्ताधारी आमदारांना पाच कोटी रूपयांचा निधी देतात मग कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी सरकारकडे पैसे नाही का? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवार यांनी महायुती सरकारचा समाचार घेतला.. महायुती सरकार मधील पहिल्यांदा निवडून आलेल्या ५० आमदारांना सरकारने पाच कोटीचा आमदार निधी दिला. एकीकडे आदिवासी विभाग असो किंवा मागासवर्गीय विभाग यांचा निधी वळवला जात आहे,राज्यावर कर्जाचा बोजा वाढला आहे.

पैसे नाही सांगत सत्ताधारी आमदारांना मात्र निधीची खैरात वाटायची आणि विरोधी पक्षातील आमदारांवर अन्याय करायचे हे महायुती सरकारचे धोरण आहे. आमदार हा लोक प्रतिनिधी असल्याने हा फक्त त्यांच्यावर नाही तर जनतेवर अन्याय आहे.

राज्याचा सर्वांगीण विकास होणे हे या सरकारचे धोरण नाही अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीच्या वेळी मतांसाठी लाडकी बहिण योजना आणली. तेव्हा मतांसाठी सरसकट निधी देण्यात आला पण आता या योजनेतील घोटाळे समोर येत आहेत.

या योजनेत पुरुषांनी लाभ घेतल्याचे समोर आले. याआधी या योजनेत पारदर्शकता का नव्हती? या सरकारवर या योजनेमुळे भार पडत असल्यामुळे आता अटी शर्ती घातल्या जात असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका झाल्यावर ही योजना सरकार बंद करणार. आता सरकार मधील मंत्री कितीही सांगत असले तरी ही योजना बंद करणार असल्याचा इशारा वडेट्टीवार यांनी दिला.

महाविकास आघाडीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष सामील होणार का या प्रश्नावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले की लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडी होती तर विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी होती.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कुठे आघाडी होणार याबाबत स्थानिक पातळीवर विचारविनिमय होईल. नवीन पक्ष आघाडीत येण्याबाबत वरिष्ठ पातळीवर चर्चा होईल अस कॉंग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

# ढोलताशांच्या गजरात गडमंदिरात लक्ष्मीपूजन




■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. २२ :** दिवाळी निमित्त रामटेक येथील श्रीराम गडमंदिरावर दरवर्षीप्रमाणे यंदाही लक्ष्मी पूजनानिमित्त भाविकांचा प्रचंड उत्साह उसळला. पहाटे ४ वाजेपासून दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. अंदाजे १२ हजार भाविकांनी भगवान श्रीरामचंद्राचे दर्शन घेतले.

या वेळी भक्त परिवारतर्फे व मित्रमंडळी यांनी १०० किलो मिठाईचे वाटप केले, तर भारतीय जनता पार्टी तर्फे आलू-पोह्याचे वाटप करण्यात आले. सकाळी ६ वाजता रामराज्य ढोल-ताशा पथक व ध्वज पथकाने रामनामाचा गजर केला. पथकातील ७५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता.

पथकाचे संचालन मोनू रघुवंशी यांनी केले. या सोहळ्यास राज्यमंत्री आशीष जयस्वाल, माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी उपस्थित होते. भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे पार्किंगची व्यवस्था अपुरी पडली. दोन व चारचाकी वाहने गडमंदिरापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर उभी करावी लागली. दिवाळी उत्सवामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.























जाहिरात संकलन : सुरज सांभारे

## दिवाळीनिमित्त एक घास अन्नाचा

# नरखेड मध्ये फराळ व मिठाईच्या पॅकेटचे वितरण

**महासागर प्रतिनिधी,**
**बुलडाणा, दि. २२ :**

सर्वत्र दिवाळी साजरी होत असताना समाजातील निराधार व गरीब कुटुंब मात्र या आनंदापासून दूर असतात.

तसेच आर्थिक परिस्थितीमुळे पारखे झालेल्या गोरगरीब कुटुंबाच्या आनंदाकरिता वस्तीवर जाऊन गरीब कुटुंबे व त्यांच्या मुला-बाळांना दिवाळीच्या फराळाचे व मिठाईचे पॅकेट वाटप करून त्यांची दिवाळी गोड व आनंदी साजरी करण्याचा एक आदर्श उपक्रम नरखेड शहरातील श्री स्वामी समर्थ महाराज बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने राबविण्यात आला. या उपक्रमांद्वारे सामाजिक बांधिलकीची भावना जपली गेली आणि समाजातील वंचित घटकांनाही दिवाळीच्या आनंदात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सारंग धोटकर,स्वप्निल बारई, वैभव वैद्य,निलेश भोयर,विलास डुकरे, स्मिता डुकरे व नमिता नारनवरे उपस्थित होते.



## सीबीएसई शाळांना सुट्टया १ तारखेपर्यंत

**नागपूर:** शिक्षण अधिकाऱ्यांनी (माध्यमिक) १६ सप्टेंबरच्या परिपत्रकाचे पालन सर्व सीबीएसई शाळांसाठी बंधनकारक आहे. असे असूनही, जिल्ह्यातील अनेक सीबीएसई शाळांनी या निर्देशाचे उल्लंघन करून दिवाळीच्या सुट्टया कमी केल्या आहेत. त्यांनी १८ ऑक्टोबर ते २८ तारखेपर्यंत दिवाळीच्या सुट्टया जाहीर केल्या आहेत. शिवाय, धनत्रयोदशीच्या दिवशी शाळा खुल्या राहतील. या संदर्भात, शिक्षण अधिकाऱ्यांनी गुरुवारी एक परिपत्रक जारी करून सीबीएसई शाळांना १८ ते १ नोव्हेंबरपर्यंत दिवाळीच्या सुट्टया वाढवून ३ नोव्हेंबर रोजी नियमित शाळा सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

खरं तर, सीबीएसई शाळांनी दिवाळीच्या सुट्टया २८ ऑक्टोबरपर्यंत वाढवल्या आहेत. अलिकडेच, शिक्षण अधिकाऱ्यांनी सर्व बोर्ड शाळांना सुट्टीच्या कालावधीत एकसमानता सुनिश्चित करण्याच्या सूचना जारी केल्या होत्या. तरीही, सीबीएसई शाळांनी पुन्हा आदेशाकडे दुर्लक्ष केले. सिसवा संघटनेने या प्रकरणाकडे शिक्षण अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते.

# महासम्राट बळीराजा रथयात्रा २०२५ चे रामटेकमध्ये स्वागत

### प्रबोधनकार महिला महाविद्यालयाच्यावतीने उत्साही स्वागत सोहळा संपन्न



**महासागर प्रतिनिधी**
**रामटेक, दि. २२ :**

प्रबोधनकार महिला महाविद्यालय, रामटेकचे संस्थापक डॉ. अभीविलास नखाते सर यांच्या प्रेरणेतून आयोजित महासम्राट बळीराजा रथयात्रा २०२५ चे आगमन गुरुकुंज मोझरी ते रामटेक नगरात दि.२० ऑक्टोंबर ला दुपारी २:१५ वाजता उत्साहात झाले.

या आगमनानिमित्त महाविद्यालयाच्या वतीने भव्य स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी रामटेक नगरपरीषद चे माजी उपाध्यक्ष रमेश कारेमोरे, महाविद्यालयाच्या प्राचार्या संगीता टक्कामोरे, राष्ट्रवादी कांग्रेस चे तालुका अध्यक्ष मनिष खोब्रागडे, संदीप उरकुडे, प्रा. रवि बावनकुळे, प्रा. विकास डांगरे, प्रा. छाया वांढरे, प्रा. सुहाना खान, प्रा. हर्षु हटवार, प्रा. माधुरी महाजन, प्रा. अश्विनी धमगाये,प्रा. रसना बिसेन, प्रा. जेबा खान, प्रा. महेश मोहनकर, प्रा. रामकुमार बावनकुळे, जोगेंद्र सूर्यवंशी, सचिन डोनारकर, युवराज वाडीभस्मे, अर्चना कळंबे, प्राची बोंडणे, जयश्री बागडे व भारती बागडे आदी मान्यवर उपस्थित होते.थयात्रेच्या आगमनावेळी नागरिकांनी इडा पिडा टळू दे, बळीचं राज्य येऊ दे!‌ या पारंपरिक घोषणांनी परिसर दुमदुमविला.

जय बळीराजा – जय शिवराय ‌ घोषणांनी वातावरणात एकतेचा आणि सांस्कृतिक अभिमानाचा उत्साह फुलविला.

या यात्रेद्वारे दिवाळीला बळीराजाची पूजा करावी, त्यांच्या पराक्रमाचे आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचे स्मरण करावे असा जनजागृतीचा संदेश देण्यात आला. दिवाळी सणाला नव्या दृष्टीकोनातून साजरा करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला.

महासम्राट बळीराजा रथयात्रा ही सामाजिक सलोखा, सांस्कृतिक वारसा आणि ऐतिहासिक परंपरेचे प्रतीक ठरत असून, एकता, जनजागृती आणि समाजप्रबोधनाचा संदेश देत विविध ठिकाणी यशस्वीपणे मार्गक्रमण करीत आहे.

# सर्वाधिक कचरा जमा होणाऱ्या ठिकाणांचे होणार सौंदर्यीकरण

### स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांचे निर्देश

**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२ :**

सर्वात जास्त कचरा जमा होणाऱ्या शहरातील ५० ठिकाणांचे नागपूर महानगरपालिकेतर्फे सौंदर्यीकरणाचे अभियान राबविण्यात येणार आहे. येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत ही कचरा ठिकाणे कायमची बंद करण्याचे लक्ष्य आहे. या ठिकाणी कचरा जमा होणे बंद झाल्यानंतर शहराच्या सौंदर्यीकरणात भर पडण्यास मदत होणार आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत शहरातील १० झोनमधील सर्वात जास्त कचरा जमा होणारे ५० ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. प्रत्येक झोनमधील पाच सर्वाधिक कचरा जमा होणारे पॉईंट निश्चित करण्यात आले आहे. या ठिकाणांना कायमस्वरुपी बंद करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाला दिले आहेत. या ठिकाणी सर्वाधिक कचरा का जमा होत आहे, याचे मूळ कारण शोधून या ठिकाणी पुन्हा कचरा जमा होणार नाही, याची दक्षता स्वच्छता निरीक्षकांना घ्यावयाची आहे. यानंतर या ठिकाणांचे सौंदर्यीकरणाची जबाबदारी संबंधित स्वच्छता निरीक्षकाला देण्यात आली आहे. हे अभियान महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत यशस्वीपणे राबविण्यासाठी आयईसी व एनडीएस पथकाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. शहरातील हे ५० सर्वाधिक कचरा जमा होणारे ठिकाणे कायमची बंद करून या ठिकाणांचे सौंदर्यीकरणाचे अभियान येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश श्रीमती वसुमना पंत यांनी दिले आहेत. या ठिकाणांच्या सौंदर्यीकरणानंतर या ठिकाणांवर पुन्हा कचरा जमा होणार नाही, यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी कर्मचाऱ्यांवर राहणार आहे तसेच या ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर उपद्रव शोध पथकामार्फत दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आयईसीच्या पथकाने संबंधित भागात जाऊन नागरिकांमध्ये स्वच्छते बद्दल जागरुकता निर्माण करणे व या ठिकाणी कचरा टाकण्यापासून नागरिकांना परावृत्त करण्यासाठी प्रयत्न करावे, असे या आदेशात म्हटले आहे.

# नागपूर विद्यापीठाच्या परीक्षासंबंधी निविदेबाबतची याचिका फेटाळली

### प्रोमार्क कंपनीचे आक्षेप न्यायालयाकडून अमान्य

**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२ :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षासंबंधी सेवांच्या निविदेविरोधात दाखल केलेली प्रोमार्क सॉफ्टवेअर कंपनीची याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने फेटाळून लावली आहे. न्या. अनिल किलोर आणि न्या. रजनीश व्यास यांच्या खंडपीठाने निविदा प्रक्रियेत हस्तक्षेपाबाबत मर्यादित अधिकार असल्याचा दाखला देत ही याचिका फेटाळली. हा टेंडर ७ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर करण्यात आला होता. यात पूर्व व पश्चात परीक्षा प्रक्रिया, पुनर्मूल्यांकन, ऑन-स्क्रीन मूल्यांकन, पीएचडी सेल ऑटोमेशन तसेच विद्यार्थ्यांसाठी सुविधा सेवा यांसह सर्वसमावेशक परीक्षा प्रक्रियेसाठी निविदा मागवण्यात आल्या होत्या. याचिकाकर्त्यांच्यावतीने अँड. अक्षय नाईक यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, नव्या निविदेत आर्थिक पात्रतेसाठी मनमानी अटी ठेवण्यात आल्या आहे. विद्यापीठाच्यावतीने अँड. एम.जी. भांडगे यांनी प्रतिवाद करताना सांगितले की, नव्या निविदेचे कार्यक्षेत्र पूर्वीच्या तुलनेत खूप व्यापक असून, आता पायाभूत सुविधांची जबाबदारी विद्यापीठाकडून थेट कंत्राटदारावर टाकण्यात आली आहे. निविदेतील अटींमध्ये न्यायालयाला हस्तक्षेप करण्याचा अधिकार मर्यादित आहे, असे मत व्यक्त करत न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ५७ वा स्मृति दिनोत्सव साजरा

**महासागर प्रतिनिधी**
**रामटेक, दि. २२ :**

दिनांक १९ ऑक्टोंबर २०२५ ला सकाळी ७ वाजता तीर्थ स्थापना करण्यात आली, त्यानंतर सामूहिक ध्यान ,ग्रामगीता वाचन ,सामूदाईक प्रार्थना ,भजनी मेळावा आयोजित करण्यात आला. सद्गुरु भजन मंडळ शितलवाडी, गुरुदेव आई भजन मंडळ परसोडा ,आई वाराणसी भजन मंडळ शनिवारी वार्ड ,गुरुदेव सेवा भजन मंडळ भोंदेवाडा ,गुरुदेव सेवा मंडळ रामटेक यांनी भजन सेवा दिली कार्यक्रमाचे संचालन ग्रामगीताचार्य मोरेश्वर माकडे यांनी केले.

दि. २० ऑक्टोंबर २०२५ ला सकाळी सामुदायिक ध्यान, ग्रामगीता वाचन व रामटेक शहरात दिंड्यासह रामधुन काढण्यात आली. त्यात गुरुदेव सेवा मंडळाची भजन सादर करण्यात आली. ह .भ . प.पांडुरंग महाराज शेंडे यांचे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीवनावर काल्याचे किर्तन झाले. यावेळी रामटेक नगरपरिषदच्या मुख्याधिकारी पल्लवी राऊत यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाला शुभेच्छा दिल्या. सामाजिक कार्यकर्तेया ज्योती कोल्हेपारा यांनी कार्यक्रमाला विशेष उपस्थिती दर्शवून सहयोग दिला. कार्यक्रमाचे संचालन ग्रामगीताचार्य कांचनमाला माकडे यांनी केले. कार्यक्रमात विशेष उपस्थिती कैलास पुरी महाराज नागार्जुन टेकडी, केशव राऊत, रोकडे,महाले गुरुजी, प्राध्यापक गुजरकर, प्रफुल शेंद्रे, प्राचार्य मिलिंद चोपकर , प्रा.अनिल मिरासे,मनोहर वांढरे , सेवक वनवे, विजय ठेंगडी ,ग्रामगीताचार्य मोरेश्वर माकडे, मनोहर बावनकर, नंदनवार या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी मधुकर कुर्वे, मधुकर हेडाऊ,श्रीधर पुंड, राजू देशमुख, नंदू नेरकर, धनराज महाजन, करण कटूकाळे, सोहम महाजन, विकी पुंड, सोहम देशमुख, प्रसाद महाजन,एकनाथ उईके, सचिन भीलकर,नंदकिशोर पापडकर, वाघाडे, सतीश सुरसे, अनुज पुंड, महेश सुरसे, प्रकाश ठाकरे, मनोहर माकडे,,श्रीराम खोलकुटे,समर मोटघरे उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रवंदना नी झाला. महाप्रसादानंतर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीधर पुंड यांनी केले.



# शैक्षणिक ॲप ऑनलाइन कामामुळे शिक्षक हवालदिल

**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२ :**

राज्यातील शिक्षक सध्या सुमारे ४० विविध शासकीय 'ॲप', अनेक प्रकारची ऑनलाईन कामे, लिंक, अहवाल, प्रशिक्षण आणि सर्वेक्षणाच्या व्यस्ततेमुळे हवालदिल झाले आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष पसरला असून हे सर्व 'ॲप' एकत्रित करून शिक्षक मैत्रिपूर्ण संगणकीय प्रणाली निर्माण करावी, अशी मागणी प्राथमिक शिक्षक संघटनांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे व शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी यांच्याकडे केली आहे.

सध्या शिक्षक ४० प्रकारचे 'ॲप' वापरत आहे. त्यामुळे शिक्षकांचे मोबाईल खराब होत असून त्यांच्या वैयक्तिक जीवनावर विपरीत परीणाम होत आहे. शिक्षकांना वापराव्या लागणाऱ्या 'ॲप'मध्ये सरल, शालार्थ, यू-डायसप्लस, मध्यान्ह भोजन, प्रेरणा, प्रेरणा डीबीटी, महाडीबीटी, दीक्षा, रीड अलॉंग, निपुण प्लस, शारदा, उल्लास, समर्थ पोर्टल, कर्मयोगी, निपुण टीचर ॲप, हरितिमा, ईको क्लब, एम-आधार, उमंग, पी.एफ.एम.एस., महा स्कूल, प्रशस्त, स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण आदी सर्व 'ॲप्स'वर शिक्षकांकडून दररोज हजेरी, विद्यार्थ्यांचे अहवाल, सर्वेक्षण, प्रशिक्षण, आणि विविध शासकीय माहिती अनिवार्यपणे भरावी लागते.

तसेच विविध व्हॉट्स ॲप गटांवरून २४ तास आदेश व लिंक येतात. परिणामी, शिक्षकांचा अध्यापनासाठीचा वेळ अत्यल्प उरतो.

> सध्या शिक्षक ४० प्रकारचे 'ॲप' वापरत आहे. त्यामुळे शिक्षकांचे मोबाईल खराब होत असून त्यांच्या वैयक्तिक जीवनावर विपरीत परीणाम होत आहे.

# घोगलीत पारंपरिक 'दिवाळी पहाट' जल्लोषात

**महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. २२ :**

नागपूर तालुक्यातील घोगली येथील स्वामीधामनगरी मधील गणेश मंदिर प्रांगणात पारंपरिक 'दिवाळी पहाट' कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात पार पडला. घोगली परिसरातील शेकडो संगीतप्रेमींनी उपस्थित राहून या सांगीतिक मेजवानीचा मनसोक्त आनंद घेतला. कार्यक्रमाला माजी सरपंच नरेश भोयर, प्रकाश भोयर , माजी पं.स. सदस्य वैशालीताई भोयर उपस्थित होते.

मान्यवरांनी स्वरनिनाद परिवाराच्या उपक्रमाचे कौतुक करत, अशा कार्यक्रमांमुळे परिसरात सांस्कृतिक जागर निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमात प्रसिद्ध गायक निरंजन बोबडे (सारेगामापा फेम) यांनी आपल्या मधुर गायनाने रसिकांची मने जिंकली, तर आर्य राजूरकर यांच्या सुमधुर सादरीकरणाने कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

संगीतप्रेमी देविका लाटकर यांनीही आपल्या सुरेल आवाजाने उपस्थितांची वाहवा मिळवली.

कार्यक्रमाचे निवेदन धनश्री यांनी ओघवत्या शैलीत सादर करून कार्यक्रमाला आकर्षक स्वरूप दिले. या वर्षीचा 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाचा हा पंधरावा वर्ष ठरला. या उपक्रमाची संकल्पना व नियोजन राजेंद्र राजूरकर यांनी पंधरा वर्षांपूर्वी सुरू केले असून, आज तो घोगली परिसरातील संगीताची एक समृद्ध परंपरा आणि अभिमान बनला आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विनोद वेखंडे, प्रकाश फाटक, सुरेंद्र काकिर्डे, मधुकर सुरवाडे, महेंद्र भारसिंगे विनोद कनोजिया यांनी सहकार्य केले.




# हिंदी कवी आणि शायराचा कवी संमेलन २४ रोजी

**नागपूर:** निवडक हिंदीतील कवी आणि शायर यांचे कवी संमेलन २४ ऑक्टोबर रोजी, दुपारी दोन वाजता नटराज सभागृह, हिंदी मोर भवन, बर्डी, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या संमेलनाची अध्यक्षता प्रसिद्ध हिंदी साहित्यिक डॉ. शिवनारायण आचार्य करीत आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सागर खादीवाला, माणिकरावजी खोब्रागडे, प्रा. जावेद पाशा, शब्बीर अहमद विद्रोही, प्रा. हेमलता मिश्र मानवी, उपस्थित राहणार आहेत. या हिंदी काव्य संमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध कवित्री आणिशायरा नेहा गुडघाटे, मुंबई हे करणार आहेत. विशेष अतिथी म्हणून तन्हा नागपुरी. डॉ. भोला सरवर, वहीद हैरा, कवी जमील अन्सारी, उपस्थित राहणार आहेत. आमंत्रित कवी अनिल मालोकर, अविनाश बागडे ,माधुरी राऊलकर, पूनम हिंदुस्तानी, रूबी दास 'अरु', प्रा. हृदय चक्रधर, माननीय गजभिये, रजनी संबोधी, रोशनी गणवीर, कवी शिर्के, कवी सूर्यकांत मुनघाटे, प्रभू फुलझेले, डॉ. पोफळे, संजय गोडघाटे, अजहर हुसेन, शमशाद शाद, जमील अन्सारी, आतिश अहमद, अख्तर आलम, माहीर नागपुरी, खुर्शीद हैदर, शहीद हजरत, लोकमान अन्सारी, अकबर खैराबादी, रहेबर नागपुरी, जकवान अन्सारी, हिफजुरहमान खान नागपुरी, आजार हुसेन, शमशाद शहाद हे मान्यवर आपली रचना सादर करणार आहेत. या संमेलनाचे आयोजन नागपुरातील मूल्य संगर साहित्य विचार मंच, हिंदी साहित्य विकास संस्था, भारतीय मुस्लिम परिषद, फुले शाहू आंबेडकर विचार मंच, छवि पब्लिकेशंस यांनी केलेले आहे.

# दवलामेटीतील १०० कुटुंबांना मिळणार न्याय

### जिल्हाधिकाऱ्यांना न्यायालयाचे आदेश : पट्टे मिळण्याचा मार्ग मोकळा

**महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. २२ :**

एक दोन नव्हे तर तब्बल ४० वर्षांपासून राहत असलेल्या दवलामेटी येथील सर्वे नं. ७९ मधील १०० कुटुंबांच्या अर्जाची दखल घेऊन त्यांना दहा आठवड्यांच्या आत निर्णय द्यावा, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला. या नागरिकांनी त्यांना त्याच जागेवर मालकी पट्टे द्यावे अशी मागणी केली होती. मात्र, जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांच्या अर्जावर कुठलीही सुनावणी न घेता अतिक्रमणधारी घोषीत केले होते. अखेर न्यायालयाने त्यांची बाजू मान्य करीत यावर निर्णयाचे निर्देश जिल्हा प्रशासनास दिले. याप्रकरणी याचिकाकर्त्या माजी जि.प. सदस्य ममता धोपटे व माजी पं.स. सदस्य सुलोचना ढोके यांच्या उपस्थितीत खासदार श्यामकुमार बर्वे, माजी मंत्री सुनील केदार यांनी ही माहिती पत्रपरिषदेत दिली. न्या. अनिल किल्लोर व न्या. रजनीश व्यास यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.या प्रकरणी याचिकाकर्त्यांचे वकील रबी आशीषकुमार घोष यांनी युक्तिवाद केला.

१९७० पासून य जमिनीवर कायदेशीररित्या राहत असलेल्या या कुटुंबाच्या जमिनी सरकारी नोंदीत चुकीच्या पध्दतीने 'झुडपी जंगल' म्हणून वर्गीकृत केल्या गेल्याचे पुरावे न्यायालयापुढे मांडले.

या चुकीच्या वर्गीकरणामुळे हा भाग पूर्ण विकसित वसाहत असूनही, रहिवाशांना त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित राहावे लागले. गृहनिर्माण कर्ज, सरकारी कल्याणकारी योजना आणि घरांचे कायदेशीर मालकी हक्क प्राप्त करणे अशक्य झाले होते. ही जमीन १९७० पूर्वीच्या नोंदीत खासगी मालकी वा कृषी वापर दर्शवितात. ज्यात जंगलाचा उल्लेख नाही. यानुसार सध्याचे चालू असलेले वर्गीकरण हे मनमानीपूर्ण रहिवाश्यांचे भारतीय असून, संविधानातील अनुच्छेद २१ अंतर्गत निवारा आणि जिविकेचे मूलभूत हक्क भंग करते.

## याकडे वेधले लक्ष

**राज्यात महायुती सरकारने अडविले**

**राज्यात महायुतीचे सरकार असताना सर्वप्रथम याप्रकरणी मालकी पट्टे देण्यापासून तेव्हाच्या ग्रामविकास विभागाने अडवणूक केली होती. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर तातडीने यासंदर्भातील सत्यता तपासून अडचणी दूर करण्याचे प्रयत्न झाले. तरीही, जिल्हाधिकारी कार्यालयाने यात खोडा टाकला. या नागरीकांना त्यांच्या निवासी भागाचे मालकी पट्टे मिळू नये, घरकूल मिळू नये, अशी भूमिका असल्याचा आरोप माजी मंत्री सुनील केदार यांनी केला.**

**प्रशासकीय पुराव्यानुसार या जमिनीवर वन विभागाचा अधिकार नाही. तहसीलदारांचा २०२१ च्या अहवालानुसार वसाहत नियमित करण्याची शिफारस केली आणि २०२२ च्या जिल्हा परिषदेच्या ठरावातही मालकी हक्क देण्यासाठी अनुमोदन देण्यात आले. एवढेच नव्हे तर या जमिनीवर राज्य सरकारने पुरविलेल्या सोयीनुसार वीज (१९९५ पासून), पाणीपुरवठा (२००२ पासून) तसेच रस्ते (२०१० पासून) आणि ग्रामपंचायत कर संकलन या सर्व गोष्टी जंगल जमीन नसल्याचे स्पष्ट करीत आहे.**

# नागपूरच्या डॉक्टरांचा तिरुपतीत एक लाख भाविकांसाठी आयुर्वेदिक आरोग्यसेवा

**महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. २२ :**

तिरुपती बालाजी येथे पार पडलेल्या श्रीवारी ब्रह्मोत्सव या भव्य धार्मिक उत्सवात देशभरातून आलेल्या सुमारे एक लाख भाविकांनी आयुर्वेदिक उपचारांचा लाभ घेतला. या सेवेमध्ये नागपूरचे प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. संतोष सुर्यकांत पुसदकर (विश्वकुंभ आयुर्वेदिय चिकित्सालय)आणि डॉ. भूषण संजय आंबटकर (आरोग्यवर्धिनी चिकित्सालय) यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. उत्सवाच्या काळात भाविकांची प्रचंड गर्दी असूनही, या दोन्ही डॉक्टरांनी त्यांच्या तज्ज्ञ टीमसह दिवस-रात्र परिश्रम घेऊन विविध आयुर्वेदिक उपचार आणि आरोग्य सल्ला दिला. शरीरशुद्धी, संधिवात, अपचन, थकवा, तसेच मानसिक शांतता मिळवण्यासाठी औषधोपचार करण्यात आले.

भाविकांनी या सेवेचे मोठे कौतुक केले असून, अशा धार्मिक आणि आरोग्यदायी उपक्रमांमुळे आयुर्वेदिक उपचार पद्धतीबद्दल जनजागृती होत असल्याचे दिसून आले. तिरुमला तिरुपती देवस्थान तर्फेही या सेवेबद्दल विशेष धन्यवाद व्यक्त करण्यात आले.

अशा प्रकारे अध्यात्म आणि आरोग्य यांचे सुंदर संगम घडवत नागपूरच्या डॉक्टरांनी तिरुपतीत आपला ठसा उमटवला.




## निधन वार्ता

### रामचंद्र ठेंगरे



**नागपूर :** सरस्वती नगर प्लॉट नंबर ६१ जानकी नगर येथील रहिवासी रामचंद्र सदाशिव ठेंगरे याचं, निधन झाले. मृत्युसमयी वय ८६ होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, तीन मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे. अंत्य संस्कार मानेवाडा घाटावर करण्यात आले.

### दत्तात्रय पुंडलिक



**नागपूर:** छत्रपती नगर निवासी, लोककर्म विभागाचे निवृत्त उप अभियंता दत्तात्रय भैयाजी पुंडलिक यांच वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. अंत्यसंस्कार सहकार नगर घाटावर करण्यात आले. त्यांच्या मागे मोठा आप्त परिवार आहे.

### भाऊराव लेदे



**रामटेक :** दिनांक २२/१०/२०२५ रोज बुधवार ला ठीक सकाळी १०-३५ वाजता भाऊराव मोतीराम लेदे सेवानिवृत्त राऊंड ऑफिसर (वनविभाग) शिवनगर परसोडा, रामटेक यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा अंतिम संस्कार विधी ठीक दुपारी ५ वाजता अंबाळा मोक्षधाम घाट येथे करण्यात आला.

# ‘खापरखेडा पर्यंत मेट्रो रेल्वे सुरू करा’

## मेट्रो प्रकल्प महाव्यवस्थापकडे आमदार डॉ. आशिष देशमुखांची आग्रही मागणी



**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२ :**
नागपूरच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या मेट्रो प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यात कोराडी पर्यंत मेट्रो मार्ग मंजूर करण्यात आला आहे त्यामूळे भविष्याचा दृष्टीकोन ठेऊन मेट्रोच्या मार्गाचा विस्तार खापरखेडा पर्यंत करावा अशी आग्रही मागणी मेट्रो प्रकल्पाचे महाव्यवस्थापक श्रवण हर्डीकर यांच्याकडे सावनेर कळमेश्वर विधानसभा मतदार संघाचे आमदार डॉ आशिष देशमुख यांनी केली आहे. तिसऱ्या टप्प्यात सीताबर्डी ते कोराडी ११.५ किमी पर्यंतच्या मेट्रो मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे त्यामूळे खापरखेडा शहराला मेट्रोच्या जाळ्याशी जोडणे किती महत्वाचे आहे हे पटवून देण्यासाठी आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी मेट्रो प्रकल्पाचे महाव्यवस्थापक श्रवण हर्डीकर यांची १७ ऑक्टोबर शुक्रवारला भेट घेतली. यावेळी आमदार डॉ देशमुख यांनी मेट्रो प्रकल्पाचे महाव्यवस्थापक श्रवण हर्डीकर यांच्या समोर आपली भूमिका स्पष्ट करताना खापरखेडा शहर फार कमी वेळात औद्योगिक शहर म्हणून नावारूपास आले आहे खापरखेडा परिसरात दोन मोठी औष्णिक वीज निर्मिती केंद्रे, कोळसा खाणी, अनेक लहान-मोठे उद्योगधंदे आहेत त्यामूळे खापरखेडा परिसराची लोकसंख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे शिवाय खापरखेडा शहर छिंदवाडा जबलपूर राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या मार्गावर असल्यामूळे सतत जड लहान मोठ्या वाहनांची वर्दळ असते त्यामूळे परिसरात अपघाताची मालिका सारखी वाढते आहे. या सर्व बाबी लक्षात घेता मेट्रोचा विस्तार खापरखेडा पर्यंत वाढविणे गरजेचे झाले आहे मेट्रोचा विस्तार केल्यास खापरखेडा सारख्या महत्त्वाच्या औद्योगिक शहराला थेट नागपूर शहराशी जोडने शक्य आहे शिवाय प्रवासाचा वेळ आणि खर्च वाचेल शिवाय पर्यावरणाची हानी कमी होऊन परिसराच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला गती मिळेल असे मत आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी व्यक्त केले.

यासंदर्भात मेट्रो प्रकल्पाचे महाव्यवस्थापक श्रवण हर्डीकर यांनी मेट्रो विस्ताराला सकारात्मकता दर्शवली असून खापरखेडा परिसराचे औद्योगिक महत्त्व आणि भविष्यातील प्रवासी संख्या विचारात घेऊन योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन आमदार डॉ. देशमुख यांना दिले आहे.

## एमआयडीसी परिसरातील हार्डवेअर दुकानाला आग

**हिंगणा :** एमआयडीसीतील कलमेघ नगर येथील राही ट्रेडर्स या हार्डवेअर च्या दुकानाला आज रात्री ८ वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. यात दुकानातील पेंट चे डब्बे, प्लास्टिक वस्तू आदी जळल्या. दोन तासात अग्निशमन दलाच्या जवानांनी ही आग आटोक्यात आणली. हिंगणा मार्गावर विनोद राऊत यांच्या मालकीचे राही ट्रेडर्स हे हार्डवेअर चे मोठे दुकान आहे. सायंकाळी ७ नंतर मालक व दुकानातील कामगार दुकान बंद करून घरी निघून गेले होते. रात्री ८ वाजताच्या सुमारास बाजूच्या दुकानदारांना या दुकानातून धूर निघताना दिसला. याची माहिती दुकान मालक विनोद राऊत यांना व एमआयडीसी अग्निशमन दलाला देण्यात आली. घटनास्थळी एमआयडीसी, डिगडोह नगर परिषद, निलडोह नगर पंचायत येथील ४ गाड्या आग विझविण्यासाठी घटनास्थळी दाखल झाल्या. दोन तासात ही आग आटोक्यात आली. तोपर्यंत दुकानातील पेंटचे डब्बे, हार्डवेअर साहित्य, प्लास्टिक च्या वस्तू आदी लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले. एमआयडीसी पोलीस देखील घटनास्थळी दाखल झाले होते.

## पोलीस स्मृतिदिनी शहिद धोपाडेंना अभिवादन



**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२ :**
पोलीस स्मृतिदिनानिमित्त शहीद पोलीस अधिकारी किरणकुमार धोपाडे यांना अभिवादन करण्यात आले.दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस शासनाद्वारे पोलीस स्मृती म्हणून साजरा करण्यात येतो.

३० मे २००५ ला नक्षलग्रस्त भाग सालेकसा येथे शहीद झालेले नागपूरचे पोलीस उपनिरीक्षक किरणकुमार धोपाडे यांना श्रद्धांजली देण्याचा छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन त्यांच्या निवासस्थानी करण्यात आले होते. कार्यक्रमाला मुख्य अतिथी गोंदियाचे सहायक पोलीस उपनिरीक्षक विलास गावंडे, माजी पोलीस उपनिरीक्षक किशोर धोपाडे, प्रसिद्ध मोटीवेटर संजय एम नखाते, पुलक मंच परिवाराचे राष्ट्रीय संघटन मंत्री मनोज बंड, हुकुमचंद चवरे, दीपकराव व्यवहारे, माजी पोलीस उपनिरीक्षक हिवरकर उपस्थित होते. शहीद पोलीस अधिकारी स्व. किरणकुमार धोपाडे यांच्या फोटोला गोंदियाचे सहायक पोलीस निरीक्षक विलास गावंडे यांनी पुष्पमाला अर्पित करून अभिवादन केले.

संजय एम नखाते, मनोज बंड, हुकुमचंद चवरे आदींनी पुष्पांजली अर्पित करून अभिवादन केले. अतिथींनी पोलीस उपनिरीक्षक स्व. किरणकुमार धोपाडे हे कर्तव्यनिष्ठ अधिकारी व पोलीस विभागाच्या आठवणींना उजाळा दिला. नक्षल प्रभावित भागात आपले कर्तव्य करीत असताना नक्षलवाद्यांनी टाकलेल्या सुरुंगात ते शहीद झाले होते. नागपूरचे कर्तव्यदक्ष युवा अधिकारी शहीद झाल्याने गोंदिया पोलीस दलाच्या वतीने श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी पोहरे व प्रास्ताविक व आभार प्रदर्शन नमिता उदेपूरकर यांनी केले.

शहीद किरणकुमार धोपाडे यांच्या पत्नी सविता धोपाडे यांचा पोलीस विभागातर्फे शाल, श्रीफळ देऊन विलास गावंडे यांनी सन्मान केले.

कार्यक्रमाला नीरज पळसापुरे, रमेश उदेपूरकर, मंदार बुटी, सौरभ गुलालकरी, धीरज बंड, रितेश जैन, निशित जगताप, अनिता धोपाडे, वंदना व्यवहारे, ज्योती भुसारी, कविता गुलालकरी, मनीषा नखाते व धोपाडे परिवाराचे नातेवाईक उपस्थित होते.

# माळी महासंघातर्फे परिचय मेळावा



**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२ :**
अखिल भारतीय माळी महासंघ, क्रांतिज्योती माळी विकास संस्था आणि नागपूर गीता मंदिर उपवर-वधू-पालकपरिचय मेळावा समितीच्या संयुक्त विद्यमाने गीता मंदिर येथे पहिला माळी समाजाचा परिचय मेळावा संपन्न झाला. अखिल भारतीय माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष शंकरराव लिंगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी गोविंद वैराळे होते. स्वागताध्यक्ष मधुसूदन देशमुख व संयोजक कैलास जामगडे होते. यावेळी शुभमंगलमब परिचय पुस्तिकेचेही प्रकाशन करण्यात आले. सुमारे १ हजार ५०० युवक-युवती आणि पालकांनी मेळाव्यात सहभाग नोंदविला.

रमेश हिरळकर, अमोल वैराळे, अशोक मानकर, अविनाश ठाकरे, रोहिणी पाटील यांच्यासह या मेळाव्यात महाराष्ट्र, मध्य प्रदेश व छत्तीसगडसह विविध राज्यांमधील माळी समाज बांधव उपस्थित होते. यशस्वितेसाठी शिवराम गुरनुले, अंबादास गाडेकर, संजय साखळे, डॉ. विवेक भुसारी, अनिल भेदे आदींनी परिश्रम घेतले.

# शासन ओबीसी विरोधी भूमिका घेत ओबीसींना फसवत आहे : उमेश कोर्राम

## लोकसंख्येचा प्रमाणात संस्थांना निधी द्या




**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२ :**
टार्टी, बार्टी सारथी, महाज्योती संस्थांमार्फत सर्वकष धोरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने करण्याच्या दुष्टिकोनातून ११ सप्टेंबर २०२५ रोजी बैठक घेण्यात आली.

**महाज्योती संस्थेसंबंधात ओबीसी विद्यार्थ्यांच्या समस्या**

लोकसंख्येचा विचार न करता इतर संस्थांप्रमाणेच महाज्योती संस्थेला सुद्धा फक्त ३०० कोटी मंजूर करण्यात आले.

मागील वर्षी २०२४-२५आर्थिक वर्षात २९७ करोड रुपयांचा निधी मंजूर असताना फक्त २०७ कोटी रुपये देण्यात आले. यात ९० करोड रुपये ची कपात करण्यात आली. २०२५-२६आर्थिक वर्षात सुद्धा मंत्रिमंडळाने ४५३ कोटी रुपये मंजूर केले होते. परंतु प्रत्यक्षात अर्थसंकल्पात फक्त ३०० कोटी रुपये देण्यात आले. म्हणजे १५३ कोटी रुपयांची कपात करण्यात आली. युपीएससी प्रशिक्षणासाठी विद्यार्थी संख्या २००० वरून १०० करण्यात आली तर एमपीएससी साठी ही संख्या ४००० वरून ४०० करण्यात आली आहे.

दोन्ही अभ्यासक्रमासाठी संख्या पूर्ववत करावी. पीएचडी फेलोशिप योजनेसाठी फक्त १०० जागा देण्यात आल्या आहेत.ओबीसींची लोकसंख्या बघता ही संख्या १००० करण्यात यावी.

बार्टी, टार्टी, सारथी संस्थेच्या पीएचडी फेलोशिप करिता २०२३ बॅचच्या विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून फेलोसिप दिली गेली परंतु फक्त महाज्योती संस्थेच्या विद्यार्थ्यांना फेलोसिप देण्यात आली नाही.

**मागील वर्षी २०२४-२५ आर्थिक वर्षात २९७ करोड रुपयांचा निधी मंजूर असताना फक्त २०७ कोटी रुपये देण्यात आले**

आपले हक्क अधिकार मिळिवण्यासाठी, शासनाच्या बैठकीचा खुलासा करण्यासाठी आता तालुका आणि जिल्हास्तरावर व मुंबई पुणे यासारख्या शहरात सुद्धा आंदोलने निदर्शने होतील. याविरुद्ध ओबीसी युवक विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने पेटून उठले पाहिजे.

अशी माहिती उमेश कोर्राम मुख्य संयोजक, ओबीसी युवा अधिकार मंच यांनी दिली. त्यावेळी पियुश आकरे आणि इतर सदस्य उपस्थित होते.

# हिंगणा नगर पंचायतचा शिवाजी चौकात दीपोत्सव

**महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा, दि. २२ :**
नगर पंचायत तर्फे छत्रपती शिवाजी चौकात दीपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिवाळी सणाचे स्वागत करताना परिसर सुशोभित व प्रकाशमान करण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये स्वच्छता, पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश देण्यासाठी मुख्याधिकारी श्री. धनंजय सरनाईक यांच्या संकल्पनेवरून हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत मातीच्या दिव्यांनी शिवाजी चौक परिसर उजळून निघाला, ज्यामुळे संपूर्ण परिसरात आनंद, उत्साह आणि दिवाळीचा मंगलमय प्रकाश पसरला होता. दीपोत्सव कार्यक्रमामुळे शहरात सौंदर्य, एकता आणि संस्कृतीचा संदेश देण्यात आला. या वेळी हिंगणा बनगर पंचायत च्या अध्यक्षा लता गौतम, उपाध्यक्षा प्राजक्ता गजबे, आरोग्य व स्वच्छता सभापती छाया भोस्कर, शिक्षण क्रिडा व सांस्कृतिक सभापती सुचिता चामाटे, महिला व बालकल्याण सभापती जया खाडे नगरसेविका बेबी गजबे , नगरसेवक विशाल चामाटे , विष्णू कोल्हे तसेच नगर पंचायत हिंगणा चे कर्मचारी जागृती लोहारे, प्रिती चकोले, दिपाली चतुर, पवन ढवळे, दौलत वानखेडे ,चैतन्य डाहे, संजय माहुरे, प्रकाश गंडे उपस्थित होते.नगराध्यक्षा लता गौतम यांनी उपस्थित नागरिकांना स्वच्छ, हरित आणि प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचे तसेच मातीचे दिवे वापरून स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन देण्याचे आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचे आवाहन केले.

# प्रेम, आपुलकी आणि दिवाळी

## नयन हेमने यांचा सामाजिक उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२ :**
दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि आपुलकीचा सण. या सणाचे खरे सौंदर्य केवळ रोषणाईत नव्हे, तर दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश पेरण्यात आहे. याच भावनेतून आधारस्तंभ सेवा फाऊंडेशन चे अध्यक्ष नयन हेमने यांच्या वतीने ‘अपना घर वृद्धाश्रम, पवनी‘ येथे दिवाळी निमित्ताने एक हृदयस्पर्शी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमात वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना किराणा साहित्य व फळांचे वाटप करण्यात आले. या छोट्याशा भेटीमुळे वृद्धांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आणि त्यांच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचे अश्रू ओघळले. ही दिवाळी त्यांच्यासाठी केवळ एक सण नव्हे, तर माणुसकीचा साक्षात अनुभव ठरली. या कार्यक्रमात अध्यक्ष नयन हेमने आधारस्तंभ सेवा फाऊंडेशन , मनीष बागडे,शत्रुघ्न वैद्य, व्यास देशमुख, शुभम वैद्य, साहिल हटवार,राज मेश्राम हे प्रामुख्याने उपस्थित होते. या सर्वांनी वृद्धांशी संवाद साधत त्यांच्याशी आत्मीयतेचे नाते निर्माण केले. दिवाळीच्या दिवशी केवळ भेटवस्तू नव्हे, तर प्रेम, आपुलकी आणि सन्मान यांचेही वाटप झाले.

नयन हेमने यांनी यावेळी सांगितले, ‘वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिक हे आपल्या समाजाचे अमूल्य रत्न आहेत. त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांना आधार देणे ही आपली जबाबदारी आहे.

दिवाळीच्या निमित्ताने त्यांच्यासोबत काही क्षण घालवता आले, हीच आमच्यासाठी खरी दिवाळी आहे.‘

या उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून, तरुण पिढीला सामाजिक बांधिलकीची जाणीव होण्यास मदत झाली आहे. नयन हेमने यांनी घेतलेला हा पुढाकार इतर पण प्रेरणादायी ठरेल.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा भव्य मोर्चा : दिवाळीपूर्वी ट्रॅफिक जामचा ‘फुल स्टॉप’ लावा

# तातडीने टोल फ्री क्रमांक आणि पोलीस तैनात करा



**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२ :**
नागपूर शहरातील वाहतूक कोंडीच्या गंभीर प्रश्नाकडे पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नागपूर शहर, यांच्या वतीने आज भव्य मोर्चा काढण्यात आला. शहर अध्यक्ष अनिल अहिरकर यांच्या नेतृत्वात आणि कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर यांच्या विशेष आयोजनात हा भव्य मोर्चा पोलीस उपायुक्त (वाहतूक) कार्यालयावर धडकला. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याची जोरदार मागणी केली. नागरिकांचा दिवाळीचा उत्साह ट्रॅफिक जाममध्ये अडकू नये, यासाठी पक्षाने प्रशासनाला वेळेत पाऊल उचलण्याचे आवाहन केले.

**मोर्च्यातील प्रमुख मागण्या आणि पक्षाची भूमिका:**

१. जादा वाहतूक पोलीस (दिवाळी विशेष 'फोर्स'): शहराच्या मुख्य बाजारपेठा आणि वर्दळीच्या चौकांमध्ये दिवाळीच्या गर्दीचा विचार करून अतिरिक्त वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांची एक विशेष 'फोर्स' त्वरित तैनात करावी.

२. टोल फ्री क्रमांक आणि जलद प्रतिसाद: वाहतुकीच्या कोणत्याही समस्येची तक्रार करण्यासाठी नागरिकांना २४७ टोल फ्री क्रमांक त्वरित उपलब्ध करून द्यावा. तसेच, तक्रार प्राप्त होताच, संबंधित यंत्रणा जलद गतीने घटनास्थळी पोहोचेल, अशी कार्यक्षम यंत्रणा विकसित करणे अत्यावश्यक आहे.

यावेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना शहर अध्यक्ष अनिल अहिरकर म्हणाले, ‘हा भव्य मोर्चा प्रशासनासाठी एक स्पष्ट संकेत आहे. नागरिकांचा मौल्यवान वेळ आणि सणाचा आनंद वाहतूक कोंडीत वाया जाता कामा नये. आम्ही 'फुल स्टॉप' मागण्यासाठी आलो आहोत आणि दिवाळीपूर्वी या मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करू.‘ अशी मत व्यक्त केले. कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर यांनी या भव्य आयोजना बद्दल समाधान व्यक्त करत सांगितले की, ‘शहराला आधुनिक आणि जलद वाहतूक व्यवस्थेची गरज आहे. टोल फ्री क्रमांक सुरू करणे आणि मनुष्यबळ वाढवणे हे प्राथमिक उपाय आहेत, जे प्रशासनाने त्वरित करावेत.‘ निवेदनाची गंभीर दखल घेऊन, पोलीस प्रशासनाने लवकरात लवकर आणि युद्धपातळीवर या मागण्या पूर्ण कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने केली आहे.

**निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात खालील प्रमुख पदाधिकारी सहभागी झाले होते:**

यावेळी आनंद सिंग, सुनीता येरणे, विशाल खांडेकर, जानबा मस्के, मुकेश रेवतकर, ब्रह्म मस्के, राजपाल सिंग चौहान, किरण नंदनवार, माधुरी पालीवार, अभिद्दत फाले, राकेश घोसीकर, विवेक वानखेडे, निलेश बोरकर,मॉंटी गंडेचा, कला नायक, राहुल कांबळे, मेहबूब पठाण, मुमताज बाजी, संतोष भुजाडे, , लक्ष्मीकांत पांडे, संजय जोशी, चंद्रकांत नाईक,नागेश डेडमुठे, दिलीप पलांदूरकर, गोविंद सूत्रावे, रवींद्र वाठ, पुष्पम धानोरकर, तुषार ढबाले, प्रशिक सातपुते , विजय गावंडे, निखिल चाफेकर, शहजा बाजी, अविनाश पार्डीकर, यशश्री बनसोड, सागर शिवहरे, अनिकेत प्रजापति, अतुल शेंडे, निसार अली,प्रेम कुमार बत्रा, स्वप्नील दहिवले, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोठणगावात अवैध मुरूम तस्करावर मोठी कारवाई

## मुद्देमाला सहित पकडण्यात वेलतूर पोलिसांना यश

## नेहमीच सुरू असते अवैध मुरूम उत्खनन

## ३८ लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**महासागर प्रतिनिधी**
**कुही, दि. २२ :**
जुन्या गोठणगावातून नवीन पुनर्वसित गोठणगाव येथे विनापरवाना अवैध मुरमाची वाहतूक करीत असताना तीन ट्रॅक्टर व एक जेसीबी असा एकूण अंदाजे ३८ लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत मोठी कारवाई करण्यात वेलतूर पोलिसांना यश आले. काल दिनांक २१ मंगळवार महालक्ष्मी पूजन च्या दिवशी शासकीय सुट्टीचा फायदा घेत, सकाळी नऊ वाजेपासून अवैध मुरूम उत्खनन होत असल्याची गोपनीय माहिती विश्वसनीय सूत्रांकडून पोलिसांना मिळाली. पोलिसांनी माहिती घेत सापळा रचून कारवाई केली. पचखेडी च्या पुढे पोलिसांचा ताफा गोठणगावकडे जात असताना दिसताच, मुरूम तस्करांच्या गुप्तहेरांनी माहिती पुरवली. तसेच ट्रॅक्टर व जेसीबी घटनास्थळावरून माघारी पडत सुटले. जलद कारवाई करत वेलतूर ठाणेदार प्रशांत मिसाळे यांच्या नेतृत्वात जुने गोठणगाव ते पुनर्वसित गोठणगाव च्या मधात तीनही ट्रॅक्टर मुद्देमालासहीत पकडण्यात आले. व त्यामागेच जेसीबी जप्त करण्यात आली.

पाच मिनिट जरी पोलिसांना उशीर झाले असते, तरी मुरूम तस्कर पसार होण्यात यशस्वी झाले असते. यावरून मुरूम तस्कराची व त्यांच्या माहिती पुरविणाऱ्या गुप्तहेरांची साखळी किती मजबूत आहे हे दिसून येते. परंतु याला कुठला राजकीय पाठबळ आहे हे लवकरच समोर येईल. जुना गोठणगाव रोड परिसरात केलेल्या या कारवाईत जेसीबीसह एकूण चार वाहने जप्त करण्यात आली. यावेळी खालील आरोपी चालक त्यांच्या वाहनांसह मुरूमाची वाहतूक करताना आढळून आले:

१) वैभव प्रदीप कांबळे (२३, गोठणगाव) लाल रंगाचा SOLS ४५१५ ए डएठखएड ट्रॅक्टर (विना क्रमांक) व ट्रॉली (चक ४० उद ७९७२) आणि १ ब्रास मुरूम रू ६,०३,०००/-

२) माधो रामभाऊ रोकडे (५५, रेगांतुर) निळ्या रंगाचा SONALIKA DI ४७ ट्रॅक्टर (चक ४०१५९०१) व ट्रॉली (चक ३६ द ८८२७) आणि १ ब्रास मुरूम रू४,५३,०००/-

३) राजेश झिबल देव्हारे (३९, गोठणगाव) लाल रंगाचा चअकखछऊठअ ४७५ ऊख डझ झडणड ट्रॅक्टर (चक ३५ अऋ ८६७४) व ट्रॉली आणि १ ब्रास मुरूम रू६,०३,०००/-

४) निलेश दिशेवर निकंबर (२५, मेढा) पिवळ्या रंगाची विना क्रमांकाची जेसीबी रू२२,००,०००/-

एकूण ४ आरोपी ३ ट्रॅक्टर, ३ ट्रॉली, १ जेसीबी, ३ ब्रास मुरूम रू३८,५९,०००/-

या कारवाईत एकूण तीन ट्रॅक्टर-ट्रॉली संच, एक जेसीबी आणि तीन ब्रास मुरूम असा अंदाजे ३८ लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी, आरोपी चालक-मालक्यांनी विना परवाना अवैधरित्या मुरूमाची वाहतूक केल्याने, त्यांच्याविरुद्ध कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे. आरोपींविरुद्ध कलम ३०३/२, ४९ भा.न्याय.स. २०२३ , सहकलम ४८ (७) (८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, तसेच सहकलम ४ आणि २१ खान आणि खनिजे (नियमन आणि विकास) अधिनियम १९५७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर कारवाई वेलतुर ठाणेदार प्रशांत मिसाळे यांच्यासमवेत टीमने केली.

## स्वाती देवेन्द्र आष्टणकर यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक



**हिंगणा:** हिंगणा तालुक्यातील गुमगाव नजीकच्या कोतेवाडा ग्राम पंचायतचे सरपंच तथा तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष तसेच हिंगणा तालुक्यातील सामाजिक-राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेल्या देवेन्द्र आष्टणकर यांच्या स्वाती आष्टणकर यांची महाराष्ट्र शासनाच्या वतीने विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. या नियुक्तीबद्दल नवनियुक्त विशेष कार्यकारी अधिकारी स्वाती आष्टणकर यांनी महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री, मा.महसूलमंत्री तसेच आमदार समीर मेघे यांचे आभार मानले असून गावकऱ्यांच्या, गुमगांव सर्कल परिसरातील सर्व शुभचिंतकांच्या वतीने स्वाती आष्टनकर यांच्यावर अभिनंदन होत आहे.

# दिवाळीच्या दिवशी तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

## हिंगणा तालुक्यातील सावळी बीबी येथील घटना



**महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा , दि. २२ :**
तालुक्यातील सावळी बीबी येथील तरुण शेतकऱ्यांनी दिवाळीच्या दिवशीच विष प्राशन करून आपली जीवन यात्रा संपविल्याची खळबळजनक घटना घडली मौजा सावळी (बिबी) येथील विलास अवधूत ढोडरे वय ३६ वर्ष या शेतकऱ्याने सततच्या शेतीच्या नापिकीमुळे कंटाळून राहत्या घरी विष प्राशन करून आत्महत्या केली.

दिवाळीच्या दिवशी पत्नी व दोन लहान मुलींना त्यांच्या माहेरी सोडून देऊन शेतकरी घरी परत आला वदुपारी एक वाजताच्या सुमारास घरी कोणीच नसल्याने त्याने विषारी औषध प्राशन करून घरातच झोपून राहिला काही वेळाने त्याच्या मोठ्या भावाचा मुलगा सार्थक घरी आला तेव्हा याला झोपलेल्या अवस्थेत पाहून व विषारी औषधाच्या वासामुळे त्यांनी आजूबाजूच्या लोकांना सांगितले परंतु तोपर्यंत त्याचा जीव गेला होता.

विलास कडे स्वत:ची कुठलीही शेत जमीन नव्हती परंतु दरवर्षी भाडेतत्त्वावर पाच ते सहा एकर शेत जमीन घेऊन स्वत:च्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता परंतु सततच्या नापिकीला त्रासून व दुसऱ्याकडून घेतलेली व्याजाने पैसे परत न करू शकल्यामुळे नेहमी तणावात राहत असल्याचे त्याच्या पत्नीने पोलिसांन सांगितले व त्यामुळेच कर्जाचा डोंगर वाढत गेला व त्याने आत्महत्येचे टोक उचलले असल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली. या शेतकऱ्याच्या मागे पत्नी आणी दोन लहान चिमुकल्या मुली आहे तसेच म्हातारे आई वडील असून वडिलांना ऐकायलाही येत नाही आनी दिसत सुद्धा नाही.

घटनेची माहिती मिळताच हिंगणा पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा करून मृत्यदेह उत्तरीय तपासणीसाठी एम्स रुग्णालयात पाठवण्यात आला होता.

काल २२ ऑक्टोंबर रोजी उत्तरिय तपासणीनंतर मृतदेह त्याच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला व त्याच्यावर आज सावळी गावामध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

मृत्यू शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना शासनाकडून आर्थिक मदत मिळावी अशी मागणी ग्रामस्थानी केली आहे.



■ **नागपूर :** दीपावलीच्या शुभमुहूर्तावर विविध मंदिरांमध्ये गोवर्धन पुजा केली जाते. नागपूर येथील दुर्गा मंदिरात सुद्धा बुधवारी गोवर्धन पुजेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पुरोहितांनी विधीवत गोवर्धन आणि गोमातेची पुजा केली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# सोन्याच्या दरात पाडव्याला आपटी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर,दि. २२:**
प्रकाशाचा सन असलेल्या दिवाळीतील धनत्रयोदशी आणि लक्ष्मीपूजनाच्या मुहतार्ला बरेच ग्राहक सोने- चांदीमध्ये बनलेल्या देवी- देवतांच्या मुर्तीसह दागिन्यांची खरेदी करतात. या दिवसांमध्ये सोन्याचे दर उंचीवर होते.

परंतु लक्ष्मीपूजनानंतर सोन्याच्या दर मोठ्या प्रमाणात घसरले आहे. त्यामुळे मुहर्तावर दागिन्यांची खरेदी करणाऱ्यांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

दिवाळीच्या पहिल्या दिवशी वसु बारसला सोन्याचे दर विक्रमी उंचीवर होते. परंतु दुसऱ्याच दिवशी धनत्रयोदशीला मात्र सोन्याच्या दरात घसरण झाली. त्यामुळे धनत्रयोदशीच्या मुहर्तावर सोने- चांदीची खरेदीसाठी बाहेर बडलेल्या ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात सोने- चांदीच्या दागिन्यांमध्ये पैसे गुंतवले.

परंतु लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्याच दिवशी सोने- चांदीचे दर घसरल्याने मुहर्तावर खरेदी करतांना ग्राहकांना महागात पडलेले दिसत आहे. दरम्यान करोनानंतर सोने- चांदीचे दर नियंत्रणात येत नसल्याचे चित्र आहे. त्यानंतर सातत्याने सोन्याचे दर वाढत आहे.

धनत्रयोदशीला नागपुरात सोन्याचे दर कमी झाल्याने नागरिकांनी सुमारे १५० कोटींची सोने- चांदीची खरेदी केली. या दिवशी (१८ ऑक्टोंबर २०२५) धनत्रयोदशीच्या मुहर्तावर नागपुरात सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी १ लाख २८ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी १ लाख १९ हजार ५०० रुपये, १८ कॅरेटसाठी १ लाख २०० रुपये, १४ कॅरेटसाठी ८३ हजार ५०० रुपये होते.

हे दर लक्ष्मीपूजनाच्या दिवशी (२१ ऑक्टोंबर २०२५) प्रति दहा ग्राम २४ कॅरेटसाठी १ लाख २९ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी १ लाख २० हजार ४०० रुपये, १८ कॅरेटसाठी १ लाख १ हजार रुपये, १४ कॅरेटसाठी ८४ हजार २०० रुपये होते. तर लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्याच दिवशी घसरून (२२ ऑक्टोंबर २०२५) सकाळी ११ वाजता प्रति दहा ग्राम २४ कॅरेटसाठी १ लाख २४ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी १ लाख १५ हजार ८०० रुपये, १८ कॅरेटसाठी ९७ हजार १०० रुपये, १४ कॅरेटसाठी ८० हजार ९०० रुपये होते. त्यामुळे हे मागील काही आठवड्यातील निच्चांकी दर आहे.

नागपुरात धनत्रयोदशीच्या दिवशी चांदीचे दर प्रति किलो १ लाख ७० हजार ५०० रुपये होते. हे दर लक्ष्मीपूजनाला २१ ऑक्टोंबरला १ लाख ६८ हजार ७०० रुपये तर त्याच्या दुसऱ्या दिवशी २२ ऑक्टोंबरला प्रति किलो १ लाख ६३ हजार रुपये नोंदवले गेले. सोन्याचांदीच्या दरात सातत्याने उतारचढाव सुरूच आहेत.

# पोलीस हुतात्मा स्मृतिदिनानिमित्त आरसीएफकडून शहीदांना श्रद्धांजली



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :** पोलीस शहीद स्मृतिदिनाचे औचित्य साधून रेल्वे सुरक्षा फोर्स, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर मंडळाच्यावतिने शहीदांना अभिवादन करण्यात आले.

मोती बाग, नागपूर येथील मैदानावर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मंडळ सुरक्षा आयुक्त दिवाचंद्र आर्य होते.

याप्रसंगी आयोजित परेडचे त्यांनी निरीक्षण केले. वर्ष २०२४-२५ मध्ये देशभरात कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या पोलीसांच्या कर्तव्याचा उल्लेख करीत सुरक्षा आणि देशसेवेसाठी त्यांचे कार्य अतुलनीय असल्याचे ते म्हणाले. शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून आर्य तसेच इतर अधिकारी व कर्मचारी यांनी श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी रेल्वे सुरक्षा दल तसेच रेल्वेच्या विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# पोलीस नगरात काकड आरती

■ **महासागर प्रतिनिधी, वानाडोगरी,दि. २२:**
कार्तिक महिन्यात भगवान विष्णूची मनोभावे आराधना पूजा करतात. वारकरी परंपरेनुसार भगवंताचे प्राप्त समयी विधिवत स्नान करून भुपाळी, गौळन, वासुदेव या पारंपरिक अभंगाचे गायन करून काकड आरती करण्यात येते.

परीसरातील पोलीस नगर येथे काकड आरतीचे आयोजन करण्यात आले येथे रोज शेकडो भाविक महिला पुरुष महाविद्यालयीन युवक युवती विशेष काकड आरतीत सहभागी होत आहे यामुळे परीसरातील वातावरण शैक्षणिक सोबतच अध्यात्मिक होत आहेत.



आपली संस्कृती व परंपरेचे पालन करुन सुशिक्षित सुसंस्कारित समाज निर्मिती व्हावी या उद्देशाने या उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजक सुरज शेगोकर यांनी सांगितले.

दरम्यान, या कार्यक्रमात परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

# आतिषबाजीमुळे नागपुरातील हवेची गुणवत्ता झाली खराब

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार बाजारातील गर्दी, वाहनांचे प्रदूषण आणि लक्ष्मी पूजनाच्या दिवशी फटाक्यांची धमाकेदार आतिषबाजीमुळे नागपुरातील हवेची गुणवत्ता खराब झाली. यामध्ये महाल हे सर्वाधिक प्रदूषित क्षेत्र आहे. तिथे सर्वात जास्त मध्यम, खराब आणि अतिशय खराब श्रेणीतील दिवसांची संख्या वाढली होती. तर रामनगरमध्ये दोन खराब श्रेणीतील दिवस तसेच अंबाझरीमध्ये मध्यम प्रदूषण असल्याची नोंद केली आहे.

नागपूरमधील प्रदूषण १४ ऑक्टोबरपासून वाढले आणि दिवाळीत ते आणखी वाढले. नागपूरची हवा दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात फटाके फोडल्यामुळे प्रदूषित झाली आहे. विशेषतः दिवाळीच्या लक्ष्मीपूजनाच्या दिवशी हवेच्या गुणवत्तेत मोठी घट झाली आणि महाल परिसरासारख्या ठिकाणी हवेचा गुणवत्ता निर्देशांक १२५६ पेक्षा जास्त नोंदवला गेला.

हा परिणाम फटाक्यांमुळे निर्माण होणारा धूर, विषारी वायू आणि कणांमुळे झाला आहे. दिवाळीत मोठ्या संख्येने फटाके फोडल्यामुळे हवेत सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड), कार्बन मोनोऑक्साइड आणि सूक्ष्म कण तसेच प्रदूषकांची पातळी वाढली आहे. सर्वाधिक फटाक्यांच्या धुरामुळे हवेची गुणवत्ता खालावली असून, ती "खूप खराब' श्रेणीत पोहोचली आहे, असे पर्यावरण अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांनी सांगितले. फटाक्यांच्या धुरामुळे होणारे प्रदूषण केवळ तात्पुरते नसते, तर आरोग्यावरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो, विशेषतः श्वसनाशी संबंधित समस्या वाढू शकतात. नागरिकांनी हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी हरित फटाक्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# दिव्यांगांची दिवाळी अंधारात

■ **महासागर प्रतिनिधी वाडी, दि. २२ :**
नागपूर तालुक्यातील गोधनी नगरपंचायतीकडून दिव्यांग नागरिकांना स्वनिधीतून पाच टक्के निधी दिवाळीपूर्वी वाटप करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, दिवाळी सण जाऊनही संबंधित रक्कम त्यांच्या खात्यात जमा न झाल्याने दिव्यांग बांधवांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर अरुण राऊत व राहुल मनोहर यांच्या नेतृत्वात दिव्यांग नागरीकांनी गोधनी नगरपंचायतीत निवेदन सादर केले. निवेदनातुन त्यांनी दिव्यांगांना हक्काचा निधी तात्काळ वितरित करण्याची मागणी केली.

दिव्यांग नागरिकांचा आरोप आहे की, दरवर्षी निधी वाटपाचे आश्वासन दिले जाते, मात्र प्रत्यक्ष लाभ मिळण्यात उशीर होतो. त्यामुळे यंदाची दिवाळी अंधारात गेल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.




दिव्यांगाना मार्च २०२६ पर्यंत निधीचे वाटप करता येते. दिवाळी सणाच्या अगोदरच दिव्यांग बांधवांना निधीचे वाटप करणार होते. या वर्षी एकुण १२५ दिव्यांगाना निधीचे वाटप करायचे आहे. त्यासाठी सव्वालाख रुपये निधीची गरज आहे. ५० टक्केपेक्षा जास्त स्थानीक नागरीकांनी घर, प्लॉट टॅक्सची रक्कम भरली नसल्यामुळे एवढी रक्कम नगरपंचायत मध्ये जमा झाली नाही. जशी रक्कम जमा होईल तसाच निधी दिव्यांगाना देण्यात येईल.
**डॉ. सुप्रिया राठोड, मुख्याधिकारी, नगरपंचायत गोधनी (रेल्वे)**

# दिवाळी, छठ पूजेसाठी जाणाऱ्या प्रवाशासांठी अजनी, नागपूर रेल्वे स्थानकांवर सुविधा



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२:**
नागपूर : दिवाळी आणि छठ पूजा हे देशातील महत्त्वाचे सण असून, या काळात मोठ्या प्रमाणावर प्रवासी रेल्वेमार्गे प्रवास करतात. संभाव्य प्रवासी गर्दी लक्षात घेता, मध्य रेल्वेच्या नागपूर व अजनी रेल्वे स्थानकांवर सुरक्षा तसेच सुविधा सुधारण्याच्या दृष्टीने तयारी करण्यात आली आहे.

नागपूर स्थानकावर एकूण २७६ आणि अजनी स्थानकावर ३१ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत. हे सर्व कॅमेरे रेल्वे सुरक्षा बल व व्यावसायिक विभागाच्या संयुक्त नियंत्रणात सतत निरीक्षणात ठेवले जात आहेत. यासाठी दोन नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत झ एक थेट स्थानकावर, तर दुसरा मंडळ रेल्वे व्यवस्थापक कार्यालयातील वॉर रूममध्ये कार्यरत आहे.

सुरक्षेची अधिक व्यवस्था म्हणून नागपूर स्थानकावर ७८ आरपीएफ व २८ जीआरएफ कर्मचारी चोवीस तास ड्युटीवर आहेत. विशेष गर्दी नियंत्रणासाठी दोन होल्डिंग क्षेत्रे तयार करण्यात आली असून, प्रत्येकी चार आरपीएफ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. हे कर्मचारी प्रवाशांना मार्गदर्शन, सहाय्य आणि अनुशासन राखण्याचे काम करत आहेत.

मंडळ प्रशासनाने सणाच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त रेल्वे गाड्या चालविणे, प्लॅटफॉर्मवर स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याच्या सुविधा वाढविणे, तसेच माहिती केंद्रांची कार्यक्षमता वाढविणे यावर भर दिला आहे. नागपूर आणि अजनी स्थानकांवर प्रवाशांसाठी बैठकीची सोय, स्वच्छतागृहे, डिजिटल अनाउन्समेंट सिस्टम्स आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

मध्य रेल्वेने सणासुदीच्या काळात प्रवाशांच्या सुरक्षित, आरामदायी आणि वेळेवर प्रवासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले आहे. प्रवाशांना आवश्यक माहिती, मदत व मार्गदर्शन मिळावे यासाठी स्वयंसेवक व अधिकाऱ्यांची विशेष टीम स्थापन करण्यात आली आहे. यामुळे दिवाळी व छठ पूजा सणात रेल्वे प्रवास अधिक सुकर व सुरक्षित होणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# धर्मांतरणावर संपूर्ण बंदी घालायला हवी..

## आरएसएसच भैय्याजी जोशी यांचे मोठे विधान

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२:**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ स्वयंसेवक भैय्याजी जोशी यांनी काही महिन्यांपूर्वी केलेल्या एका वक्तव्याने मोठा वाद निर्माण झाला होता. मुंबईत येणाऱ्यांनी मराठी शिकलं पाहिजे असं काही नाही. इथे वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. जसे की मुंबईतील घाटकोपर भागाची भाषा गुजराती आहे, असं वक्तव्य जोशी यांनी केले होते.



त्यानंतर भैय्याजी जोशी यांनी दिवाळीच्या निमित्त आयोजित एका कार्यक्रमात भारताने इस्त्राईलकडून शिकावे असे वक्तव्य केले. याशिवाय धर्मांतरावर महत्त्वाची भूमिका मांडली.

भैयाजी जोशी यांनी देशाची सुरक्षितता आणि सांस्कृतिक अस्तित्वाच्या मुद्यांवर संघ मुख्यालयात झालेल्या दिवाळी मिलन कार्यक्रमात मोठे भाष्य केले आहे. त्यांनी इस्त्रायलचे उदाहरण देत, भारताने आपल्या आंतर्गत आणि बाह्य सुरक्षा आव्हानांचा समर्थपणे सामना करणे आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले आहे. यावेळी त्यांनी धर्मांतरणाच्या मुद्द्यावरही भाष्य केले. धर्मांतरणाच्या वाढत्या प्रकारांवर तीव्र चिंता व्यक्त करत जोशी यांनी, धर्मांतरणावर संपूर्ण बंदी घालायला हवी, असे आवाहन केले आहे. तसेच, समाजातील प्रत्येक घटकाने या दिशेने संकल्प करण्याची वेळ आली असल्याचेही ते म्हणाले.

भैयाजी म्हणाले, अंतर्गत आणि बाह्य संकटांना धैर्याने सामोरे जाण्यासाठी भारताने स्वावलंबी, सशक्त आणि सजग राष्ट्र बनेणे आवश्यक आहे. आज जग भारताकडे मोठ्या आशेने पाहत आहे आणि परदेशातील भारतीय नागरिकही देशाच्या संस्कृतीमुळे अभिमानास्पद अनुभव घेत आहेत.

स्वातंत्र्याचे महत्त्व सांगत भाय्याजी म्हणाले, आपण स्वतंत्र भारतात जन्म घेतला हे आपले भाग्य आहे आणि या स्वातंत्र्याचे पावित्र्य राखणे ही सामूहिक जबाबदारी आहे. तसेच, देशाचा विकास केवळ भौतिक प्रगती किंवा पायाभूत सुविधांच्या बांधणीपुरताच मर्यादित नाही, तर मानसिक, सांस्कृतिक आणि रचनात्मक बांधणी यावरही भर देणे गरजेचे आहे, तरच समाजाचा समग्र आणि संतुलित विकास साधता येईल.

जोशी यांनी सरकार्यवाह म्हणून संघटनात्मक नियोजन, धोरणात्मक निर्णय, संघाशी संबंधित संघटनांमधील समन्वय साधण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. संघाचे विचार गावागावांत पोहोचवण्यासाठी त्यांनी काम केलं. जम्मू काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारं कलम ३७० हटवण्यासाठीचं आंदोलन, राम जन्मभूमी आंदोलन आणि इतर अनेक सामाजिक उपक्रमात त्यांनी सहभाग घेतला आहे.



■ ***नागपूर :*** *येथील स्वामीनारायण मंदिरात आज देवाला भोग लावण्यात आला.*

# 'आपली बस' च्या वाहकांचा उत्कृष्ट सेवेसाठी गौरव

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२:**
नागपूर महानगरपालिकेच्या ' आपली बस' विभागातर्फे प्रवासी सेवेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वाहकांचा कौतुक सोहळा नुकताच आयोजित करण्यात आला. मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या हस्ते सप्टेंबर महिन्यामध्ये प्रशंसनीय कार्य करणाऱ्या विविध डेपोमधील वाहकांना सन्मानित करण्यात आले.

शहरातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण, सुरक्षित आणि प्रवासी-स्नेही बस सेवा पुरवण्यात वाहकांचे समर्पण, शिस्त आणि बांधिलकी महत्त्वपूर्ण आहे, या योगदानाची दखल घेऊन हा गौरव समारंभ पार पडला. याप्रसंगी मनपा परिवहन व्यवस्थापक श्री. राजेश भगत, मनपा प्रशासकीय अधिकारी श्री. योगेश लुंगे आणि चलो मोबिलिटी प्रा. लि.चे सिटी हेड श्री. अजय कुमार उपस्थित होते.



**मनपातर्फे १८ कर्मचाऱ्यांना सन्मान**

प्रवाशांसाठी सुरक्षित आणि सुलभ बससेवा सुनिश्चित करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या वाहकांचा सत्कार करण्यात आला. यात पाटवर्धन डेपो येथील अर्चना गोरे सुजल मोखारे, खापरी डेपो येथील ज्योती राजेश कामदे, ईश्वर तोहने, वाडी डेपो येथील राजकुमार मदनलाल सहारे, शुभम रामभाऊ पंचभाई, वाठोडा डेपो येथील राणू शेंडे, निलेश शेंबेकर, हिंगणा डेपो येथील श्रीकृष्ण गजभिये, बॉबी खैरकर यांना सत्कार करण्यात आला.